# प्रकरण तीन

## कृषी विभाग

**3.650 केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2016-2017 मध्ये सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना बायोगॅस संयंत्र पुरवठा करण्यासाठी रुपये 6,36,250/- इतका खर्च करण्यात आला आहे. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर योजनेच्या संनियत्रणाकरीता विहीत स्थळ तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे / नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र 73/34, दिनांक 05/10/1999 नुसार लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता असल्याबाबतचे कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

सदर योजनेच्या लाभार्थ्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत.

राष्ट्रीय बायोगॅस संनिययंत्रण बांधकामासाठी प्रशिक्षित गवंडीचे प्रमाणपत्र संचिकेत दिसत नाही. तसेच उपअभियंता यांचेकडील काम पूर्ण झालेबाबतचे मुल्यांकन दाखले / प्रमाणपत्र संचिकेत संलग्न नसल्यामुळे गटस्तरावर वाटप केलेले अनुदान लाभार्थीला मिळालेबाबत पोहच संचिकेत नाही.

शासन निर्णय क्रमांक बिजीएस-2016/प्र.क्र80/पं.रा.06, दिनांक 11/08/2016 मध्ये दिलेल्या अंमलबजावणीसाठी वितरीत करावयाच्या निधी तपशिलाच्या तक्तामध्ये सर्वसाधारण लाभार्थी 35 व अनुसूचित जमाती लाभार्थी 15 असे एकूण 50 लाभार्थी निवडावयाचे असतांना लाभार्थी प्रस्ताव व मास्टर नोंदवहीनुसार सर्वसाधारण 26 व अनुसूचित जमाती लाभार्थी 24 अशी निवड केली आहे. सदरचे प्रमाण न पाळता नियमबाहयपणे लाभ प्रदान केल्यामुळे योजनेचा हेतू सफल झालेला नाही. विहित प्रमाणापेक्षा नियमबाहय प्रदान केलेल्या अनुदान रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.651 आदिवासी क्षेत्रातंर्गत उपयोजना (T.S.P) अंतर्गत साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर योजनेकरीता रक्कम रुपये 1,41,73,033/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1980 अन्वये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना कृषी विभागाने मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिलेला आहे का, याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही. तरी मास्टर नोंदवही अदयावत करुन लेखापरीक्षणास सादर करावी.

3) सदर साहित्याचा वापर लाभार्थी करीत असलेबाबत लाभार्थीचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे लाभार्थी सदर साहित्याचा वापर करीत असलेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

4) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 11/05/2015 च्या अंतरीत मार्गदर्शक सुचनेनुसार वैयक्तीक लाभार्थीची निवड करतांना महिला लाभार्थींना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एकुण मंजूर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसूचित जातीतील अपंग शेतक-यांचा राखून ठेवावा. असे असतांना लाभार्थीची निवड करतांना याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**3.652 जिल्हा परिषद सेस 50 टक्के अनुदानाने शेतक-यांना पिक संरक्षण अवजारे पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 299, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 15,01,341/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

**1**) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांनी पुरविलेले साहित्य कोणत्या दिनांकास पुरविण्यात आले, तो दिनांक नमुद केलेला नसल्यामुळे सदर पुरवठादारने पुरवठा आदेश दिल्यापासुन विहीत मुदतीत पुरविला किंवा नाही तसेच साहित्य स्विकारताना गटविकास अधिकारी किंवा कृषी अधिकारी यांनी दिनांकित स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे साहित्य विहीत वेळेत प्राप्त झाल्यांची पडळताणी लेखा परीक्षा लेखा परीक्षकांस करता आलेली नाही.

**2**) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/1089//646/266/3, दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रृती अहवाल व मुल्यामापन पडळताणी न केल्याचने योजनेचा उददेश सफल झाला किंवा नाही, यांची केलेली पडळताणी लेखापरिक्षणास आढळुन आली नाही.

3) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 प्रकरण 4.6 अन्वये कृषी उदयोग विकास महामंडळाच्या देयकांतुन 3 टक्के अनामत रक्कम कपात करणे आवश्यक असताना ती का वसुल करण्यात आली नाही, याबाबत खुलासा करावा.

4) सदर योजनेच्या प्रारुपामध्ये नमुद केल्याप्रमाणे पात्र लाभार्थी निश्चिती करण्याची जबाबदारी गट स्तरावर कृषि विस्तार यंत्रणेची असुन प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या बाबीवर राबविण्यात आलेली असून कृषी विस्तार यांनी तसा अहवाल सादर केलेला नाही. त्या सदर योजनेनुसार योजना राबविण्यात आली किंवा नाही, याची पडळताणी करता आलेली नाही.

5) सदरची योजना वैयकतीक असल्यामुळे विभागाने योजनेचा लाभ देताना एकाच लाभार्थ्याला चालु आर्थिक वर्षात दोन वेगवेगळया योजनातुन लाभ देण्यात आले किंवा नाही, याची पडताळणी लाभार्थींची नोंदवही ठेवण्यात न आल्यामुळे करता आलेली नाही.

6) लाभार्थी हिस्सा भरणे आवश्यक असताना लेखापरिक्षण कालावधीपर्यंत रूपये 4,28,592/- भरणा करणे बाकी आहे. म्हणजे खरेदी केलेले साहित्य अद्याप पावेतो पडुन असुन याबाबत खुलासा करावा.

**3.653 आदिवासी क्षेत्रांतर्गत उपयोजनेतून TSP अनुदानातून 3 HP, 4 HP व 5 HP DIESEL RUN PUMPSET ENGIN पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12, 14 व 15) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,05,28,569/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंचायत समिती 1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/2007 मधील परिच्छेद क्रमांक 3 नुसार योजनेस व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. अखर्चित निधीची रक्कम पहाता योजनेस व्यापक प्रसिद्धी दिली गेलेली नसल्याचे दिसून आले.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.481/ वित्त-3, दिनांक 12/10/2007 नुसार एकूण निवड झालेल्या लाभार्थीच्या 3 टक्के अपंग लाभार्थी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4 ए, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केल्याप्रमाणे वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या दिनांक 20/11/2009 च्या परीपत्रकानुसार पुरवठादाराने आवश्यक त्या मुद्रांकासह पुरवठा करणेबाबतचा सर्व अटी मान्य असल्याबाबतचा जिल्हा परिषदेशी करारनामा करणे आवश्यक आहे.

3) शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक माकास/1093/1231, दिनांक 01/09/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

4) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य योजनेच्या अंमलबजावणी संबधी मार्गदर्शक सूचना परिशिष्ट दोन नुसार पुरवठादाराकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर अंतिम लाभार्थ्यांना साहित्य पुरवठा 15 दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. उपरोक्त साहित्याचा वापरायोग्य कालावधी विचारात घेता तालुकास्तरावरील वाटप नोंदवह्या सादर करून अंतिम लाभार्थ्यास वाटप विहित मुदतीत झाल्याबाबत अनुपालनीय पूर्तता सादर करणे आवश्यक आहे.

5) प्रशासकीय मान्यता आदेशात मार्गदर्शक सूचना क्रमांक 15 मध्ये नमूद केल्याप्रमाणे योजनेची अंमलबजावणी यशस्वी होण्याच्या दृष्टीने विभागीय विविध स्तरावरुन तपासणी टक्केवारी निर्धारीत केल्यानुसार तपासणी झाल्याचे दिसुन येत नाही.

6) उपरोक्त प्रमाणकाद्वारे 3 HP PETROL START DIESEL RUN PUMPSET ENGIN या साहित्याची खरेदी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित मार्फत एकाच वेळी केली असतानाही दोन्ही प्रमाणकातील प्रती नग रक्कमेत रूपये 1,398/- ची तफावत दिसून आली. याबाबत खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1084/सीआर/1633, दिनांक 19/01/1985 अन्वये लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल करून नंतर साहित्य खरेदी करणे तसेच सदर विभागाचे परिपत्रक क्रमांक पंरास 1094/सीआर/1633/50, दिनांक 18/01/2005 नुसार लाभार्थी हिस्सा त्याच वित्तीय वर्षात वसूल करणे आवश्यक आहे. 3 HP डिझेल इंजिन खरेदी केलेल्या 530 नगासाठी शासन अनुदानाच्या मर्यादेच्या (रूपये 20,000/-) वर आकारलेल्या रक्कमेची म्हणजेच रूपये 7,20,750/- (530 x रूपये 1,375) ची वसुली करून पुरवठादार संस्थेला देयकाचे प्रदान करणे आवश्यक होते. अशा स्वरुपाची कार्यवाही झालेली नाही.

8) 4 HP डिझेल इंजिन खरेदी केलेल्या 320 नगासाठी शासन अनुदानाच्या मर्यादेच्या (रूपये 20,000/-) वर आकारलेल्या रक्कमेची म्हणजेच रूपये 13,44,000/- (320 x रूपये 4,200/-) ची वसुली करून पुरवठादार संस्थेला देयकाचे प्रदान करणे आवश्यक होते. अशा स्वरुपाची कार्यवाही झालेली नाही.

9) 5 HP डिझेल इंजिन खरेदी केलेल्या 497 नगासाठी शासन अनुदानाच्या मर्यादेच्या (रूपये 20,000/-) वर आकारलेल्या रक्कमेची म्हणजेच रूपये 19,88,000/- (497 x रूपये 4,000/-) ची वसुली करून पुरवठादार संस्थेला देयकाचे प्रदान करणे आवश्यक होते. अशा स्वरुपाची कार्यवाही झालेली नाही.

**3.654 जिल्हा परिषद सेस 75 टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत रक्कम रुपये 14,98,611/- खर्च करण्यात आला आहे. जिल्हा परिषद सेस 75 टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदीसाठी भगा दोषी कोटेक्स, डेझी ट्रेडिंग, डेझी इंडस्ट्री, व ए.के.अग्रवाल अशी चार दरपत्रक प्राप्त झाली आहेत. डेझी इंडस्ट्री यांची निविदा सर्वात कमी दराचे दिसते. परंतु, सदर दरपत्रके कार्यालयास कधी प्राप्त झाली, याचा बोध होत नाही. प्राप्त दिनांक / आवक नंबर नमूद नाही.

2) सदर खरेदीसाठी खरेदीचा शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार समिती स्थापन करून खरेदी करणे आवश्यक असताना खरेदीचे इतिवृतावर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र प्रतिनिधी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (समिती अध्यक्ष) यांची स्वाक्षरी आढळत नाही. सबब शासन निर्णयाचे पालन केल्याचे आढळत नाही.

3) इतिवृतामध्ये दिनांक 15/07/2016 रोजी निविदा पुरवठादार यांचे समोर उघडण्यात आली. परंतु, समक्ष उघडले म्हणून पुरवठादार यांची स्वाक्षरी आढळत नाही.

4) वरील नमूद पुरवठादार यांनी दिनांक 18/07/2016 ते 19/07/2016 या कालावधीत आपले दरपत्रक तयार केल्याचे दरपत्रकावरील नमूद तारखेवरून दिसते. असे असताना दिनांक 15/07/2016 रोजी दरपत्रक कसे उघडण्यात आले, याचा समर्पक खुलासा सादर करावा.

5) पुरवठा आदेश रा.जि.प./कृषी/वशी/क-5/2016/1045, दिनांक 21/07/2016 अन्वये रुपये 3045.96 प्रती नग प्रमाणे 656 इतके नग मागणी केले आहेत व वस्तू मागणी केलेपासून आठ दिवसात पुरवठा करणेचे नमूद केले आहे. परंतु, पुरवठादार यांनी दिनांक 18/07/2016 या तारखेचे रक्कम रुपये 19,98,150/- रक्कमेचे उपप्रमाणक व 656 नग पुरवठा केल्याचे त्याच दिवसाचे पत्र कृषी विकास अधिकारी यांना पाठविले आहे. तसेच दिनांक 18/07/2016 रोजी पंचायत समिती पेण, मुरुड, कर्जत, खालापूर, पनवेल, उरण, माणगाव, तळा, रोहा, सुधागड, महाड, पोलादपूर, म्हसळाव श्रीवर्धन या गटांना पुरवठा केला म्हणून Invoice जोडले आहे. पुरवठा आदेशाच्या दिनांकापूर्वी पुरवठादाराने पुरवठा केलेला आहे. सदर अनियमितताबाबत समर्पक खुलासा करावा.

6) खरेदी केलेली वस्तू लाभार्थी हिस्सा वसूल करून वाटप केलेबाबत पोच लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**3.655 75 टक्के अनुदानाने भाजीपाला लागवड प्रोत्साहन योजना राबविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत रक्कम रुपये 13,92,970/- खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त खरेदीच्या कार्यवाही संदर्भात लेखापरीक्षणामध्ये खालील अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेबाबत जिल्हयातून किती शेतक-यांचे अर्ज प्राप्त झाले, याची नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही.

2) सदर साहित्य गटांना वाटप केल्यानंतर त्याचा पुरवठा संबंधीत लाभार्थ्यांना केल्याबाबतचे विनीयोग प्रमाणपत्र व लाभार्थी हिस्सा वसुल झाल्याबाबतचा अहवाल त्यांचेकडून प्राप्त करुन घेण्यांत आलेला नाही.

3) वरील साहित्य खरेदीसाठी 25 टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा वजा जाता रक्कम रुपये 9,99,727/- इतका खर्च झालेला आहे. सबब मुंबई मुंद्रांक अधीनियम 1958 चे कलम 34 नुसार बॉंड पेपरवर करारानामा घेतलेला नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/आर.सी./1633, दिनांक 16/09/1995 नुसार लाभार्थी हिस्सा रक्कम वसुल केल्याशिवाय योजना कार्यान्वीत करु नये, असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांना देखील लाभार्थी हिस्सा रक्कम प्रथम वसुल न करताच योजना कार्यान्वीत केलेली आहे. पुरवठादारानी एकुण 100 टक्के रक्कम रुपये 13,32,970/- चे बिल सादर केलेले आहे. सदर रकमेमध्ये लाभार्थ्यांच्या हिस्स्याची 25 टक्के रक्कम रुपये 3,33,243/- समाविष्ट आहे. त्यामुळे सदर योजनेतील 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 3,33,243/- वसुलीबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधीताकडून वसुल करुन पुरवठादाराची सदरची थकित रक्कम त्यांना अदा करावी.

5) लागवड प्रोत्साहन योजनेंतर्गत रुपये 10.00 लाख तरतुद असून सदर योजनेखाली एकाच दिवशी पाच औषधांसाठी पाच वेगवेगळी रु.3.00 लाखांच्या मर्यादेत दरपत्रके मागविण्यांत आलेली आहेत. वास्तवीक एकाच योजनेंतर्गतची सदरची खरेदी असून एकुण खरेदी रक्कम रुपये 3 लाखाचे वर असल्यामुळे उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्रक्रा-82/भाग III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद-1 व नियमपुस्तीका परिच्छेद 4.1 मध्ये निर्देशीत केल्यानुसार ई-निविदा प्रणालीचा अवलंब न करणेबाबतचे प्रयोजन काय स्पष्ट होत नाही. सदर प्रकरणी खरेदीची केलेली कार्यवाही म्हणजे ई-निवीदा प्रणालीचा अवलंब हेतूपुरस्पर टाळणेच्या दृष्टीने केलेली कार्यवाही असल्याचे दिसते. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून वित्तीय औचित्याचा भंग करणारी आहे.

6) ऑक्टोबर 2015 च्या शासन निर्णयामधील नियम पुस्तिकेमधील नियम 2.9.3(ब) मध्ये नमुद केल्यानुसार जिल्हा स्तरावर गठीत करावयाच्या खरेदी समितीमध्ये 1. महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र व 2. लेखा व कोषागरे कार्यालयाचा गट-अ/गट-ब दर्जाचा अधिकारी हे दोन खरेदीदार विभागाच्या व्यतिरीक्त शासकिय विभागाचे अधिकार सदस्य असणे बंधनकारक असतांना सदर खरेदीच्या निविदा प्रक्रीयेमध्ये त्यांची स्वाक्षरी नाही. तसेच त्यांना सदर प्रक्रीयेमध्ये निवीदा उघडतेवेळी निमंत्रित केल्याचा पत्रव्यवहार केल्याचे प्रकरणावरुन आढळून येत नाही.

**3.656 75 टक्के अनुदानाने टिशु, कल्चर केळी रोपे, हळद बियाणे पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** 75 टक्के अनुदानाने टिशु, कल्चर केळी रोपे, हळद बियाणे पुरविणेकरिता रक्कम रूपये 34,51,500/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई - निविदा 2 रा व 3 रा कॉल न करताच अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली रक्कम रूपये 34,51,500/- चे वितरण केले.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देशीत केल्यानुसार कृषी समितीची बैठक न होताच दिनांक 15/06/2016 ला एकूण 34,51,500/- एवढे अनुदान वितरीत केले आहे.

3) विनियोग दाखले उपलब्ध नाहीत.

4) करारनामा नाही. रूपये 2,500/- च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना करानामा केला नाही.

5) शेतकरी दाखला नाही.

6) पुरवठादाराचे नांव व पत्ता चलनावर नाही.

8) बियाणे सुयोग्य स्थितीत आहे, असे प्रमाणपत्र नाही.

9) उपयोगिता प्रमाणपत्र नाही.

10) आयकर 2 टक्के व सरचार्ज 15 टक्के कपात नाही. गट स्तरावर खरेदी झालेला असल्यास त्यांचेकडून सदरचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

जिल्हयातील एकूण खरेदी अनुदान वितरणाप्रमाणे रूपये 34.51 लाख एवढी असतांना शासन निर्णय दिनांक 31/10/2015 अन्वये ई- निविदेद्वारे जिल्हास्तरावर ठेकेदार नियुक्त करून गटस्तरावर पुरवठा करणेबाबतची कार्यवाही का करणेत आली नाही?

**3.657 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण औषध पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार रोस्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

2) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक सीपीएस/रा.की.ना.दर/2016-17/263/गुनि-5/2016, दिनांक 02/06/2016 च्या पत्रान्वये किटकनाशके पुरवठ्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना 2016-2017 च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, अल्पभूधारक लाभार्थ्यांचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कृषी विकास अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून मागणी गोळा करणेबाबत नमूद आहे. मात्र लाभार्थी निवडीबाबत कोणतेही अभिलेख नस्तीत नाहीत. पंचायत समितीकडून प्राप्त मागणीचे ढोबळ आकडे विचारात घेऊन पुवठादाराकडे मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

3) जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांचे पत्र क्रमांक नियोजन/कार्या-2/जिवायो/निविआदेश/2016-2017/3848/16, दिनांक 31/12/2016 रुपये 20,00,000/- इतक्या रकमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून मान्यतेपूर्वी जिल्हा परिषदेकडून औषध खरेदीबाबतचा पुरवठा आदेश पुरवठा संस्थेस दिलेला आहे.

4) कृषी आयुक्तालयाचे मार्गदर्शक सूचनानुसार एकूण मागणीच्या 25 टक्के औषधांची उचल करण्याच्या सूचना आहेत. मात्र 100 टक्के औषधांची उचल करण्यात आली आहे.

5) कृषी आयुक्तालयाचे मार्गदर्शक सूचना क्रमांक 13 नुसार पिक संरक्षण मोहिम संपल्यावर औषधे शिल्लक राहिल्यास ती पुरवठा संस्थेस एक महिन्याच्या आत परत करुन खरेदी रक्कम परत घेऊन शासनखाती जमा करण्यात यावी, अशी तरतूद आहे. मात्र साठा नोंदवहीतील नोंदी पाहता, नोंदी औषधनिहाय करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांचे परिमान परिगणित करता येत नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 02, दिनांक

10/10/2017 अन्वये माहिती मागविण्यात आली होती. प्राप्त माहिती पाहता पंचायत समिती कार्यालयात औषधांचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे विनावापर पडून राहिलेल्या औषधामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे.

6) अर्धसमास ज्ञापन क्रमांक 02, दिनांक 10/10/2017 अन्वये औषध वाटपाचा तिमाही अहवाल प्रपत्र 4 मध्ये तसेच औषध तपासणी अहवाल प्रपत्र 05 च्या प्रतींची मागणी करण्यात आली होती. मात्र सदर अहवाल कृषी आयुक्तालयास सादर करण्यात आल्याचे दिसून आलेले नाही.

7) मार्गदर्शक सूचना अनुक्रमांक 10 नुसार औषध तपासणी अहवाल अप्रमाणित आढळल्यास देयके अदा करु नयेत, अशी तरतूद आहे. मात्र असा तपासणी अहवाल न घेताच रक्कम पुरवठादारास अदा करण्यात आली आहे.

**3.658 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर प्लास्टीक क्रेट पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** 50 टक्के अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या सुधारीत कृषी अवजारांच्या वाटपा अनुषंगाने ISO सर्टीफाईड कंपनीचे प्लास्टीक क्रेट खरेदीकरीता रक्कम रूपये 14,99,987/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार रोस्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) योजनेच्या लाभार्थी निवडीबाबत लाभार्थी हिस्सा रोखीने वसूल करणे, कृषी समितीमार्फत निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ देणे, अनुसुचित जाती जमाती व महिला, अपंग लाभार्थ्यांना प्राधान्याने निवड करणे, अशा अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र लाभार्थी निवडीबाबतच्या याद्या नस्तीत उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे प्रस्तावदेखील लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याची खात्री करता आलेली नाही.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार तांत्रीक लिफाफ्यातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. पुरवठयाबाबत ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती पाहता, नोंदणीकृत कंपनीकडून माल खरेदी करणे आवश्यक होते. मात्र मंगेश एजन्सीज ही संस्था नोंदणीकृत नाही. आयकर विवरणपत्र संस्थेच्या नावे नाही.

4) वरील शासन निर्णयातील परिच्छेद 4.4.2 नुसार रुपये 3,00,000/- वरील रकमेच्या साहित्याची खरेदी करतांना अशा खरेदीची संक्षिप्त स्वरुपाची जाहिरात वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. मात्र वर्तमानपत्रात अशी जाहिरात देण्यात आलेली नाही. याबबात खुलासा करण्यात यावा.

5) मंगेश एजन्सीज मार्फत पुरविण्यात आलेल्या मालाच्या पोहोचवर पंचायत समिती, राजापूर व पंचायत समिती, रत्नागिरी यांनी तारीख नमूद केलेली नाही. त्यामुळे सदर पंचायत समितींना विहीत मुदतीत माल पुरवठा झाल्याची खात्री होत नाही.

6) कृषी व पुशसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 परिच्छेद 17 नुसार शेतकऱ्यांकडून औजारांची मागणी असल्याशिवाय खरेदीची मागणी (परचेस ऑर्डर) स्वत:हून अधिकाऱ्यांनी नोंदवू नये, अशी तरतूद आहे. मात्र पंचायत समितीने कळविलेल्या आकडेवारीवर मागणी नोंदविलेली आहे.

7) वरील शासन निर्णयातील प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 10 नुसार औजारांची केंद्रीय तपासणी संस्थांचे / कृषी विद्यापीठांचे तपासणी अहवालाची अथवा बी आय एस प्रमाणपत्राची प्रत खरेदी संस्थेने मागणी नोंदविणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देणे त्यांना बंधनकारक आहे. त्याशिवाय पुरवठा संस्थेने अवजारांचा पुरवठा करु नये, असे नमूद आहे. मात्र त्यानुसार आवश्यक प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तसेच अट क्रमांक 11 नुसार पुरवठा साहित्याचे रॅण्डम पद्धतीने नमूने तपासणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अट क्रमांक 15 नुसार अवजारांचा पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के रक्कम तसेच 10 टक्के रक्कम

गुणवत्ता तपासणी अहवालानंतर पुरवठा संस्थेस प्रदान करण्याची तरतूद आहे. मात्र अशी कोणतीही बाब न करता 100 टक्के रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

8) खालील पंचायत समितींच्या मागणीपेक्षा त्यांना जास्त माल पुरवठा करण्यात आलेला आहे.

| पंचायत समिती | मागणी नग | पुरवठा नग | जादा वाटप |
|---|---|---|---|
| चिपळूण | 500 | 530 | 30 |
| गुहागर | 1000 | 1140 | 140 |
| रत्नागिरी | 2000 | 3270 | 1270 |

वरीलप्रमाणे पुरवठा पाहता पंचायत समितींच्या मागणीचा तपशिल नस्तीत दिसून येतात. मात्र क्रेट मागणीपेक्षा जास्त वाटप करण्यात आल्याचे दिसून येतो. याबाबत प्रयोजन स्पष्ट करावे.

9) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए -2000/प्र.क्र.514/वित्त -9, दिनांक 20/11/2009 नुसार कार्यकरारावर मुंबई मुद्रांक अधिनियम -1958 च्या कलम 34 नुसार मुद्रांक वापरणे आवश्यक आहे. मात्र करार रुपये 100/- चे मुद्रांकावर करण्यात आला असल्याने रुपये 2,000/- वसूल करण्यात यावी.

**3.659 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पॉवर स्प्रेअर पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 14,83,350/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार रोस्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

2) योजनेच्या लाभार्थी निवडीबाबत लाभार्थी हिस्सा रोखीने वसूल करणे, कृषी समितीमार्फत निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ देणे, अनुसुचित जाती जमाती व महिला, अपंग लाभार्थ्यांना प्राधान्याने निवड करणे, अशा अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र लाभार्थी निवडीबाबतच्या याद्या नस्तीत उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे प्रस्ताव देखील लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पध्दतीने झाल्याची खात्री करता आलेली नाही.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 3,00,000/- वरील रक्कमेच्या साहित्याची खरेदी करतांना अशा खरेदीची जाहिरात वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. मात्र वर्तमानपत्रात अशी जाहिरात देण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

4) ई-निविदेबाबतची कागदपत्रे नस्तीत उपलब्ध नसल्याने ती योग्य पद्धतीने केल्याची खात्री करता आलेली नाही.

5) कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2016 नुसार राज्यातील पुरवठादारांनी साहित्य पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन परराज्यातून खरेदी करता येईल, अशी तरतूद आहे. मात्र या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आल्याचे अभिलेख नस्तीत दिसून आलेले नाहीत.

6) पुरवठा आदेश अट क्रमांक 07 नुसार सुरक्षा अनामत रक्कम पुरवठादाराने पुरवठा करण्यापूर्वी भरणा करणे आवश्यक होते. मात्र सदर रक्कम देयकातून वसूल करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

7) ग्रामविकास शासन, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार कार्यकरारावर मुंबई मुद्रांक अधिनियम-1958 च्या कलम 34 नुसार मुद्रांक वापरणे आवश्यक आहे. मात्र करारासाठी रुपये 100/- च्या मुद्रांकावर करण्यात आला असल्याने रुपये 2,000/- वसूल करण्यात यावी.

8) कृषी व पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 परिच्छेद 17 नुसार शेतकऱ्यांकडून अवजारांची मागणी असल्याशिवाय खरेदीची मागणी (परचेस ऑर्डर) स्वत:हून अधिकाऱ्यांनी नोंदवू नये, अशी तरतूद आहे. मात्र पंचायत समितीने कळविलेल्या आकडेवारीवर मागणी नोंदविलेली आहे.

9) वरील शासन निर्णयातील प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सूचना अट क्रमांक 11 नुसार पुरवठा साहित्याचे रॅण्डम पद्धतीने नमूने तपासणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अट क्रमांक 15 नुसार औजारांचा पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के रक्कम तसेच 10 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणी अहवालानंतर पुरवठा संस्थेस प्रदान करण्याची तरतूद आहे. मात्र अशी कोणतीही बाब न करता 100 टक्के रक्कम अदान करण्यात आलेली आहे.

10) उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदींनुसार पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 45 दिवसात पुरवठा होणे आवश्यक आहे. मात्र अर्धसमास ज्ञापन क्रमांक 3, दिनांक 11/10/2017 नुसार प्राप्त माहितीनुसार विवरणपत्र 02 प्रमाणे विलंबाने साहित्याचा पुरवठा झालेला आहे. त्यानुसार रुपये 3,031/- इतकी दंडाची रक्कम वसूलपात्र आहे.

**3.660 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,99,949/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत..

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

2) योजनेच्या लाभार्थी निवडीबाबत लाभार्थी हिस्सा रोखीने वसूल करणे, कृषी समितीमार्फत निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ देणे, अनुसुचित जाती जमाती व महिला, अपंग लाभार्थ्यांना प्राधान्याने निवड करणे अशा अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र लाभार्थी निवडीबाबतच्या याद्या नस्तीत उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे प्रस्ताव देखिल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याची खात्री करता आलेली नाही.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 3,00,000/- वरील रकमेच्या साहित्याची खरेदी करतांना अशा खरेदीची जाहिरात वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. मात्र वृत्तपत्रात अशी जाहिरात देण्यात आलेली नाही.

4) कृषी व पुशसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 परिच्छेद 17 नुसार शेतकऱ्यांकडून औजारांची मागणी असल्याशिवाय खरेदीची मागणी (परचेस ऑर्डर) स्वत:हून अधिकाऱ्यांनी नोंदवू नये, अशी तरतूद आहे. मात्र पंचायत समितीने कळविलेल्या आकडेवारीवर मागणी नोंदविलेली आहे.

5) वरील शासन निर्णयातील प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 10 नुसार अवजारांची केंद्रीय तपासणी संस्थांचे / कृषी विद्यापीठांचे तपासणी अहवालाची अथवा बी आय एस प्रमाणपत्राची प्रत मागणी नोंदविणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देणे पुरवठा संस्थेस बंधनकारक आहे. त्याशिवाय पुरवठा संस्थेने अवजारांचा पुरवठा करु नये, असे नमूद आहे. मात्र त्यानुसार आवश्यक प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तसेच अट क्रमांक 11 नुसार पुरवठा साहित्याचे रॅण्डम पध्दतीने नमूने तपासणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अट क्रमांक 15 नुसार औजारांचा पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के रक्कम तसेच 10 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणी अहवालानंतर पुरवठा संस्थेस प्रदान करण्याची तरतूद आहे. मात्र अशी कोणतीही बाब न करता 100 टक्के रक्कम अदान करण्यात आलेली आहे.

6) पंचायत समित्यांकडून प्राप्त मागणीपेक्षा 149 ताडपत्रींचे जादा वाटप करण्यात आलेले आहे.

7) अनुदान वाटप आदेश क्रमांक रजिप/कृषी/सी 4/520/2017, दिनांक 17/03/2017 नुसार रत्नागिरी पंचायत समितीस रुपये 1,00,000/- तसेच उर्वरीत 08 पंचायत समितीना प्रत्येकी रुपये 50,000/- असे एकूण रुपये

5,00,000/- अनुदान वरीलप्रमाणे ताडपत्री वाटप करण्यात आली असतांना देखील नव्याने पुन्हा वाटप करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. सदर वाटप रक्कमेच्या विनियोगाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र कृषी विभागाने घेतलेली नाहीत.

8) वेगवेगळ्या डिलीव्हरी चलनाद्वारे ताडपत्री पंचायत समितींना वाटप होणे आवश्यक आहे. मात्र चलन क्रमांक 163 या एकाच क्रमांकाच्या चलनाद्वारे पंचायत समिती रत्नागिरी, लांजा, राजापूर यांना माल पुरवठा करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

9) ग्रामविकास विकास, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार कार्यकरारावर मुंबई मुद्रांक अधिनियम-1958 च्या कलम 34 नुसार मुद्रांक वापरणे आवश्यक आहे. मात्र करारासाठी रुपये 100/- वर करण्यात आला असल्याने रुपये 1,000/- वसूल करण्यात यावी.

**3.661 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पेट्रो डिझेल पंप व इलेक्ट्रीक पंप वाटप करणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 1233925/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) योजनेच्या लाभार्थी निवडीबाबत लाभार्थी हिस्सा रोखीने वसूल करणे, कृषी समितीमार्फत निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ देणे, अनुसुचित जाती जमाती व महिला, अपंग लाभार्थ्यांना प्राधान्याने निवड करणे, अशा अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र लाभार्थी निवडीबाबतच्या याद्या नस्तीत उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे प्रस्ताव देखिल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याची खात्री करता आलेली नाही.

3) कृषी व पुशसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 परिच्छेद 17 नुसार शेतकऱ्यांकडून अवजारांची मागणी असल्या शिवाय खरेदीची मागणी (परचेस ऑर्डर) स्वत:हून अधिकाऱ्यांनी नोंदवू नये, अशी तरतूद आहे. मात्र पंचायत समितीने कळविलेल्या आकडेवारीवर मागणी नोंदविलेली आहे.

4) वरील शासन निर्णयातील प्रपत्र 2 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 10 नुसार अवजारांची केंद्रीय तपासणी संस्थांचे / कृषी विद्यापीठांचे तपासणी अहवालाची अथवा बी आय एस प्रमाणपत्राची प्रत मागणी नोंदविणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देणे पुरवठा संस्थेस बंधनकारक आहे. त्याशिवाय पुरवठा संस्थेने अवजारांचा पुरवठा करु नये, असे नमूद आहे. मात्र त्यानुसार आवश्यक प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे. परंतू, सदर पत्र ॲग्रो इंजिनिअरींग डिव्हीजन, गोरेगाव, मुंबई यांचे असून पत्रावर दिनांक जावक क्रमांक नमूद नाही. तसेच त्यावर स्वाक्षरी उस्मानाबाद मधील अधिकाऱ्यांची आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

5) वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 11 नुसार पुरवठा साहित्याचे रॅण्डम पद्धतीने नमूने तपासणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अट क्रमांक 15 नुसार अवजारांचा पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के रक्कम तसेच 10 टक्के रक्कम गुणवत्ता तपासणी अहवालानंतर पुरवठा संस्थेस प्रदान करण्याची तरतूद आहे. मात्र अशी कोणतीही बाब न करता 100 टक्के रक्कम अदान करण्यात आलेली आहे.

6) संगमेश्वर, राजापूर व चिपळूण पंचायत समिती वगळता अन्य पंचायत समितीला कोणत्या तारखेस साहित्य पुरवठा झाले, याबाबत डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नसल्याने विहीत मुदतीत साहित्य पुरवठा झाल्याची खात्री करता आलेली नाही.

7) पेट्रोल / डिझल पंप पंचायत समिती, रत्नागिरीची मागणी 30 नग असतांना 40 नग पुरवठा करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

8) विद्युत पंप 28 नग मागणी आदेशावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी न घेता आदेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

9) खरेदी केलेल्या पेट्रो डिझेल पंप व इलेक्ट्रीक पंप यांचा पुरवठा परस्पर पंचायत समितीस झालेला असून त्यापैकी वाटप व शिल्लक नग यांचा तपशिल कृषी विभागाकडे उपलब्ध नाही.

**3.662 अनुसूचीत जाती उपयोजनेंतर्गत शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,52,90,511/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1516/प्र.क्र.240/4अे, दिनांक 30/07/2016 अन्वये सदरच्या आदेशानुसार खरेदी केलेली असून लाभार्थीचे प्रस्ताव तपासता 3 लाभार्थीचे अनुसूचीत जातींचे तहसिलदार यांचे जातीचे दाखले उपलब्ध झालेले नाहीत.

2) ताडपत्री वाटप व विनियोगाबाबत पंचायत समिती, खेड, पंचायत समिती, मंडणगड येथील गटविकास अधिकारी यांचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे संबाधित लाभार्थ्यांना सदर साहित्याचा लाभ झाल्याची खात्री करता आली नाही.

3) 1 ते 9 तालुक्यांतील एकुण 603 लाभार्थीना ताडपत्री वाटप केलेली असून लाभार्थींच्या साहित्य मिळालेबाबतच्या पोहोच पावत्या लेखापरीक्षणात उपलब्ध झालेल्या नाहीत.

4) तसेच लाभार्थीची मास्टर नोंदवही गावनिहाय व तालुका निहाय ठेवणे आवश्यक असताना ती ठेवलेली नाही.

5) ताडपत्रीच्या गुणनियंत्रणाबाबत भारतीय मानांकन संस्थेच्या आयएसआय मानकानुसार तपासणीची कार्यवाही केलेली नाही.

**3.663 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण औषधे पुरवठातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पिक संरक्षण किटक नाशक औषधे प्रमाणक क्रमांक 87/31/3/2017 रूपये 4,99,544/- ची खरेदी करण्यात आली. सदरची औषधे प्रत्येक तालुकास्तरावर देण्यात आली. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) तांत्रिक मान्यता मधील अट क्रमांक 1 नुसार औषधे तालुकास्तरावर प्राप्त झालेनंतर 15 दिवसात लाभार्थ्यांना वितरीत करुन लाभार्थी हिस्स्याची 50 टक्के रक्कमेचा धनाकर्ष त्वरीत कृषी विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे जवळ जमा करण्यात यावा, असे आदेश असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) कृषी संचालक (वि. व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे 1 चे आदेश क्रमांक सीपीए/सकिना/द.स/2016-17, दिनांक 02/06/2016 मधील परिच्छेद 3.1 नुसार गुणवत्ता तपासणी पूर्ण झालेनंतर सदर औषधे वापरास योग्य असल्याचे झाल्यानंतर त्याचा पुरवठा विश्लेषण अहवाल सोबत देणे आवश्यक आहे. परंतु, असे दस्तऐवज सोबत नाहीत.

3) सदर आदेशातील कलम 13 नुसार शिल्लक साठा एक महिन्यात परत करावा. पिक संरक्षण मोहिम संपल्यानंतर पॅकिंगचा साठा परत करण्यात यावा. तसे केल्याचा कृषी विस्तार अधिकारी यांनी अहवाल कृषी आयुक्तालयास अहवाल देणे आवश्यक आहे. तथापी तसा अहवाल नाही.

4) सदर आदेशातील क मधील ई नुसार औषधाचे नाव, दिनांक, चलन, बॅच नंबर, उत्पादन दिनांक असे तपशिलवार नोंदीसह रजिस्टर ठेवण्यात यावे. परंतु, तसे ते ठेवण्यात आलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक 1082/645/34 दिनांक 29/07/1989 अन्वये पंचायत समितीकडून उपयोगिता प्रमाणपत्र व मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1094/सी.आर./ 1633/50, दिनांक 18/01/2005 अन्वये लाभार्थी हिस्सा त्याच वित्तीय वर्षात वसूल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.664 जिल्हा परिषद वाढीव उपकर योजनेंतर्गत शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सिंचन सुविधा पुरविणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद वाढीव उपकर योजनेंतर्गत शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सिंचन सुविधा पुरविणेकरीता रक्कम रूपये 2,22,300/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक सिंजिप/कृषि योजना-1/1601/2016, दिनांक 02/12/2016 चा असून पुरवठादार सावंत ॲग्रोटेक, हुंबरठ यांचा करार नसताना संबंधितांना पुरवठा आदेश कसा काय देण्यात आला, याचा खुलासा करावा.

2) पी. व्ही. सी. पाईप, कणकवली व दोडामार्ग गटविकास अधिका-यांकडे पोहोचविलेले आहेत. परंतु, सदरचे पाईप संबंधितांना केव्हा प्राप्त झाले, यांची संबंधिताची दिनांकित स्वाक्षरी नाही. त्यामुळे पुरवठा आदेशाप्रमाणे 30 दिवसांत साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक असताना साहित्य विहीत मुदतीत पोहोचल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

3) शक्ती समूह गट घोटगेवाडी 259 पाईप व शेतकरी समूह गट करंजे यांना 131 नग वाटप करावयाचे असताना संबंधित समूह गटाला पाईप पोहोच झाल्याची कोणतेही कागदपत्र कार्यनस्तीत नसल्याने सदरचे पाईप तालुका स्तरावर पडून आहेत, असे दिसून येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1084/ सी.आर.1633, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा वसुलीची कार्यवाही करणे बंधनकारक असताना संबंधित समूह गटाकडून लाभार्थी हिस्सा रुपये 74,100/- आजतागायत वसुल झाल्याचे दिसून आले नाही.

5) ज्या शेती समूह गटांना पाईपचा पुरवठा करुन झालेला आहे, त्या शेती समूह गटाच्या नावे शेती असलेबाबतची 7/12 वगैरे कागदपत्र कार्यनस्तीत उपलब्ध नाही.

6) पुरवठा केलेल्या साहित्याचे तांत्रिक तपासणीबाबत प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाही.

**3.665 शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी आईल इंजिन विद्युतपंप व पाईपसाठी अर्थसहाय्य.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी आईल इंजिन विद्युतपंप व पाईप खरेदीकरीता रक्कम रूपये 25,58,991/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेला दिलेल्या प्रशासकिय व तांत्रिक मान्यता आदेशावर जावक क्रमांक नमुद नाही.

2) प्रशासकिय व तांत्रिक मान्यता दिनांक 03/12/2016 रोजी दिली असताना पुरवठादाराला 24/11/2016 रोजी पुरवठा आदेश कसा काय देण्यात आला, याबाबत समर्पक खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधील अट क्रमांक 16 नुसार लाभार्थी हिस्सा पुरवठादार संस्थेस प्रत्येक खरीब व रब्बी हंगामानंतर जिल्हयातील एकूण प्रलंबीत लाभार्थी हिस्सा किती, याचा आढावा घेवून लाभार्थी हिस्स्याचा पुरवठादार संस्थेकडे भरणा करणे आवश्यक असताना तसे कागदपत्र लेखापरिक्षणात आढळून आले नाहीत. त्यामुळे लाभार्थी हिस्स्याची रक्कम रूपये 8,52,984/- पुरवठादार संस्थेकडे भरणा झाल्याची खात्री देता येत नाही.

4) सदर योजनेच्या नस्तीमध्ये मंजूर लाभार्थी यादी आढळून आली नाही.

5) पुरवठादाराकडुन प्राप्त एकुण 3HP पंप 123 व 5HP पंप 6 यांचे लाभार्थी शेतक-यांना वाटप झालेबाबतचे कागदपत्र लेखापरिक्षणात आढळून आले नाहीत. त्यामुळे सदर पंप विना वाटप पडून राहिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) योजनेच्या तांत्रिक आदेशात नमूद केलेप्रमाणे सिंचनाच्या सुविधेअभावी पिकांचे नुकसान होऊ नये, याकरीता विद्यूत पंप पुरवठा करणे, असा योजनेचा उद्देश आहे. मात्र गटस्तरावरील प्रस्तावात प्रस्ताव प्राप्तीचा दिनांक पुरवठा आदेश दिल्यानंतरचा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच 7/12 मध्ये विंधन विहीरीची व

लागवडीची नोंद नसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ योग्य लाभार्थीस झाला, असे म्हणता येत नाही.

### 3.666 75 टक्के अनुदानावर नारळ शिडी पुरविणे.

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** 75 टक्के अनुदानावर नारळ शिडी पुरविणेकरीता रक्कम रूपये 7,50,940/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेला दिलेल्या प्रशासकिय / तांत्रिक मान्यता आदेशावर जावक क्रमांक / दिनांक नमुद नाही.

2) तांत्रिक मंजुरी आदेशातील अट क्रमांक 5 नुसार लाभार्थ्यांकडुन लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम भरणा करुन घेऊन त्याचा धनाकर्ष पुरवठादाराच्या नांवे काढून कृषी विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्गकडेपाठवण्यात यावा. असे असताना लाभार्थी हिस्स्याची रक्कम पुरवठादारास अदा केलेबाबतचे कागदपत्र लेखापरिक्षणात आढळून आले नाहीत. त्यामुळे लाभार्थी हिस्स्याची रक्कम रूपये 2,50,310/- पुरवठादार संस्थेकडे भरणा झाल्याची खात्री देता येत नाही.

3) सदर योजनेच्या नस्तीमध्ये मंजूर लाभार्थी यादी आढळून आली नाही.

4) पुरवठादाराकडुन प्राप्त एकुण 445 नारळ शिडी यांचे यथा योग्य लाभार्थी शेतक-यांना वाटप झालेबाबतचे कागदपत्र लेखापरिक्षणात आढळून आले नाहीत. त्यामुळे सदर शिडी विना वाटप पडून राहिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) योजनेची नस्ती पडताळली असता तांत्रिक आदेशात नमूद केलेप्रमाणे अट क्रमांक 2 शेतकरी सिंधुदुर्ग जिल्हयातील रहिवासी असावा. अट क्रमांक 3 प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर औजरांचे वाटप करणेत यावे. अट क्रमांक 4 सर्व शेतक-यांना लाभ होणेच्या दृष्टीने प्रत्येक गटाने त्यांना पुरवठा केलेल्या नारळ शिडींचे वाटप शेतक-यांच्या मागणी अर्जाच्या अनुक्रमाने समान वाटप करावे. असे असताना तसे केलेबाबतचे कागदपत्र लेखापरिक्षणात आढळून आले नाहीत.

6) सदर योजनेच्या नस्तीमध्ये एकूण 445 लाभार्थींची कृषी समीतीने मंजूर केलेली लाभार्थी मंजूर यादी आढळून आली नाही. त्यामुळे मंजुर लाभार्थी संख्या निश्चित न करता 445 मळणी यंत्र खरेदी संयुक्तीक वाटत नाही.

### 3.667 शेतक-यांना उस लागवडीसाठी उस बियाणे / रोपांकरीता 50 टक्के अर्थसहाय्य देणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** शेतक-यांना उस लागवडीसाठी उस बियाणे / रोपांकरीता 50 टक्के अर्थसहाय्य देणे योजनेकरिता रक्कम रूपये 3,99,920/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेला दिलेल्या प्रशासकिय /तांत्रिक मान्यता आदेशावर जावक क्रमांक / दिनांक नमुद नाही.

2) तांत्रिक मंजुरी आदेशातील अट क्रमांक 3 नुसार शेतक-यांनी उस बियाणे / रोपे शेतक-यांकडुन खरेदी केलेले आहे. त्या शेतक-यांची / कृषी विद्यापीठ / उस संशोधन केंद्र / शासनमान्य रोप वाटीका किंवा उस सहकारी साखर कारखाने यांची बियाणे / रोपे खरेदीची पावती बहुतांश शेतक-यांचे प्रस्तावासोबत जोडलेले नाहीत.

3) प्रस्तावातील अट क्रमांक 5 नुसार उस लागवडी बाबतचे पंचायत समिती कृषी अधिकारी यांचा फोटोसह पहाणी अहवाल नाही.

4) प्रस्तावासोबत सादर केलेल्या 7/12, उता-यावर तलाठी यांची स्वाक्षरी नसताना लाभार्थी निवड कशी काय केली, खुलासा करावा.

5) प्रस्तावासोबत सादर केलेल्या 7/12 उता-यावर उस पिकाची नोंद नसताना 17 लाभार्थी निवड कोणत्या निकषान्वये करण्यात आली?

**3.668 जिल्हा परिषद सेस योजनतून 50 टक्के अनुदानावर कडबाकुटटी यंत्र पुरविणे योजनेतील अनियमितताबाबत**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी विभागामार्फत सन 2016-2017 मध्ये शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर जिल्हा परिषद सेस योजनतून 50 टक्के अनुदानावर कडबाकुटटी यंत्र पुरवठा करणे ही योजना राबविलेली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 24,92,289/- खर्च करण्यात आला आहे. सदर योजनेची नस्ती व गटस्तर लाभार्थी यांच्या प्रस्तावांची तपासणी केली असता, वरील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची तपासणी करता गटस्तरावर लाभार्थी शेतकरी यांच्या हिस्साची रक्कम पंचायत समितीकडे आगावु जमा केल्याचे पोहच पावत्या नस्तीसोबत आढळून आलेल्या नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्र.क्र.553/64/05 दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणा-या लाभार्थ्यांचे गटस्तरावर मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सदर औषधांचा दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

3) कृषि, पशुसंवर्धन दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.2017/4, दिनांक 05/06/2015 नुसार राबविल्या जाणा-या योजनांची प्रसिध्दी पंचायत समिती कार्यालयात देऊन ती यादी इंटरनेटवरसुध्दा प्रसिध्द करून योजनेला व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही विभागाने केल्याचे आढळून आलेले नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तुमास/2002/प्र.क्र.78/कर1412, दिनांक 07/10/2003 अन्वये सदर योजनेची फलश्रृती व मुल्यमापण अहवाल घेतलेला नाही

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/ प्र.क्र.2017/ 4 अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केलेप्रमाणे योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून केलेले नाही. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेबाबत व असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतर पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

6) कृषी साहित्याची मागणी करतांना पंचायत समिती स्तरावर लाभार्थी यादी तयार करून गट विकास अधिकरी यांचेमार्फत निवड करून आणि सर्व पंचायत समितीकडून लाभार्थी यादी प्राप्त करून त्यानुसार खरेदीचे प्रमाण संख्या निश्चित करून त्याप्रमाणे पुरवठा आदेशाने मागणी करणे आवश्यक होते. तथापि, पंचायत संमितीनी लाभार्थी निवडीची प्रक्रिया न करता केवळ अंदाजाने कृषी साहित्याची मागणी केल्याचे दिसुन येते. त्यामुळे केलेली खरेदी ही योग्य त्या प्रमाणत आणि लाभार्थ्याच्या मागणी नुसारच करण्यात आली, याविषयी खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पंरास/1064/सीआर-1633 दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितानाचा लाभार्थी हिस्सा रक्कम प्रथमत: वसूल करून नंतरच योजना राबविणे व नंतरच साहित्ये खरेदी करावे. असे असताना विभागाने लाभार्थी हिस्सा रक्कम साहित्य वाटपाचे वेळी वसूल केली असून जसाजसा वसूल होईल त्याप्रमाणे पुरवठादारास रकमा प्रदान केलेल्या आहेत. त्यामुळे उक्त शासन परिपत्रकतील आदेशाचे पालन झालेले नाही.

**3.669 जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्केच अनुदानावर शेतकऱ्यांना 3 एच पी विदयुतपंप पुरविणे.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** कृषी विभागामार्फत सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषदसेस योजनेतून 50 टक्केस अनुदानावर 3 एच पी विदयुतपंप पुरविणे ही योजना राबविलेली आहे सदर बाबत रक्कम रुपये 33,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1933/ 57, दिनांक 19/01/1995, नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसूल करुन तो जिल्हा निधीत जमा करणे आवश्यक असताना योजनेच्या पुढील वर्षात लाभार्थी हिस्सा वसूल केल्याचे दिसून येते. त्यामुळे शासन परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 50/4 नुसार प्राप्त रक्कमांबाबत नमुना नंबर 10 ची पावती संबधितांस देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्रक्र.553/64/05, दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे गट स्तरावर मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामळे साहित्याचा, दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तुमास/2002/प्र.क्र.78/कर1412, दिनांक 07/10/2003 अन्वये सदर योजनेची फलश्रुती व मुल्यमापन अहवाल घेतलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4 अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केलेप्रमाणे योजनेचे मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेकडून केलेले नाही. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेबाबत व असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतर पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 अनुक्रमांक 15 नुसार अवजारांचा पुरवठा -पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थांना अवजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसात अवजारांच्या देयकांची 90 टक्के रककम पुरवठा संसथेस अदा करण्यात यावी. अवजारांचे क्षेत्रीयस्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित 10 टक्के रक्कम संवधित पुरवठा संस्थेस अदा करण्यात यावी, असे नमुद असतानाही जिल्हा परिषदने दिनांक 31/03/2017 ला संस्थेस साहित्य प्राप्त होताच देयेके पारित केल्याचे नस्तीवरुन आढळुन आले आहे.

**3.670 वैयक्तीक लाभधारकाने ठराविक ब्रॅन्डची मागणी केली असता वेगळया मेकचा पुरवठा केलेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2015/प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 मधील अनुक्रमांक (I) अन्वये ज्या लाभधारकांनी ठराविक ब्रॅन्डची लेखी मागणी असेल, अशाच प्रकरणी सदर ब्रॅन्डचा पुरवठा करणे आवश्यक आहे. असे असतांना जिल्हा परिषद, धुळे कृषी विभागाने लाभार्थ्यांनी वैभव विळयांची मागणी केलेली असतांना त्यांना वैभव विळयाचे उत्पादन राहुरी कृषी विदयापीठ, अहमदनगर यांच्या दरपत्रकात असून त्यांना पुरवठा आदेश न देता लक्ष्मी टाईप विळयांचा जादा दराने असलेल्या पुरवठा संस्थेला पुरवठा आदेश देवून शासनाचे मोठया प्रमाणात आर्थीक नुकसान झालेले असून शेतक-यांची फसवणूक झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जादा दिलेला दर रुपये 34,245/- संबंधितांकडुन वसुलात आणून पुर्तता दर्शवावी.

**3.671 आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत/ TSP) अंतर्गत 90 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना 5 एच.पी.डिझेल ईजिन पुरवठा करणेबाबत केलेल्या साहित्य खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, नंदुरबार येथील कृषी विभागाकडील सन-2016-2017 मध्ये आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत/ TSP) अंतर्गत 90 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना 5 एच.पी.डिझेल इंजिन पुरवठा करणेसाठी रक्कम रुपये 6,80,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, तळोदा यांचेकडील साठा नोंदवहीत सदर साहीत्याची नोंद पान क्रमांक 104 दिनांक 27/01/2017 अशी घेण्यात आली आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 दरकरारात नमुद केलेप्रमाणे साहित्याची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या आत साहित्य पुरवठा करणे आवश्यक आहे. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या साहित्य किंमतीच्या 3 टक्के रककम दंडात्मक वसूली म्हणून पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसूल करण्यात

येईल, असे नमुद असतांना देखील दंडाची रक्कम कपात न करता संपूर्ण रक्कम सबंधीतास अदा करण्यात आलेली आहे. तरी सबंधीताकडून वरील अटीनुसार दंडाची रककम रूपये 20,400/- वसूल करुन पूर्तता दर्शवावी.

2) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क.विप्र-7/आऊयो/अंतरिममासु/16-16/209, दिनांक 11/04/2015 मधिल अट क्रमांक 4.7 अन्वये माहे जुन-2015 अखेर पावेतो लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्रक्र.553/64/05, दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे गट स्तरावर मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे साहित्याचा, दुबार लाभ दिला किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, अंतरिम मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-7/आउयो/अंतरिम मासु/15-16/209/2015, दिनांक 11/04/2015 अन्वेय अनुक्रमांक 6.6 नुसार एकूण मंजुर निधीपैकी 3 टक्के निधी अपंग शेतकऱ्यांनासाठी राखून ठेवावा. परंतू, असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेऊन इतर आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4 अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केलेप्रमाणे योजनेचे मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेकडून केलेले नाही. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेबाबत व असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतरत्र पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

6) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/ प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधिल परीशिष्ट क्रमांक 2 मधील अनुक्रमांक 15 मध्ये नमुद केलेप्रमाणे अवजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना औजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसात अवजारांच्या देयकाची 90 टक्के रक्कम पुरवठादारास प्रदान करणेत यावी व उर्वरीत 10 टक्के रक्कम अवजारांचे क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा करणेत यावी, असे स्पष्ट नमुद केलेले असतांना तसे करण्यात आलेले नाहीत. तसेच वाटप केल्याच्या नोंदी नाहीत.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तुमास/2002/प्र.क्र.78/कर1412, दिनांक 07/10/2013 अन्वये सदर योजनेची फलश्रुती व मुल्यमापन अहवाल घेतलेला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 50/4 नुसार प्राप्त रक्कमांबाबत नमुना नंबर 10 ची पावती संबधितांस देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

9) आयुक्त, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सूचना क्रमांक सीपीएस/पिसंऔ/गणि/ 07-08/गुणी-5, दिनांक 18/07/2007 मार्गदर्शक सूचना 08-09 दिनांक 04/08/2008 नुसार विविध स्तरावरील अधिका-यांचा स्थळ तपासणी अहवाल प्राप्त नसलेने योजनेवर नियंत्रण आणि योग्य लाभार्थ्यास लाभ दिलेबाबतची खात्री सत्यता पटत नाही.

**3.672 विशेष घटक योजना (SCP) अतंर्गत 90 टक्के अनुदानावर बैलगाडी पुरवठा करणेबाबतच्या योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,39,425/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, नंदुरबार यांचेकडील साठा नोंदवहीत सदर साहित्याची नोंद पान क्रमांक 120 वर घेण्यात आली असून त्यावर साहित्य जमा झाल्याबाबतचा दिनांक नमुद करण्यात आला नाही. तसेच गट विकास अधिकारी, नंदुरबार यांचेकडून जिल्हा परीषदेस प्राप्त डिलेवरी चलन क्रमांक 34252 वर साठा नोंदवहीवर पृष्ठ

क्रमांक 78 असे नमुद असून त्यावर दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. प्रत्यक्ष साठा नोंदवही व दिलेला दाखला यामधील साठा नोदवहीतील पृष्ठ क्रमांकमध्ये तफावत दिसून येते. याबाबत खुलासा सादर करावा.

2) डिलेवरी चलन क्रमांक 34252 वर नमुद केलेप्रमाणे खरेदी आदेश क्रमांक 1197 दिनांक 25/03/2017, असे नमुद आहे. तसेच सदर साहित्याचा चाचणी अहवालात देखील खरेदी आदेश क्रमांक 1197 दिनांक 25/03/2017, असे नमुद आहे व साहित्य चाचणी अहवालावर साहित्य पाठविल्याचा दिनांक 25/03/2017, असा नमुद आहे. म्हणजेच साहित्य दिनांक 25/03/2017 नंतर पंचायत समितीकडे प्राप्त झालयाचे दिसून येते.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4/ दरकराराप्रमाणे साहित्याची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या आत साहित्य पुरवठा करणे आवश्यक आहे. 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या साहित्य किंमतीच्या 3 टकके रककम दंडात्मक वसूली म्हणून पुरवठा संस्थेच्या देयकातून एकरकमी वसूल करण्यात येईल, असे नमुद असतांना देखील दंडाची रक्कम कपात न करता संपूर्ण रक्कम सबंधीतास अदा करण्यात आलेली आहे. तरी सबंधीताकडून वरील अटीनुसार दंडाची रककम रूपये 13,183/- वसूल करुन पूर्तता दर्शवावी.

4) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क.विप्र-7/आऊयो/अंतरिम मासु/16-16/209, दिनांक 11/04/2015 मधील अट क्रमांक 4.7 अन्वये माहे जुन-2015 अखेर पावेतो लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्रक्र.553/64/05, दिनांक 05/10/1989 नुसार योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे गट स्तरावर मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामळे साहित्याचा, दुबार लाभ दिला किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, अंतरिम मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-7/आउयो/अंतरिम मासु/15-16/209/2015, दिनांक 11/04/2015 अन्वेय अनुक्रमांक 6.6 नुसार एकूण मंजुर निधी पैकी 3 टक्के निधी अपंग शेतकऱ्यांनासाठी राखून ठेवावा. परंतू, असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेऊन इतर आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र.217/4 अे, दिनांक 03/06/2011 मध्ये सूचित केलेप्रमाणे योजनेचे मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेकडून केलेले नाही. वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेबाबत व असे लाभार्थी उपलब्ध न झाल्यास इतरत्र पात्र लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही आढळून आली नाही.

8) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/ प्र.क्र.218/11 अे, दिनांक 23/11/2015 मधील परीशिष्ठ क्रमांक 2 मधिल अनुक्रमांक 15 मध्ये नमुद केलेप्रमाणे अवजारांचा पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना औजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसात अवजारांच्या देयकाची 90 टक्के रक्कम पुरवठादारास प्रदान करणेत यावी व उर्वरीत 10 टक्के रक्कम अवजारांचे क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा करणेत यावी, असे स्पष्ट नमुद केलेले असतांना तसे करण्यात आलेले नाही. तसेच वाटप केल्याच्या नोंदी नाहीत.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तुमास/2002/प्र.क्र.78/कर1412, दिनांक 07/10/2013 अन्वये सदर योजनेची फलश्रुती व मुल्यमापन अहवाल घेतलेला नाही.

10) आयुक्त, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सूचना क्रमांक सीपीएस/पिसंऔ/गणि/ 07-08/ गुणी-5, दिनांक 18/07/2007 मार्गदर्शक सूचना 08-09 दिनांक 04/08/2008 नुसार विविध स्तरावरील अधिका-यांचा स्थळ तपासणी अहवाल प्राप्त नसलेने योजनेवर नियंत्रण आणि योग्य लाभार्थ्यास लाभ दिलेबाबतची खात्री / सत्यता पटत नाही.

उपरोक्त अनियमिततांची पूर्तता दर्शवून अनुपालन दर्शवावे

**3.673 विशेष घटक योजना सन 2016-2017 अंतर्गत निवड लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर सुधारीत एच.डी.पी.ई. वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** कृषी विभाग जिल्हा परिषद जळगांवचे विशेष घटक योजना सन 2016-2017 अंतर्गत निवड लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर सुधारीत एचडी.पी.ई. वाटपावर रुपये 37,81,855/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साहित्याची मागणी नोंदविणेपूर्वी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/555/ दिनांक 05/09/1989 आणि पंरास-1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी निवड पध्दती ठरवून दिलेली आहे. त्यानुसार योजना राबविलेली नाही.

2) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/ प्र.क्र158/11अे, दिनांक 23/11/2015 मार्गदर्शक सूचनेन्वये साहित्याचे वाटपानंतर प्रत्यक्ष गटनिहाय महाराष्ट्र कृषी अधिकारी - गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सर्व गटनिहाय लाभार्थी एकत्रीतपणे तपासणी केल्याचे आढळून आले नाही.

3) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015/ प्र.क्र158/11अे, दिनांक 23/11/2015 अनुक्रमांक 19 नुसार साहित्याची खरेदी करणेपूर्वी खुल्या बाजारातील दरांशी तुलना करुन आर्थिकदृष्टया लाभार्थ्यांना लाभदायक ठरेल (जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देता येईल) अशी खरेदी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/सीआर-2239/34/ 67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस लाभ दिल्यानंतर सक्षम अधिकाऱ्यांनी पाहणी करुन साहित्याचा उपयोग योग्य प्रकारे होत असून लाभार्थीची आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली? याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असताना असा अहवाल दप्तरी नाही. तरी तपासणी अधिकाऱ्यांचा अहवाल उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारंण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/ 74 दिनांक 20/10/1995 नुसार लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता असल्याबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

6) भारतीय मानक संस्था (बीआयएस) साहित्य पुरवठा संस्थेने उत्पादकांच्या बीआयएस प्रमाणपत्राची वैधता तपासणी कामी प्राप्त झालेली नाही.

7) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2015 / प्र.क्र218/11अे, दिनांक 23/11/2015 अन्वये अनुक्रमांक 19 ब नुसार मागणी नसलेल्या अवजारांची कोणत्याही परिस्थितीत खरेदी करण्यात येऊ नये. सदर जादा साहित्य खरेदीबाबत सर्वस्वी जबाबदारी कृषी विकास अधिकारी यांची राहील, असे नमुद असून देखील पंचायत समिती बोदवड मुक्ताईनगर, पारोळा, पाचोराकडील मागणीपत्रामध्ये नमूद एचडीपीई पाईपची मागणी ही रुपये 10,000/- चे मर्यादेत असताना त्यानुसार पुरवठा करणे आवश्यक असताना रूपये 20,000/- चे मर्यादेत पुरवठा केल्याचे दिसते. याबाबत खुलासा करावा.

**3.674 जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबाकुटटी पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** कृषी विभागामार्फत सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के शेतक-यांना कडबाकुटटी पुरवणे हया योजनेवर रक्कम रुपये 74,95,965/- खर्च करण्यात आला आहे. खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेतः-

1) जिल्हा परीषद सर्वसाधारण सभा दिनांक 21/06/2016 च्या सभेस त्यांच्याकडील ठराव क्रमांक 690 अन्वये रूपये 75 लक्षाचा निधी कडबाकुटटी यंत्र खरेदी कामी उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली. तथापि, मुळ खरेदी रक्कम ही रूपये 1,49,91,930/- आहे व ठराव मंजुरी रूपये 75 लक्ष रक्कमेची आहे. तरी मुळ खरेदी रक्कमेला मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही नाही. तरी उर्वरित रक्कम रूपये 74,91,930/- ला मंजुरी घेण्यात यावी.

2) कृषी विभागाच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती, राहाता 1 नग कडबाकुटटी वाटपा अभावी शिल्लक असल्याचे आढळून आले. 1 नग कडबाकुटटी त्वरीत संबंधित लाभार्थ्यास वाटप करुन त्यांची पोहोच स्वाक्षरी घेऊन त्यांचेकडून लाभार्थी हिश्याची रक्कम प्रती नग रुपये 9,549/- वसूल करुन ती पुरवठादारास प्रदान करुन त्यांची पोहोच घ्यावी.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/ सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस लाभ दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन वाटप साहित्याचा उपयोग योग्य प्रकारे होत असून लाभार्थीची आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली, याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असताना असा अहवाल दप्तरी नाही. तरी तपासणी अधिका-यांचा अहवाल उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलासंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/ प्र.क्र. 1239/34 दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वित्तीय वर्षात सदर साहित्य लाभार्थीस वाटप करणे बंधनकारक असतांना पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहया पाहता खरेदी साहित्य विलंबाने वाटप केल्याचे आढळून आले.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1064/सीआर-1633 दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा रक्कम प्रथमत: वसूल करून नंतरच योजना राबविणे व नंतरच साहित्य खरेदी करावे, असे असताना विभागाने लाभार्थी हिस्सा रक्कम साहित्य वाटपाचे वेळी वसूल केला असून जसे साहित्य वाटप होउन वसूल होईल, त्याप्रमाणे पुरवठादारास रकमा प्रदान केलेल्या आहेत. त्यामुळे उक्त शासन परिपत्रकातील आदेशाचे पालन झालेले नाही.

6) तालुक्याकडील साठा नोंदवहीची तपासणी केली असता अनियमितता आढळल्या. तरी साहित्य वाटप साठा रजिस्टरवर लाभार्थी सही नसणे, हे लाभार्थीने साहित्य घेतले नसल्याचे दिसते. तरी रक्कम रुपये 9,549/- संबंधितांकडून वसुलात आणावी.

7) कडबाकुटटी खरेदी एकूण बिल प्रमाणक रक्कम रूपये 74,95,965/- असुन यात 50टक्के लाभार्थी हिस्सा नाही. ताडपत्री खरेदी मुळ खरेदी बिल रक्कम रूपये 1,49,91,930/- असुन सदर बिलावर आयकर कपात करणे आवश्यक असतांना रूपये 74,95,965/- वर आयकर रूपये 1,72,407/- कपात केली. उर्वरित 50 टक्के रक्कमेवरील आयकर रूपये 1,72,407/- कपात केला नाही. तरी आयकर वसुल करावा.

8) ठेकेदाराकडून रूपये 14,000/- चे मुद्रांक घेणे आवश्यक असतांना रूपये 6,600/- चे घेतले आहे. तरी फरक रूपये 7,400/- वसुलात आणावा.

**3.675 केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत शिल्लक साहित्याचे वाटप करण्याकरीता जिल्हा परिषदसेस निधी मधून तरतूद करून पूरक अर्थ सहाय्याची नियमबाहय योजना राबविणेबाबत**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,66,454/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1064/ सीआर-1633, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना प्रथमत: केंद्र पुरस्कृत योजने करीता 75 टक्के लाभार्थी हिस्सा वसूल करावा. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग. शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र. 446 /वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परीशिष्ट ई नुसार 31 मे पर्यंत लाभार्थी निवड करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. यावरून सदरची योजना राबवितांना योग्य नियोजन न करता सन 2014-2015 मध्ये मोठया प्रमाणवर साहित्य खरेदी केल्याने जिल्हा परिषदेचा केंद्र शासनाचे अनुदान खर्च करण्याचा उददेश स्पष्ट होतो. सदर योजना राबवितांना प्रत्यक्षात 75 टक्के लाभार्थी हिस्सा जमा न केल्यामुळे सन 2015-2016 अखेर बॅटरी ऑपरेटर स्प्रेपंप 132 नग व एचटीपी स्पे पंप 122 नग शिल्लक राहिले आहे. केंद्र पुरस्कृत योजनेचे शासन आदेशानुसार योग्य नियोजन न करता शिल्लक

साहित्याकरीता नियमबाहय पुरक अर्थ सहाय्याची उपरोक्त योजना राबवून केलेला खर्च रुपये 3,66,454/- संबधीताकडून त्वरीत वसुल करुन जिल्हा परिषद सेस खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**3.676 दुबार लाभ दिल्याबाबत**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** विशेष घटक योजनेतून अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभ घटकांची पंचायत समिती, दौंड, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील साठा नोंदवहया, लाभार्थी यादी यांची चाचणी दाखल पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्रं.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय व लाभार्थीनिहाय तसेच प्रवर्ग निहाय व कुटुंबनिहाय नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. म्हणजे एकाच कुटुंबात दुबार लांभ दिला जाणार नाही. परंतु, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही

2) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक विघयो-1516 /प्रक्र240/4ए, दिनांक 30/07/2016चे परिशिष्ठ-दोन मधील अटी व शर्तीनुसार व संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना जाक्र.वि.प्र-7/आउयो/मासु/16-17/432/2016 दिनांक 19/08/2016 मध्ये विविक्षित केलेली अनुक्रमांक 19 मधील लेखा पद्धतीनुसार जिल्हा कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांची नोंद मास्टर नोंदवहीत ठेवणे बंधनकारक आहे. नोंदवहीची तपासणी कृषि विकास अधिकारी यांनी महिन्यातून एकदा करून त्यातील नोंदी साक्षांकित कराव्यात, असे असताना अशी मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच पंचायत समिती स्तरावरील नोंदवहया व अभिलेख जिल्हा कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी भेटीच्या वेळी तपासून तशी नोंद पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीमध्ये करावी. याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे दिसते. त्यामुळे चाचणी लेखापरीक्षणात एका लाभार्थ्यास दुबार लाभ असे असताना आलेली नाही. त्यामुळे एका लाभार्थ्यांला दुबार लाभ/ एकाच कुटुंबात दुबार लांभ/चुकीच्या लाभार्थ्यास लाभ दिला गेला नसता.

विशेष घटक योजने अंतर्गत एका लाभार्थ्यांला दुबार लाभ/ एकाच कुटुंबात दुबार लांभ/चुकीच्या लाभार्थ्यास लाभ दिला असल्याचे दिसते.

तरी कागदोपत्री पुरावे उदा.लाभार्थी निवड यादी, आधार कार्ड, 7/12 उतारा, राशन कार्ड या आधारे एका लाभार्थ्यांला दुबार लाभ/ एकाच कुटुंबात दुबार लांभ/चुकीच्या लाभार्थ्यास लाभ दिला नसल्याचे दाखवावे. अन्यथा रक्कम रूपये 50,000/- संबंधीताकडून वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

तसेच इतर पंचायत समित्या व विभागाकडील योजनांचे मागील 5 वर्षाचे अभिलेखे पडताळणी करून दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**3.677 पी.व्ही.सी.पाईप पुरवणे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** विशेष घटक योजनेतून अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत पी.व्ही.सी.पाईप पुरवणेकरिता रककम रूपये 1,56,87,848/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराने माल पुरवण्याबाबत केलेल्या करारनाम्यातील मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे पर्चेस मेन्युअल 1978 चे कलम 10(अ) नुसार पुरवठ्याच्या कामी बाकी साहित्याच्या किंमतीच्या 0.50 टक्के इतका दंड इतका वसूल करण्यात येईल असे असताना अतिरिक्त मुख्य अधिकारी यांनी पुरवठादारास पुरवठ्यास होणाऱ्या विलंबाबाबत पाठविलेल्या कारणे दाखवा नोटीस जा.क्र.जिल्हा परिषद /कृषि/विघ्यो/100/2016, दिनांक 28/06/2016 अन्वये नंतर पुरवठादाराने दिनांक 29/06/2016 चे पत्रान्वये कच्च्या मालात दरवाढ झाल्याने दर वाढवून मागितला असता करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुरवठादारास मुदत संपल्याच्या दिनांकापासून

दंडात्मक कारवाई वा काळ्या यादीत न टाकता पत्रात नमूद परिस्थितीचा साकल्याने विचार करून जा.क्र.जिल्हा परिषद /कृषि/विघ्व्यो/101/2016, दिनांक 29/06/2016 अन्वये दिनांक 28/06/2016 पर्यंत मुदतवाढ देऊन उर्वरित कालावधीसाठी विलंबासाठी दंड आकारला आहे. तथापि, पुरवठादाराने मुदत संपण्यापुर्वी उपरोक्त पुरवठ्याबाबत असलेल्या नियमानुसार किमान 15 दिवस अगोदर पुरवठ्यास असमर्थ असलेबाबत कळविणे आवश्यक होते. त्यामुळे पुरवठयाची मुदत दिनांक 29/04/2016 ते कारणे दाखवा नोटीस दिनांक 28/06/2016 दरम्यानच्या 8.5 आठवड्याचा महाराष्ट्र शासनाचे पर्चेस मेन्युअल 1978 चे कलम 10(अ) नुसार पुरवठ्याच्या साहित्याच्या किंमतीच्या 0.50 टक्के इतका दंड न आकारल्याने शासनाचे रक्कम रूपये 1,56,87,848/- प्रती आठवडा 0.50 टक्के दराने रक्कम रूपये 6,66,734/- इतक्या रक्कमेचे नुकसान झालेले आहे. तरी संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून रक्कम रुपये 6,66,734/- वसूल करून शासन सदरी भरणा केलेचे दाखवावे.

2) महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 96 नुसार माल खरेदीचे बिल देण्यापूर्वी नियम 50 अन्वये मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याने ते बिल ज्या वस्तू बद्दलचे असेल, त्या वस्तू योग्य त्या मालसंग्रह लेख्यात किंवा मालमत्ता नोंदवहीत नोंदल्या आहेत आणि नोंदवहीतील नोंदीचा संदर्भ बिलावर उदधृत केला आहे, हे पाहिलं व उपबंधाचे पालन न केल्याने पेसे देण्याचा आदेश देणारा अधिकारी जबाबदार राहील.

3) महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार माल खरेदीचे बिल दिल्यानंतर पुरवठा बिले दुसऱ्यांदा अनवधानाने किंवा अन्यठिकाणी वापरली जावू शकणार नाहीत, अशा तऱ्हेने विरूप करण्यात येईल. विषेशतः पुरवठ्याच्या बाबतीत पुरवठा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पैसे देण्यापूर्वी सामान वस्तू चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्याची योग्य त्या संग्रह नोंदवहीत किंवा संख्यात्मक लेख्यात नोंद घेण्याचे प्रमाणपत्र नोंदवहीतील किंवा पृष्ठकांचा लेख्यातील संदर्भ बिलावर नोंदवून ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) चलनावर क्रमांकात उपरीलेखन केले आहे. तसेच पुरवठा चलनावर पुरवठादाराची स्वाक्षरी तसेच नसल्याने व ते विरूप केलेले नसल्याने सदर चलन मान्य करता येत नाही. त्यामुळे त्याचलनाने पुरवठा साहित्य 150 (90mm) नग पी.व्ही.सी.पाईप प्रती नग रक्कम रूपये 409/- याप्रमाणे रूपये 61,350/- इतकी रक्कम संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून वसूल करणे आवश्यक आहे.

5) 3 चलनांवर दिनांक 10/11/2016 नमूद असल्याने त्या कालावधीअखेर दंड वसूल केल्याचे दाखवावे.

6) 2 चलनांवर दिनांक 11/069/2016 व 12/06/2016 नमूद असताना दंडाची आकारणी अनुक्रमांक दिनांक 11/08/2016 व 12/08/2016 का करण्यात आली?

### 3.678 अपहारीत रकमेची वसूली न केलेबाबत.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद सातारा सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात आस्थापना विभागाकडील सेवापुस्तके व वेतनदेयकांची तपासणी करता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक आकृवि-2008/प्र.क्र. 59/जल10, दिनांक 16/09/2010 नुसार श्री पी. व्ही. पवार, कृषी अधिकारी यांचेकडून अपहारीत रक्कम रूपये 83,952/- वसूल करणेसंबंधी आदेश आहेत. त्यानुसार सेवापुस्तकातील नोंदी पाहता केवळ रूपये 10,000/- इतक्याच रकमेची वसूली झालेचे दिसून येत असून अदयाप रूपये 73,952/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेचे दिसून येत नाही. यावरुन शासन निर्णयांची गांभीर्याने अंमलबजावणी होत नसलेचे लेखापरीक्षणास दिसून येते. सदर बाब गंभीर असून इतक्या प्रदीर्घ कालावधीअखेर अपहारीत रक्कम वसूल न करण्याबाबत समर्पक खुलासा करण्यात आला नाही.

**3.679 DBT अंतर्गत कॅनव्हास ताडपत्रीसाठी अनुदान देणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर योजनेतून एकूण 1,052 लाभार्थ्यांना रूपये 1,500/- प्रमाणे प्रमाणक क्रमांक 393 दिनांक 31/03/2017 रूपये 15,78,000/- अन्वये अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्वच्या सर्व 1,052 लाभार्थ्यांनी ताडपत्री मे. डेझी इंडस्ट्रीज, मुंबई यांचेकडून खरेदी केलेबाबत बिले सादर केलेली असून सदर बिलांवरील वॅट नोंदणी क्रमांक 24250502962 हा शासन संकेतस्थळावर उपलब्ध नाही. वॅटबाबतची सक्षम कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

2) मंजूर 1,052 लाभार्थ्यांपैकी एकाही लाभार्थ्याने स्थानिक बाजारपेठेतून अथवा जिल्हयातील दुकानातून साहित्य खरेदी करुन प्रस्ताव सादर न करता मुंबईतील पुरवठादाराकडून 3,330/- रुपयाची खरेदी करणे ही बाब संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे केवळ सदर पुरवठादाराकडूनच खरेदी केल्यास योजनेत पात्र होईल, याबाबतचे बंधन लाभार्थ्यावर घातले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) लाभार्थी प्रस्तावांची जिल्हा परिषद स्तरावर छानणी होणे व त्यांनतरच लाभार्थी पात्र करणे आवश्यक असताना पंचायत समितीस्तरावरुन आलेल्या सर्व प्रस्तांवाना कोणत्याही छाननीशिवाय सरसकट मंजूरी दिल्याचे दिसून येते.

**3.680 जिल्हा परिषद स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना 5 एच पी इलेक्ट्रीक मोटर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** कृषी विभाग जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील जिल्हा स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर 5 एच.पी. इलेक्ट्रीक मोटर खरेदी करणेकामी प्रमाणक क्रमांक 156, दिनांक 23/03/2017 अन्वये रक्कम रुपये 12,49,500/- झालेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-2014 /प्र.क्र.82 /भाग-3/ उदयोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.1 अन्वये बाजार दराशी तुलना करुन साहित्य खरेदीबाबत सुचना केल्या आहेत. सदरप्रमाणे स्थानिक बाजारपेठेतील विक्रेत्यांचे दरपत्रक प्राप्त झाले आहे. तथापि, त्यावर क्रमांक व दिनांक नमूद नाही. शिवाय स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रक मागविणेसाठीचे पत्रव्यवहार नस्तीसोबत उपलब्ध झालेला नाही.

2) तालुकानिहाय मागणी व लाभार्थी यादींची पाहणी केली असता, पंचायत समिती, कवठे महांकाळ, पंचायत समिती, जत, पंचायत समिती, आटपाडी व पंचायत समिती, मिरज यांची पंचायत समिती स्तरावरील मागणी व लाभार्थी यादी उपलबध झाली नाही. तथापि, पुरवठा आदेशानुसार पंचायत समिती, कवठे महांकाळ यांस 12 नग, पंचायत समिती, जत यांस 21 नग, पंचायत समिती, आटपाडी यांस 7 नग व पंचायत समिती, मिरज 14 नग पुरवठा करणेबाबत नमूद केले आहे. सदर तालुक्यांची लाभार्थी यादी नसताना काय आधारे पुरवठा केला? खुलासा करावा. तसेच पंचायत समिती, मिरज, पंचायत समिती, शिराळा व पंचायत समिती, खानापूर यांच्याकडून प्राप्त लाभार्थी यादीवर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची स्वाक्षरी नाही.

3) ठराव क्रमांक 384 नुसार पुरवठा आदेश देण्याअगोदर सदर नगांचे नमुना कृषी सभापती व सदस्य यांना दाखवून पुरवठा आदेशाची अंमलबजावणी व्हावी, असे नमूद आहे. सदरप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक परास 1084/ सी.आर.1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्स्याची रक्कम योजना राबविण्यापूर्वी जमा करणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थी हिस्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1093/प्र.क्र./1239 / 37, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थींचे गावनिहाय जिल्हास्तरावर मास्टर नोंदवही आवश्यक असता ती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थीला दुबार लाभ दिला किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास /1094/ सी.आर.2239/34, दिनांक 01/01/1983 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थीच्या आर्थिक स्थितीमध्ये काय सुधारणा झाली? याबाबतचा फलश्रुती अहवाल घेतला नाही.

7) कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक 04/10/2013 चे मार्गदर्शक सूचनानुसार कृषी विकास अधिकारी यांनी अवजारांच्या पुरवठयाच्या संख्येनुसार रूपये 10,000/- पेक्षा कमी किंमतीच्या अवजारांचे एकूण पुरवठा संख्येच्या 2.50 टक्के रूपये, 10,000/- ते 50,000/- पर्यंत किमंतीच्या अवजारांकरीता एकूण पुरवठा संख्येच्या 1.5 टक्के व रूपये 50,000/- पेक्षा जादा किंमतीच्या अवजारांकरीता एकूण पुरवठा संख्येच्या 0.50 टक्के रँडम पध्दतीने नमुने क्षेत्रीय स्तरावर काढून त्याची गुणवत्ता तपासणी अहवालाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

8) लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करून लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने झाल्याची खात्री करून द्यावी.

9) पुरवठा आदेश अट क्रमांक 11 नुसार कृषी महाविद्यालय / शासकीय आभियांत्रिकी महाविद्यालय याचेकडून पुरवठा केलेले नग तपासणीबाबत नमूद केलेले आहे तथापि, इन्सपेक्शन रिपोर्ट हा महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ, उस्मानाबाद व लक्ष्मी द्रकेन काम्पोनंठ प्रायवेट लिमिटेड, सोलापूर यांचा आहे. इन्सपेक्शन रिपोर्ट अहवालाची पाहणी केली असता, सदरमध्ये पुरवठा आदेश क्रमांक 683 दिनांक 30/11/2016 नग 119 असे नमूद आहे. तथापि, पुरवठा आदेशामध्ये पुरवठा आदेश क्रमांक 2778 दिनांक 03/12/2016 असा नमुद आहे. सदरच्या इन्सपेक्शन रिपोर्ट अहवालात नमूद पुरवठा आदेश व प्रत्यक्ष पुरवठा आदेश हा एकच असल्याबाबत साधार खुलासा करावा.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सकिर्ण 2007/प्र.क्र.4871/ वित्त 3, दिनांक 25/06/2015 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना एकुण लाभार्थ्यांपैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावे, असे असताना सदर प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.681 जिल्हा परिषद स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानातून HTP पंप पुरविणे**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** कृषी विभागाचे जिल्हा परिषद, सांगलीचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षण करताना कृषी विभागाकडील जिल्हा परिषद स्विय निधीमधून 50 टक्के अनुदानावर एच.टी.पी.पंप पुरविणेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविणेसाठी पंचायत समिती स्तरावरुन लाभार्थीनिहाय यादया मागविण्यात आल्या होत्या व सदरची खरेदी ई - निविदा प्रक्रीयेद्रवारे करण्यासाठी दैनिक पुढारी, दैनिक सकाळ व दैनिक अग्रदुत या वृत्तपत्रांमध्ये ई - निविदा प्रसिध्दी जाहिरात देण्यात आली होती. ग्रामविकास विभाग, शासन पत्र क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.9/सिकाना, दिनांक 06/12/2016 अन्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद यांना दिनांक 05/12/2016 नंतर कोणत्याही प्रकारे वस्तु खरेदी करण्यासाठी आदेश निर्गमित करु नयेत व वस्तु खरेदीसाठी निविदा प्रक्रीया सुरु असल्यास निविदा प्रक्रीया ज्या स्थितीत असेल, त्या स्थितीत तात्काळ रदद करणेबाबत सुचित केले आहे. सबब सदरची ई - निविदा द्वारेची खरेदी प्रकीया रदद केली. तथापि, शासन निर्णय क्रमांक डीसीटी/2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 नुसार लाभार्थ्यांच्या खात्यावर खरेदी केलेल्या साहित्याची रक्कम अदा करणेबाबतची योजना राबविण्यात आलेली नाही. सबब सदर लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

2) सदरचा जाहिरातीचा/प्रसिध्दीचा खर्च प्रमाणक क्रमांक 1447 दिनांक 31/03/2017 रक्कम रुपये 4,896/- हा हस्तांतर निधीमधुन खर्ची टाकण्यात आलेला आहे. सदरची योजना जिल्हा परीषद स्विय निधीची असताना शासन निधीमधून जाहिरात/प्रसिध्दीचा खर्च कसा केला? खुलासा करावा.

**3.682 50 टक्के अनुदानावर जैविक सेंद्रिय व असेंद्रिय निविष्ठा पुरविणे अंतर्गत औषधे खरेदीबाबत**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** 50 टक्के अनुदानावर जैविक सेंद्रिय व असेंद्रिय निविष्ठा पुरविणे अंतर्गत औषधे खरेदीकरिता रक्कम रूपये 2,99,860/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी संचालक (नि. व गु.नि) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक सीपीएस/राकिनादर/2016-2017/263/गुनि5/2016, दिनांक 02/06/2016 मधील बाब क्रमांक 1 अन्वये शासकीय योजनाखालील पुरवठयाचे दर खुल्या बाजारातील त्याच दर्जाच्या किटकनाशकाच्या दरापेक्षा जास्त रहाणार नाहीत याची खात्री करण्याच्या उद्देशाने खुल्या बाजारातील दराची चौकशी करावी, असे नमूद आहे. तथापि, चौकशी केलेची कागदपत्रे नस्तीसोबत उपलब्ध नाहीत.

2) पुरवठा आदेशात किटकनाशके पुरविणेबाबतची कालमर्यादा निश्चित केलेली नसलेमुळे विहित वेळेत पुरवठा झाला अगर कसे, याची खात्री करता येत नाही.

3) सदर कृषी आयुक्तालयाच्या दरकरारातील दरानुसार हेक्झाकोनेझॉल 5 टक्के एसी औषधाची 500 ML ऐवजी 1 लिटर पॅकींगमध्ये खरेदी केली असती, तर एकूण खरेदी 609.500 लिटरमध्ये रक्कम रुपये 21,942/- मोनोक्रोराक्रॉस 36 टक्के SL या औषधाची 250 ML ऐवजी 1 लिटरमध्ये खरेदी केली असती, तर रुपये 24,981/- ची, कार्बनडॉयझीम 50WDP या औषधाची 100 ग्रॅम ऐवजी 1 किलो मध्ये खरेदी केली असती, तर रक्कम रुपये 11,554/- व क्लोरोपायरीफॉस 20 टक्के EC 500 ML ऐवजी 1 लिटर खरेदी केली असती, तर रककम रुपये 7,395/- अशी एकूण रुपये 65,872/- ची बचत झाली असती. तथापि, तशी कृती झालेली नाही.

4) किटकनाशके प्राप्त झालेबाबत पुरवठादार यांचेकडील पोहोच दिनांक व स्टॉक बुकातील नोंदी घेतलेच्या दाखल्यावरील नोंदी यामध्ये तफावती दिसुन आल्या.

**3.683 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पारंपारिक अवजारे पुरविणे (पाटी, खोरे, टिकाव व पहार)**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पारंपारिक अवजारे पुरविणेकरीता रक्कम रूपये 11,42,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील भाग 2 अनुक्रमांक 2 अन्वये अवजारांचे वाटप अल्प, अत्यल्प भुधारक व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्याने करणेत यावे तसेच अपंग शेतकऱ्यांना 3 टक्के मर्यादेत लाभ देण्यात यावा, असे नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली अगर कसे, हे समजून येत नाही.

2) उपरोक्त पुरवठा आदेशानुसार चंदगड गटाकडे 150 नग पुरविणेबाबत सुचित केले होते. तथापि, उपलब्ध नस्तीची पडताळणी केली असता पुरवठादार यांनी संबधित गटाकडे साहित्य पुरवठा केलेबाबतचे डिलिव्हरी चलन तसेच स्टॉक बुक दाखला नस्तीसोबत उपलब्ध नसलेने 150 नगाकरिता रुपये 625/- प्रती नगाचे रुपये 93,750/- वसुली होणे आवश्यक आहे.

**3.684 राज्य पुरस्कृत फलोत्पादन पिक संरक्षण कार्यक्रम सन 2016-2017 अंतर्गत आंबा, केळी, मिरची व बटाटा पीक संरक्षणासाठी औषधे खरेदीबाबत (50 टक्के अनुदानावर).**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** राज्य पुरस्कृत फलोत्पादन पिक संरक्षण कार्यक्रम सन 2016-2017 अंतर्गत आंबा, केळी, मिरची व बटाटा पीक संरक्षणासाठी औषधे खरेदीकरिता रक्कम रूपये 2,19,783/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशात किटकनाशके पुरविणेबाबतची कालमर्यादा निश्चित केलेली नसलेने विहित वेळेत पुरवठा झाला अगर कसे, याची खात्री करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2016/प्रक्र9/ वित्त 9, दिनांक 19/05/2016 अन्वये जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी उणीवाबाबत सुचना क्रमांक 1 अन्वये कृषी विभागाने काटेकोरपणे नियोजन करणे आवश्यक आहे.

सुचना क्रमांक 2 नुसार योजनांचा निधी नियमानुसार व निकषानुसार खर्च करणेची जबाबदारी कृषी विभागाची राहील व सुचना क्रमांक 3 अन्वये विहीत कालमर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) वित्त विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील टिपणी दिनांक 10/10/2016 मधील बाब क्रमांक 10 मध्ये नमूद केलेप्रमाणे या योजनेअंतर्गत खर्च झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मोहिम संपल्यानंतर एक महिन्याचे आत कृषी विकास अधिकारी, यांनी कृषी आयुक्तालयास सादर करणेविषयी सुचित केले आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4) जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना 2016-2017 मार्गदर्शक सूचना अनुक्रमांक 2 लाभार्थी निवडीबाबत अनुसुचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा व लाभार्थी अल्पभुधारक/सिमांतीक असल्यास प्राधान्य द्यावे, असे नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली अगर कसे, हे समजून येत नाही.

5) सदर कृषी आयुक्तालयाच्या दरकरारातील दरानुसार 250 ML व 500 ML मात्रा ऐवजी 1 लिटर मात्रामध्ये व ग्रॅमऐवजी किलो मात्रामध्ये खरेदी केली असती, तर बचत झाली असती. तसे न केलेने रक्कम रुपये 49,158/- अतिप्रदान झाले.

**3.685 डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेमधून लाभार्थ्यांना ताडपत्री पुरवठा करणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेमधून लाभार्थ्यांना ताडपत्री पुरवठा करणेकरिता रक्कम रूपये 3,69,489/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साहित्याबाबत शेतकरी लाभार्थ्यांचे मागणी प्रस्ताव दप्तरी नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे साहित्याची मागणी योग्य होती किंवा कसे, याचा खुलासा लेखा परीक्षणास करता येत नाही. मागणीनुसार पुरवठा झाला किंवा कसे, याचा खुलासा होत नाही.

2) प्रत्यक्ष लाभार्थ्याच्या ताब्यात साहित्य मिळाल्याची पोहोच दप्तरी उपलब्ध नाही. त्यामुळे गट स्तरावर किती व कोणत्या लाभार्थ्यास लाभ दिलेला आहे ? याचा खुलासा होत नाही. योग्य व पात्र लाभार्थ्यांनाच लाभ दिला आहे किंवा कसे ? याचा खुलासा होत नाही.

3) आदिनाथ पॉलिफॅब प्रा. लि. यांनी सादर केलेले दिनांक 07/08/2014 रोजीचे भारतीय मानक ब्युरो, यांनी दिलेले कंपनीचे लायसन्स हे दिनांक 24/07/2016 पर्यंत मान्य ( valid ) आहे. सबब मुदतबाह्य लायसन्स असलेल्या कंपनीला पुरवठा आदेश कोणत्या आधारे दिला? याचा खुलासा होत नाही.

4) पुरवठादाराकडून सादर केलेले delivery challan वर माळ पाठविल्याचा दिनांक नमूद नाही. vehicle No. MH 04 EL 3115 आहे. पुरवठादाराकडून दिनांक नमूद केलेले नाहीत. त्यामुळे केलेली delivery ही पुरवठ्याच्या अंतिम दिनांकाच्या नंतर म्हणजे दिनांक 25/11/2016 नंतर पुरवठा केला आहे. त्यामुळे विलंब आकार रुपये 10,556/- वसूल करणे आवश्यक आहे. परंतु, फक्त रुपये 1,722/-- दंड वसूल केला आहे. कमी वसूल रुपये 8,834.82 वसूल करून शासन निधीत भरणा करावे.

5) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरीत्या होण्याच्या दृष्टीने विभागीय कृषी सहसंचालक यांनी 0.75 टकके व कृषी अधिकारी यांनी 5 टक्के व जिल्हा कृषी अधिकारी यांनी 10 टकके तसेच कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती स्तर यांनी 10 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. सदर तपासणीचा अहवाल दप्तरी नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास / प्र.क्र.1239 / 34, दिनांक 09/01/1993 नुसार वाटप केलेल्या साहित्याची पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष खात्री करून लाभार्थ्याची आर्थिक स्थिती अहवाल तयार करावयाचा आहे. परंतु, असा अहवाल दप्तरी, नस्तीसोबत नाही.

7) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098 / प्र. क्र. 73 / 34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमूद केलेप्रमाणे विवरणपत्र अ मधील विहित नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करून मागासवर्गीय जातीनिहाय व गावनिहाय दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार पंचायत समितीकडून लाभ वैयक्तिक सहाय्य दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थ्यांच्या नोंदी जातनिहाय व गावनिहाय घेऊन शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमूद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थ्यास / कुटुंबास दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री करण्याकरीता नोंदी अद्यावत असलेली मास्टर नोंदवही विभागाने दप्तरी ठेवलेली नाही.

8) कृषी विभागाकडून लाभार्थ्यांना वाटप केलेल्या साहित्याची पाहणी करून संबंधितांच्या आर्थिक स्थितीमध्ये काय सुधारणा झाली, याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास / 1094 / सीआर / 2239 / 31, दिनांक 01/09/1993 नुसार फलश्रुती अहवाल उपलब्ध नाही.

### 3.686 100 टक्के अनुदानावर पिकसंरक्षण उपाययोजने अंतर्गत ताडपत्री पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** 100 टक्के अनुदानावर अनुदानावर पिक संरक्षण उपाययोजने अंतर्गत ताडपत्री पुरवठा करणेकरीता रक्कम रूपये 52,25,990/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.-9/वित्त-9, दिनांक 19/05/2016 मधील परि-3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजना राबविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली गेली नाही.

2) आदेशातील अट क्रमांक 8 नुसार ताडपत्रीवर अनुसूचित जाती उपयोजना सन 2016-2017 अंतर्गत पूरवठा, उत्पादकाचे नांव, उत्पादन दिनांक याबाबत कागदोपत्री पुरावा आढळला नाही. त्यामुळे मुदतबाहय वस्तुचा पुरवठा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) डिलेव्हरी मेमोवर दिनांक व वाहन क्रमांक नमुंद नाही. तेव्हा पंचायत समितीच्या साठा पुस्तकात दर्शविलेल्या तारखा संशयास्पद वाटतात.

4) पूरवठा आदेशावर प्रती आठवडा 0.5 ते 5 टक्के अधिकतम दंड नमुद करून रूपये 97,756/- इतका दंड आकारला. 0.5 ते 5 टक्के ऐवजी एकच दंडाची रक्कम कां ठेवण्यांत आली नाही? यावरून पुरवठादाराचे हित जोपासल्याचे नाकारता येत नाही.

5) सदर योजनेची माहिती सर्व सामान्य लोकांना व स्वयंसेवी संस्थांना होण्याकरीता स्थानिक वर्तमान पत्रात, गावात दवंडी याव्दारे प्रसिध्दी दयावयाची असतांना याबाबत दस्तऐवज आढळुन आले नाही.

6) सदर योजना राबविल्याने शेतक-याचे जीवनमान उंचावले गेल्याचा अहवाल नस्तीस आढळुन आला नाही.

### 3.687 जिल्हा परिषद सेस फंडातून 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पिक संरक्षण उपाय योजना अंतर्गत ताडपत्री पुरविणे.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद सेस फंडातून 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पिक संरक्षण उपाय योजना अंतर्गत ताडपत्री पुरविणेकरीता रक्कम रूपये 14,98,314/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/ वित्त-3, दिनांक 05/10/2012 नुसार जिल्हा परिषद स्वउत्पन्नामधील वैयकतीक लाभाच्या योजनेतील एकुण पात्र

लाभार्थ्यापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत, असे आदेश आहेत. त्यानुसार 3 टक्के अपंगाना लाभ दिल्याबाबत निवड यादी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे शासनाचे उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही. पुर्तता करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-परांस 1084/सीआ/1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना त्यापुर्वीच पुरवठा आदेश देवून साहित्य प्राप्त झाल्यानंतर चलानद्वारे लाभार्थी हिस्सा भरणा करुन साहित्य वाटप केल्याचे आढळून आले आहे.

3) पंचायत समिती अंजनगाव सुर्जी, चांदुरबाजार, धामणगाव रेल्वे, तिवसा येथील साठा रजिस्टरची तपासणी केली असता साहित्य वाटप केल्याची दिनांक साठा रजिस्टरवर नमुद नाही.

4) पंचायत समिती, नांदगाव खंडे येथील साठा रजिस्टरवरील लाभार्थी तसेच लाभार्थी अर्ज व कृषी विभागातील अंतीम यादी यामध्ये तफावत आढळुन आली. त्यामुळे योग्य लाभार्थ्यांना लाभ दिला किंवा नाही, याबाबत खात्री पटत नाही.

5) पंचायत समिती, तिवसा यांनी साहित्याचे 36 नग वाटप केलेले आहे. 36 x 619.65 = रूपये 22,307/- लाभार्थी हिस्सा जमा होणे अपेक्षीत होते. परंतु, कृषी विभाग, जिल्हा परिषद, अमरावती येथील वित्तीय लोक हिस्सा वर्गणी रजिस्टरनुसार केवळ 18 नगांचे धनादेश क्रमांक 085781, दिनांक 16/06/2017 रूपये 11,160/- लाभार्थी हिस्सा जमा झालेला आढळुन आला. 18 नगांचा लाभार्थी हिस्सा कृषी विभागास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे उर्वरीत 18 लाभार्थ्यांना लाभार्थी हिस्सा जमा न करता साहित्य वाटप करण्यात आले. असे प्रथमदर्शनी दिसुन येते. तरी 18 नगांचा रूपये 11,160/- लाभार्थी हिस्सा वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

6) पंचायत समिती, अंजनगाव सुर्जी येथील साठा रजिस्टर पान क्रमांक 70 अनुक्रमांक 26 वर पुष्पाताई सावरकर यांचे नाव रदद करुन त्या ठिकाणी रमेश गुलाब वानखडे यांना साहित्य वाटप करण्यात आले. परंतु, कृषी विभागातील अंतीम यादीमध्ये वानखडे यांचे नाव आढळुन आले नाही. पंचायत समिती, दर्यापुर येथील साठा रजिस्टरवर वासुदेव अमृतराव टेकाडे यांना साहीत्य वाटप करण्यात आले. परंतु, कृषी विभागातील अंतीम यादीमध्ये त्यांचे नाव आढळुन आले नाही.

7) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. त्यांच्या मागणी अर्जावर कृषी विस्तार अधिकारी व कृषी अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळल्या नाहीत. तसेच लाभार्थीचे अर्जावर ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र आढळून आले नाही.

8) पंचायत समिती स्तरावरील योजनानिहाय लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार किंवा त्यापेक्षा जास्त वेळा लाभ दिला गेल्याबाबत शक्यता नाकारता येत नाही.

**3.688 जिल्हा परिषद उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक पंप खरेदी बाबत जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक पंप खरेदीकरिता रक्कम रूपये 22,99,300/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इलेक्ट्रीक पंप लाभार्थीची निवडीचा कृषी विषय समितीचा ठराव क्रमांक 2/2 दिनांक 16/03/2015 नुसार लाभार्थीची निवड करण्यात आली. जिल्हा परिषद उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक पंप खरेदीबाबतची फाईल संबंधित लिपीकाने दिनांक 26/03/2015 रोजी सुरुवात केली. कृषी अधिकारी यांनी दिनांक 23/06/2015 रोजी स्वाक्षरी केली. मुख्य लेखा वित्त अधिकारी यांनी दिनांक 10/08/2015 रोजी खरेदी करण्यास हरकत नसल्याबाबतचा अभिप्राय देऊन अतिरिक्त मुख्य अधिकारी यांनी अभिप्राय न देता खाली स्वाक्षरी केली. याचा अर्थ अतिरिक्त मुख्य अधिकारी खरेदी करण्यास सहमत आहे. याच वेळेस सदर खरेदी करणे आवश्यक असतांना खरेदीची नस्ती संबंधित लिपीक यांनी काही कारण नसतांना पुन्हा दिनांक 21/03/2016

रोजी सुरु केली पुन्हा कृषी अधिकारी यांनी दिनांक 22/03/20116 रोजी स्वाक्षरी कली. लाभार्थी हिस्सा प्राप्त झाला नसतांना कृषी अधिकारी यांनी पुरवठा आदेश देणेबाबत अभिप्राय दिला. मुख्य लेखा वित्त अधिकारी यांनी प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करणेबाबत अभिप्राय दिला व विषय समिती 02/02 दिनांक 16/03/2016 रोजी साहित्य वितरणाच्या वेळी लाभार्थी हिस्सा वसुल करण्याबाबतचा ठराव पास करण्यात आला. दिनांक 28/03/2016 रोजी अतिरिक्त मुख्य अधिकारी यांनी विषय समितीच्या जबाबदारीवर पुरवठा आदेश देणेबाबत अभिप्राय दिला. दिनांक 31/03/2016 रोजी मुख्य लेखा वित्त अधिकारी यांनी नस्तीवर खर्चास मंजुरी दिली. संबंधित लिपीकानी दिनांक 31/03/2016 ची देयके असतांना मंजुर करुन का घेतले नाही.

संबंधित लिपीक यांनी पुन्हा दिनांक 18/05/2016 रोजी यांनी पोच पावत्या दिनांक 18/05/2016 च्या असल्यामुळे देयके मंजुरीसाठी सादर केले नसल्याबाबत टिपणीत नमुद केले

2) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक 1649 दिनांक 14/06/2006 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी हिस्सा प्राप्त न होताच तांत्रीक मंजुरी, प्रशासकिय मंजुरी घेणे व पुरवठा आदेश देणे त्याचप्रमाणे लाभार्थी हिस्सा प्रथम भरल्याशिवाय योजना राबावित येणार नसल्याबाबत सुचना केल्या आहेत. कर्मचारी वा वरीष्ठ अधिकारी नस्तीवर स्प्ष्ट अभिप्राय न देण्यामागचा खुलासा करावा.

3) दिनांक 10/08/2015 रोजी मंजुरी मिळाल्यानंतर सदर खरेदीची नस्ती दिनांक 11/08/2015 ते दिनांक 21/03/2016 पर्यंत कोणाकडे होती, विलंबाने का सादर केली, याचे समर्क कारण नमुद केले नाही.

4) दिनांक 31/03/2016 रोजी देयक मंजुर करुन न घेण्यामागचा खुलासा नमुद करण्यात आला की, पोचपावत्या दिनांक 31/03/2016 नंतरच्या असल्यामुळे देयके मंजुरीसाठी सादर केले नाही परंतु, सन 2016-2017 मध्ये देयके सादर करतांना देयके 31/03/2016 असल्याचे व साहित्य प्राप्तीच्या डिलेव्हरी चलान 30/03/2016 चे आहेत. त्यामुळे पोचपावत्याचे नंतरच्या असण्याचे कारण संयुक्तीक नाही. सन 2015-2016 मध्ये पुर्ण प्रकिया पुर्ण होऊनही जवळ जवळ एक वर्ष विलंबाने प्रदान करण्यामागच्या कारणाचा खुलासा करावा.

5) सदर योजना सन 2015-2016 मधील असुन सर्व प्रक्रीया मागील वर्षी राबवूनही लाभार्थींना मागील वर्षी लाभ मिळाला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्रक्र 446/ वित्त- 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबविताना विहीत वेळापत्रकानुसार योजना राबविणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. सदर परिपत्राकातील परिशिष्ट ई नुसार जिल्हा परिषदेच्या वैयक्तिक लाभांच्या योजनाकरीता वेळापत्रक विहीत करण्यात आलेले असुन त्याप्रमाणे योजना राबविण्याची कार्यवाही न झाल्यामुळे शासन निर्देशाचा भंग झाला आहे. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शन सुचना पत्र क्रमांक सकुओ/दरनि/2015-16/387/गुनि-5/2015, दिनांक 01/12/2015 मधील मार्गदर्शक सुचने नुसार साहित्याचे पुर्ण तपशील दिलेला असून ते साहित्य कोणत्या पुरवठादाराकडून खरेदी करतांना सोबत जोडलेल्या गुणवत्तेप्रमाणे त्याचप्रमाणे बीआयएसची मुदत दिनांक पाहुनच खरेदी करण्यात यावी, असे नमुद आहे. विभागाने 5 एचपी ओपन सबमर्शीबल इलेक्ट्रीक पंप (Laxami Druckon IS14220-1994,CM/L 7172165) चा बीआयएसची मुदत दिनांक 15/05/2015 चा व स्टार रेटींग बी नमुद शिवाय खरेदी केलेला असल्यामुळे मुदतबाहय मानक दिनांकाचा इलेक्ट्री पंपं खरेदी केले असल्याचे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शन सुचना पत्रानुसार गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळाची असली, तरी सदर योजना जिल्हा परीषदेने जिल्हा परिषद सेसमधून राबविली असल्यामुळे ती जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील, असे नमुद आहे. त्यामुळे जिल्हा परीषदेने जिल्हा परिषद सेस योजना राबवितांना साहित्याच्या खरेदीचा उर्जा विभागाचा शासन निर्णय क्रमांक भांखस:-2104/प्र.क्र.82/ भाग III /उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील तरतुदीनुसार खरेदीची प्रक्रीया का अवलंबविली नाही, याबाबत खुलासा करावा.

7) इलेक्ट्रीक पंपचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्यात आलेला आहे. पंचायत समिती स्तरावरील साठा पुस्तकांची पडताळणी केली असता, 5 एचपी इलेक्ट्रीक पंपाचे वाटप सन 2015-2016 त्याच आर्थीक वर्षात वाटप न करता सन 2016-2017 पर्यंत पुर्णपणे वाटप करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र शासन,

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 नुसार साहित्याचे वितरण दिनांक 01 जानेवारी पर्यंत वाटप न झाल्यामुळे सदर आदेशाचे उल्लंघन झाले असल्याचे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. काही पंप वितरीत झाले नाहीत, याबाबत खुलासा करावा.

8) निवड केलेल्या लाभार्थी यादीमध्ये 3 टक्के दिव्यांग लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असुन एकुण लाभार्थी 137 च्या 3 टक्के नुसार 4 दिव्यांग लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना योजनेचा लाभ देणे आवश्यक असतांना केवळ एका दिव्यांगाला लाभ मंजुर केल्याबाबत आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

9) लाभार्थ्यांचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. संबंधीतांनी योजनेचा लाभ यापुर्वी व इतर योजनामधुन घेतला नसल्याची खात्री करता आली नाही. सबब संबंधीतांनी दुबार लाभ घेतला नसल्याचे प्रमाणित करता आले नाही. याबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

10) योजना विहीत मुदतीत न राबविल्याने तसेच संबधीत लाभार्थी यांना दोन वर्ष साहित्य वितरीत न झाल्यामुळे त्या वर्षी सदर लाभार्थी विकासापासुन वंचीत राहिले. तसेच योजनेच्या फलश्रुतीबाबत खुलासा करावा.

**3.689 जिल्हा परिषद उपकर निधीतुन 100 टक्के अनुदानावर अल्प भुधारक शेतकऱ्यांना संकरीत बीटी कॉटन बीजी 2 बीयाणे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद उपकर निधीतुन 100 टक्के अनुदानावर अल्प भुधारक शेतकऱ्यांना संकरीत बीटी कॉटन क्रांती बियाणे श्रीशेतकी भांडार कळमनुरी जिल्हा हिंगोली यांचेकडून 450 ग्रॅमचे पाकिट रुपये 745 /- प्रती पॅकेटप्रमाणे रुपये 27,71,400/-चे एकूण 4,762 पॅकेट खरेदी केले असून त्याचे वितरण करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र कापुस बी बीयाणे अधिनियम 2009 दिनांक 03/07/2009 पासून लागू करण्यात आला असून या अधिनियमामधील कलम 3 नुसार संचालक (नियंत्रण व गुणवत्ता नियंत्रण ) कृषी आयुक्तालय, पुणे हे नियंत्रक आहेत. तसेच बीयाणे नियंत्रण आदेश 1983 खंड 11 नुसार शासनची अधिसुचना दिनांक 11/02/2013 अन्वये ते शासनाचे अनुज्ञापक आहेत. ज्या प्रमाणे शेतक-यांना शेतीचे अवजारे व इत्तर लाभबाबत कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शन सुचनेनुसार लाभार्थीना लाभ देण्यात येतात त्याचप्रमाणे कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदशन मागवून संकरीत बीटी बीजी -2 बीयाणे वाटप न करण्याचे प्रयोजन काय, याबाबत खुलासा करावा.

2) लाभर्थीची निवड करतांना त्यांची मागणी नोंदविणे आवश्यक होते. परंतु, पंचायत समिती स्तरावरुन लाभार्थीची मागणी व गरज याप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे 1,042 पॅकेट बीयाणाचे वाटप झाले नाही. पुर्ण वाटप न होण्याचा खुलासा करावा.

3) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक /विप्र-3/रासुअ-व्यापी-कापुस /15-16/266/ 2015, दिनांक 19/06/2015 नुसार बीटी बीयाणाची मागणी महाबीज, महाराष्ट कृषी विकास महामंडळ व कृषी विद्यापीठ यांचेकडे न नोंदविता त्याचप्रमाणे कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शन न मागविता, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय पियुबी/1000/प्र.क्र.73/2000/34, दिनांक 08/08/2001 नुसार विभागीय व जिल्हा माहिती अधिका-याच्या मार्फत वर्तमान पत्रात जाहिर प्रसिध्दी न देता, केवळ अकोला आवृत्ती मातृभुमी दैनीक ब व एका साप्ताहिकातून निविदा प्रसिध्दी खरेदी केली. व्यापक प्रसिध्दी न दिल्यामुळे स्पर्धा व गुणवत्तेचा फायदा झालेची खात्री करता येत नाही.

4) बीलावर पिकाचे पूर्ण नाव नसणे उदा.Hy.Cotton BT, व्हेराईटी नमुद नसणे उदा.Solar 75 BG II क्रांती, लॉट नंबर नमुद नसणे उदा.HKMB, वर्गवारी नमुद नाही उदा.Truthful आहे किंवा कसा इत्यादी बाबी बीलावर नसल्यामुळे शेतकी भांडार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांनी उपरोक्तप्रमाणे केलेला पुरवठा हा संकरीत बीटी कॉटन - बीजी II होता, याबाबत खात्री पटत नाही.

5) करारनाम्यामधील अटीनुसार कंपनीने बीयाणे पेरणीपासून ते कापणीपर्यंत लाभार्थी शेतकऱ्याचे शेतावर कंपनीचे पथक कार्यरत ठेवुन शेतक-यांचे मेळावे घेऊन त्यांना मार्गदशन करून व उपस्थित शेतक-यांची नोंदी नोंदवहीमध्ये घेऊन त्यावर त्यांची स्वाक्षरी करून तसेच फोटो घेऊन तसा अहवाल कृषी विभागाला सादर करणे

आवश्यक होते. परंतु, कंपनीने पथक न ठेवल्यामुळे कराराचा भंग झाला. त्यामुळे कंपनीचे ठेवुन घेतलेली सुरक्षा ठेवीची रक्कम रुपये 6,92,850/- जप्त करणे आवश्यक होते.

6) कंपनीने पथक न ठेवल्यामुळे शेतक-यांने पेरलेले उपरोक्त नमुद बीयाणेमुळे शेतक-याच्या उत्पादनात किती वाढ झाली, याबाबत फलश्रृती अहवालासह अनुपालन सादर करावे

7) बीयाणे पुरवठापुर्व बीयाणाची चाचणी मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून घेणे आवश्यक आहे. प्रयोगशाळेचा चाचणीसाठी नमुने उदा. पंचायत समिती, अकोला यांनी दिनांक 14/07/2016 रोजी प्रयोगशाळा नागपूर येथे पाठविला व चाचणी अहवाल पंचायत समिती, अकोला यांनी दिनांक 01/09/2016 रोजी जिल्हा परिषद, कृषी विभाग यांना पाठविला. उशीरा अहवाल प्राप्त झाला असल्यामुळे शेतक-याने तोपर्यंत बीयाणे पेरलेले असतील. त्यामुळे बीयाणे चाचणीचा उद्देश सफल झाला नाही.

**3.690 जिल्हा परिषद उपकर निधी अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पिक संरक्षण उपाय योजना अंतर्गत ताडपत्री पुरविणे.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद उपकर निधी अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पिक संरक्षण उपाय योजनेवर रक्कम रूपये 25,83,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/ वित्त-3, दिनांक 05/10/2012 नुसार जिल्हा परिषद स्वउत्पन्नामधील वैयक्तीक लाभाच्या योजनेतील एकुण पात्र लाभार्थ्यांपैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत, असे आदेश आहेत. त्यानुसार 3 टक्के अपंगाना लाभ दिल्याबाबत निवड यादी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे शासनाचे उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही. पुर्तता करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-परांस 1084/सीआ/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना त्यापुर्वीच पुरवठा आदेश देवून साहित्य प्राप्त झाल्यानंतर चलानद्वारे लाभार्थी हिस्सा भरणा करुन साहित्य वाटप केल्याचे आढळून आले आहे.

3) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. त्यांच्या मागणी अर्जावर कृषी विस्तार अधिकारी व कृषी अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळल्या नाहीत.

4) पंचायत समिती स्तरावरील योजनानिहाय लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार किंवा त्यापेक्षा जास्त वेळा लाभ दिला गेल्याबाबत शक्यता नाकारता येत नाही.

5) उक्त तांत्रिक मंजुरी आदेशांतील 7 नुसार अनुसूचित जाती / जमाती / महिला लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देणेबाबत नमूद आहे. परंतु, लाभार्थी अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने याबाबत खात्री करता आली नाही.

6) उपलब्ध लाभार्थी अर्जाची छाननी केली असता लाभार्थी निवड त्याचे संबधी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या एकाच कुंटुबातील व्यक्तीला ते विभक्त कुटुंबातील पुरावाखेरीज वैयक्तीक लाभ दिला आहे.

एकाच कुटुंबातील अन्य सदस्यांना दिलेला लाभ वसूल करणे आवश्यक आहे. तरी 83 लाभार्थ्यांना दिलेला लाभ (रूपये 3,000/- X 83) रक्कम रूपये 2,49,000/- वसुलपात्र आहे.

7) सदर योजना नस्तीची तपासणी केली असता महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133, दिनांक 05/12/2016 मधील (2)(उ) अन्वये लाभार्थी निवड करणेबाबत सभापती कृषी व पशूसंवर्धन समिती सभा दिनांक 27/07/2016 ठराव क्रमांक 8 मध्ये नावानिशी लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नाही.

8) उक्त शासन निर्णयातील 2(ओ) लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक होते. नस्तीमध्ये असलेल्या सर्व पावत्या रिद्धीसिद्धी एजन्सी, रिसोड येथील आहेत. लाभार्थी संपूर्ण जिल्ह्यातील असताना खरेदी ठिकाण रिसोड मधील एकच दुकान आहे. उक्त शासन निर्णयातील 2(ओ) नुसार विभागाने खात्री केली नसल्याचे आढळून येते. याबाबत खुलासा करण्यात यावा.

9) उक्त शासन निर्णयातील 2(औ) नुसार लाभार्थ्यांना रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करणे आवश्यक असताना देयकासोबत जोडण्यात आलेल्या पंचायत समिती, रिसोड लाभार्थी यादीत दत्ता बळीराम घाटे रा. कंकरवाडी व बेलाप्पा शिवराम आकले रा. भरजहागिर यांचा बँक खाते क्रमांक 924618210001257 असा एकच नमूद केला आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**3.691 अनुसुचित जाती उपाययोजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना बैलगाडी वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** अनुसुचित जाती उपाययोजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना बैलगाडी वाटप करणेकरीता रक्कम रूपये 77,82,075/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र/ आउयो/ अमारम/15-16/4281/2015, दिनांक 15/06/2015 मधील तरतुदीनुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरीत्या होण्याच्या दृष्टीने कृषी सहसंचालक यांनी योजनेची 75 टक्के, जिल्हा कृषी अधिकारी यांनी 5 टक्के, जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के तथा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती स्तर यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचा तपासणी अहवाल दप्तरी आढळुन आला नाही.

2) शासन निर्णय दिनांक 23/11/2015 च्या सोबत जोडलेल्या प्रपत्र 2 मधील मुद्दा क्रमांक 10 मार्गदर्शक सुचनेनुसार पुरवठा संस्थांची तसेच औजारांची गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त आहे. परंतू, दिनांक नमुद नाही. त्यामुळे पुर्व पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी अहवाल आहे किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) पुरवठादाराचे स्तरावरुन पंचायत समिती स्तरावर बैलगाडीचा पुरवठा करण्यात आल्याबाबत पंचायत समितीचे स्तरावरील नोंदवहया अभिलेख तपासले असता डिलेव्हरी मेमोवर स्पेसिफीकेशन नमूद केले नसल्याचे दिसुन आले. त्यामुळे पुरवठा आदेशानुसार पुरवठा करण्यात आला नसतांना तसेच डिलेव्हरी मेमोवर specification नमुद केले नसल्याचे दिसुन आले. त्यामुळे पुरवठा आदेशानुसार पुरवपठा करण्यात आला नसतांना तसेच डिलेव्हरी मेमोवर दिनांक नोंदविला नसल्यामुळे विहीत कालावधीत साहित्याचा पुरवठा करण्यात आला, ही बाब स्पष्ट होत नाही.

4) पंचायत समिती, वाशिम येथील साठा पुस्तकाची तपासणी केली असता वाटप दिनांक नमूद नाही.

5) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. तसेच लाभार्थीचे अर्जावर ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र आढळून आले नाही.

6) अनुसुचित जाती उपाययोजने अंतर्गत साहित्य वाटपामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊन जिवनमान बदलाबाबत अधिकाऱ्यांने अहवाल प्राप्तं झाला नाही. त्यामुळे शासन आदिवासी शेतकऱ्यांचे जिवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने राबविल्यांत योग्य असल्याबाबतचा उद्देश स्पष्ट झाला नाही.

**3.692 आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना फवारणी पंप वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना फवारणी पंप वाटप करणेकरीता रककम रूपये 13,716/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेतील लाभार्थ्यांचे मूळ अर्ज लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे योजनेचे लाभार्थी निवड करताना अंतरिम मार्गदर्शक सूचनेतील सूचना क्रमांक 1 लाभार्थी निवड पात्रता आणि सूचना क्रमांक 2 लाभार्थी निवड निकष यानुसारच लाभार्थी निवड झाली किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

2) मार्गदर्शक सुचना क्रमांक 14 प्रमाणे प्रपत्र 2 अ मध्ये कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के व जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के करणे आवश्यक आहे. परंतू, याप्रमाणे तपासणी झाल्याचे आढळून येत नाही. जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) जिल्हा परिषद आणि कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती, वाशिम व पंचायत समिती, रिसोड यांचे तपासणी प्रमाणपत्र आहे. परंतु, नक्की कोणत्या लाभार्थीकडे तापसणी केली, याबाबत तापसणी अहवाल आणि लाभार्थी सोबतचा फोटोवैगरे नस्तीमध्ये आढळून आला नाही.

3) पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवही नमुना 33 मध्ये साहित्य वाटपाच्या तारखा नमूद नाहीत. त्यामुळे साहित्य नक्की कधी वाटप केले, याबाबत खात्री झाली नाही.

4) मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 प्रमाणे पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवून त्याची तपासणी कृषी विकास अधिकारी / जिल्हा कृषी अधिकारी यांनी पंचायत स्तरावर भेटी देवून नोंद घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी नोंदवही लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

5) सदर योजनेची प्रसिद्धी कशा प्रकारे केली, याबाबतचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आले नाही.

6) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्याची निवड झाल्यानंतर साहित्यासाठी मागणी केलेला अर्जावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे साहित्याची मागणी कोणत्या तारखेला केली, याबाबत खात्री होत नाही.

7) साहित्य वाटप केल्यानंतर काही कालावधीनंतर लाभार्थ्याकडून त्यांचे अभिप्राय घेतल्याबाबत आणि त्यांचे शेतीतून मिळणाऱ्या उत्पनामध्ये किती प्रमाणात वाढले, याबाबत तसेच योजनेचा फलश्रुती अहवाल नस्तीमध्ये आढळून आले नाही.

**3.693 अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना फवारणी पंप वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना फवारणी पंप वाटप करणेकरीता रककम रूपये 30,40,380/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेतील लाभार्थ्यांचे मूळ अर्ज लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे योजनेचे लाभार्थी निवड करताना उपरोक्त क्रमांक 8 मधील अंतरीम मार्गदर्शक सूचनेतील सूचना क्रमांक 1 लाभार्थी निवड पात्रता आणि सूचना क्रमांक 2 लाभार्थी निवड निकष यानुसारच लाभार्थी निवड झाली किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

2) उपरोक्त मार्गदर्शक सुचना क्रमांक 14 प्रमाणे प्रपत्र 2 अ मध्ये कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के, जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के याप्रमाणे तपासणी झाल्याचे आढळून येत नाही. जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना), जिल्हा परिषद आणि कृषी अधिकारी (विशेष घटक योजना), पंचायत समिती, मालेगाव आणि पंचायत समिती, वाशिम यांचे तपासणी प्रमाणपत्र प्रपत्र 2 अ लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

3) पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवही नमुना 33 मध्ये साहित्य वाटपाच्या तारखा नमूद नाहीत. त्यामुळे साहित्य नक्की कधी वाटप केले, याबाबत खात्री झाली नाही. तसेच साहित्य वाटपाच्या प्रक्रियेला खूप विलंब झाल्याने पंचायत समिती, कारंजा अंतर्गत सन 2014-2015 मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन 2015-2016 पर्यंत लाभ देणे आवश्यक असताना पंचायत समिती, कारंजाचे साहित्य साठा नोंदवही नमुना 33 वरून साहित्य दिनांक 05/04/2016 रोजी प्राप्त झाले आहे. तसेच साहित्य वाटपाची तारीख नमूद नाही.

4) मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 प्रमाणे पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवून त्याची तपासणी कृषी विकास अधिकारी / जिल्हा कृषी अधिकारी यांनी पंचायत स्तरावर भेटी देवून नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी नोंदवही लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

5) सदर योजनेची प्रसिद्धी कशा प्रकारे केली, याबाबतचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आले नाही.

6) योजनेच्या लाभार्थ्यामध्ये एकूण लाभार्थ्यापैकी 30टक्के महिला आणि 3 टक्के अपंग लाभार्थी असणे आवश्यक आहे. तसा लाभ दिल्याचे अभिलेखे सादर करून अनुपालन करावे.

7) पंचायत समिती, कारंजामध्ये तपासणीचे प्रपत्र २ अ मध्ये बहुतांश लाभार्थ्याचे तपासणी मे, जून व ऑगस्ट महिन्यादरम्यान केल्याचे आढळून येते आणि अभिप्रायामध्ये उत्पन्न वाढल्याबाबत उल्लेख आहे. परंतु, त्याबाबत सप्रमाण दर्शवावे.

पंचायत समिती, मालेगाव लाभार्थ्याचे मागणी अर्ज आणि प्रपत्र 2 अ तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. तसेच लाभार्थ्याचे साहित्याचे मागणी अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. तसेच पंचायत समिती, मंगरूळपीर अंतर्गत लाभार्थ्याचे साहित्याचे मागणी अर्ज दिनांक 31/03/2016 आणि त्या नंतरच्या तारखेला आहेत म्हणजेच साहित्य प्राप्त झाल्यावर लाभार्थ्यांकडून मागणी अर्ज प्राप्त केले. खुलासा करावा.

8) साहित्य वाटप केल्यानंतर काही कालावधीनंतर लाभार्थ्याकडून त्यांचे अभिप्राय घेतल्याबाबत आणि त्यांचे शेतीतून मिळणाऱ्या उत्पनामध्ये किती प्रमाणात वाढले, याबबत तसेच योजनेचा फलश्रुती अहवाल नस्तीमध्ये आढळून आले नाही.

9) पंचायत समिती, वाशिमचे साठा नोंदवहीमध्ये एकूण 153 लाभार्थ्यापैकी 145 लाभार्थ्यांना साहित्य वाटप केले असून लेखापरीक्षण दिनांकापर्यंत 8 लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे बाकी आहे. विलंबाबत खुलासा करावा. तसेच साहित्य वाटप पूर्ण करून अनुपालन करावे.

**3.694 विशेष घटक योजने अंतर्गत शेतक-यांकरीता HDPE पाईप खरेदी मधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** विशेष घटक योजने अंतर्गत शेतकऱ्यांकरीता HDPE पाईप खरेदीकरीता रक्कम रूपये 14,49,875/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 31/03/2016 च्या पुरवठा आदेशानुसार पंचायत समिती राळेगांव यांनी दिनांक 31/03/2016 लाच साहित्याचा पुरवठा झाल्याबाबत साठा पंजीला नोंद घेतली.

2) पुरवठा आदेश दिनांक 31/03/2016 च्या पुरवठा आदेशानुसार विहीत मुदतीत साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक असतांना विहीत मुदतीत साहित्याचा पुरवठा करण्यात आला नाही. तरीही पंचायत समिती यवतमाळ संदर्भात दंड आकारण्यात आला नाही. दंडाची रक्कम रूपये 1,768/- वसूल करावी.

3) डिलेव्हरी मेमोवर जावक क्रमांक नमुद आहे. परंतू, दिनांक नमुद करण्यात आलेला नाही.

4) पंचायत समितीच्या साठा पंजीची पडताळणी केली असता सदरहू पंचायत समित्यांनी वाटपाच्या तारखा नमुद केल्या नाहीत.

5) वित्त विभागाने देयकाची पडताळणी न करता देयक मंजूर केल्याचे निदर्शनास येते.

**3.695 50 टक्के अनुदानावर 5 एच पी विद्युत पंप पुरविणे योजनेतील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** 50 टक्के अनुदानावर 5 एच पी विद्युत पंप पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 24,99,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरची योजना 50 टक्के अनुदान तत्वावर असल्यामुळे योजनेची प्रचार प्रसिध्दी करणे आवश्यक होती. परंतू, प्रचार प्रसिध्दी केल्याबाबत अभिलेखे पडताळणीअंती दिसुन आले नाही.

2) विभागाने लाभार्थी यादी सादर केली आहे. परंतू, विषय समितीने निवड केलेल्या लाभार्थींची यादी लेखापरिक्षणास सादर केलेली नाही. ग्रामविकास व जल संधारण विभाग, शासन परिपत्रक दिनांक 16/10/2012 नुसार विषय समितीमध्ये लाभार्थी यादी निश्चित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. वित्त विभागातील लेखा अधिकारी यांनी लाभार्थी निवडीकरिता वारंवार नस्ती परत केल्यावरही लाभार्थी निवडीची प्रक्रिया विभागाने केलेली नाही.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 07 नुसार शासकिय योजनांतर्गत पूरवठासाठी निश्चित केलेला अवजाराचा दर त्याच अवजाराच्या खुल्या बाजारातील दरापैक्षा जास्त आढळल्यास अशा अवजारांच्या किंमती इतकी रक्कम पुरवठा संस्थाकडुन वसुल करण्यांत येईल असे नमुद करुनसुध्दा खुल्या बाजारातून ई - निविदाव्दारे दर बोलावून दराची तुलना न करता खरेदी करण्यांत आलेली आहे.

4) विभागाने यापूर्वी पूरविण्यात आलेल्या साहित्यापैकी प्रकल्पस्तरावर कोणताही साठा शिल्लक नसल्याची खात्री न करता पूरवठा आदेश देण्यांत आलेला आहे. तसेच पुरवठा आदेश देण्यापूर्वी पुरवठादारासोबत करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा करण्यांत आलेला नाही.

5) लाभार्थ्यांची निवड झाल्या नंतर महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करण्यांत आली आहे. तसेच विभागामार्फत योजना राबविण्यात येत असल्यामुळे लाभार्थी हिस्साची रक्कम विभागाने जमा करुन पुरवठादाराला पाठविणे अभिप्रेत असतांना पंचायत समिती स्तरावर जमा करुन पुरवठादारास पाठविले जाते. लाभार्थी हिस्सा परस्पर पाठविल्यामुळे किती लाभार्थी हिस्सा पंचायत समितीने पुरवठादारास पाठविला किंवा जमा झाला, याबाबत कोणतेही अभिलेखे विभागाजवळ उपलब्ध नाही.

6) पंचायत समिती स्तरावरुन पाठविण्यांत आलेल्या लाभार्थी यादीस विषय समितीने मंजुरी दिली असतांना मंजुर यादीनुसार लाभार्थीस लाभ न देता साहित्य वाटप करण्यांत आले आहे. त्यामुळे पंचायत समितीने खुलासा करणे आवश्यक आहे. उदा. लोणार व पंचायत समिती, मलकापूर

7) अर्धसमास पत्र क्रमांक 20 दिनांक 05/10/2017 अन्वये सुचित करुन सुध्दा पंचायत समिती देऊळगावराजा, मोताळा, शेगाव, नांदुरा यांनी लाभार्थी अर्ज व स्टॉकबुक लेखापरिक्षणास सादर केलेले नाही. त्याचप्रमाणे अर्धसमासपत्र क्रमांक 25 दिनांक 06/10/2017 नुसार योजनेची प्रचार प्रसिध्दी, ग्रामसभेसमोर यादी प्रसिध्दी केल्याचे पुरावे, ग्रामसभेचे ठराव, अपात्र लाभार्थीच्या कागदपत्राची पूर्तता करुन घेतल्याचे पुरावे तसेच महीला 30 टक्के व अपंग 3 टक्के प्रमाणे लाभ दिल्याचे पुरावे, विद्युत पंप सुरु असल्याबाबतचे स्थळभेट देण्याचे अहवाल लेखापरिक्षणास सादर केलेले नाही.

8) पंचायत समिती स्तरावरील स्टॉकबुक तपासणी केली असता पंचायत समिती, चिखली 1 नग व पंचायत समिती, संग्रामपूर 4 नग साहित्य लेखापरिक्षण दिनांक पावेतो शिल्लक असल्याचे दिसुन येते. लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया योग्य न झाल्याने साहित्य पडून असल्याचे लेखापरिक्षणाचे अभिप्राय आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास /1096/ प्रं.क्र.178/ 05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वित्त्तीय वर्षात लाभार्थीस लाभ देणे तथा साहित्याचे वाटप होणे आवश्यक असतांना साठा पुस्तके पडताळली असता पुढील वर्षात लाभ दिल्याचे आढळून आले आहे.

**3.696 50 टक्के अनुदानावर 5 एच पी डिझेल इंजीन पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर योजनेवर रक्कम रूपये 22,68,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरची योजना 50 टक्के अनुदान तत्वावर असल्यामुळे योजनेची प्रचार प्रसिध्दी करणे आवश्यक होती. परंतु, प्रचार प्रसिध्दी केल्याबाबत अभिलेखे पडताळणीअंती दिसुन आले नाही.

2) योजनेची प्रसिध्दी गावपातळीवर करावयाची आहे. ग्रामपंचायतीने सर्व अर्ज ग्रामसभेच्या ठरावासह पंचायत समितीस सादर करावयाचे आहे व पंचायत समितीने प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा परिषदेच्या सबंधित विभागास पाठविल्यानंतर विभागाने किती अर्ज प्राप्त झाले, याची नोंद घेऊन पात्र व अपात्र लाभार्थीची यादी ठेवावयाची आहे. पात्र लाभार्थी निवडीची यादी विषय समितीकडे ठेवून त्यास मंजुरी प्राप्त करुन तेवढयाच साहित्याकरीता पुरवठा आदेश दयावयाचा आहे व त्याच लाभार्थ्यांना लाभ दयावयाचा आहे. पण विभागाने तसे न करता पंचायत समितीकडून प्राप्त यादीमधील लाभार्थी संख्या विचारात घेवून पुरवठा आदेश देण्यात आला आहे

विभागाने पंचायत समितीकडुन प्राप्त यादीमधून शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1012/ प्रं.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार लाभार्थी निवड करुन विषय समितीची मंजूरी घेणे व विभागाने यादी मंजुर करावी, असे नमुद आहे. पंचायत समितीकडून प्राप्त लाभार्थी संख्येला मंजुरी घेणे अभिप्रेत नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक पंरास 4114/प्र.क्र.136/4अे, दिनांक 23/11/2014 नुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर साहित्य वाटप करावयाचे आहे. परंतु, त्या यादया पंचायत समितीने विभागाकडे पाठविल्या त्यांना विषय समितीने मंजूरी दिल्याचे दर्शविले. त्याच लाभार्थ्यांना पंचायत समितीने प्रथम येणाऱ्यास प्रथम लाभ दयावयाचा आहे. परंतु, पंचायत समितीने पाठविलेल्या यादया तथा मंजुर दर्शविलेल्या यादीमधील लाभार्थीस लाभ न देता दुसऱ्याच लाभार्थींना लाभ दिला आहे. पंचायतीने जर निवड करुन लाभार्थी यादी पाठविली होती, तर त्याच लाभार्थीस लाभ का देण्यांत आला नाही, याचा खुलासा करावा.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 07 नुसार शासकिय योजनांतर्गत पूरवठासाठी निश्चित केलेला साहित्याचा दर त्याच साहित्याचा दर खुल्या बाजारातील दरापेक्षा जास्त आढळल्यास अशा साहित्याच्या किंमती इतकी रक्कम पुरवठा संस्थाकडुन वसुल करण्यात येईल,असे नमुद करुन सुध्दा खुल्या बाजारातुन ई-निविदाद्वारे दर बोलावून दराची तुलना न करता खरेदी करण्यात आलेली आहे.

5) विभागाने यापूर्वी पूरविण्यात आलेल्या साहित्यापैंकी प्रकल्पस्तरावर कोणताही साठा शिल्लक नसल्याची खात्री न करता पूरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

6) लाभार्थ्यांची ची निवड झाल्यानंतर महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक /पंरास/1084/सीआर/1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसुल करण्यांत आली आहे. तसेच विभागामार्फत योजना राबविण्यात येत असल्यामुळे लाभार्थी हिस्साची रक्कम विभागाने जमा करुन पुरवठादाराला पाठविणे अभिप्रेत असतांना पंचायत समिती स्तरावर जमा करुन पुरवठा दारास पाठविले जाते. लाभार्थी हिस्सा परस्पर पाठविल्यामुळे किती लाभार्थी हिस्सा पंचायत समितीने पुरवठा दारास पाठविला किंवा जमा झाला, याबाबत कोणतेही अभिलेखे विभागाजवळ उपलब्ध नाही.

7) पंचायत समितीस्तरावरुन पाठविण्यांत आलेल्या लाभार्थी यादीस विषय समितीने मंजुरी दिली असतांना मंजुर यादीनुसार लाभार्थीस लाभ न देता साहित्य वाटप करण्यांत आले आहे. त्यामुळे पंचायत समितीने खुलासा करणे आवश्यक आहे.

8) अर्धसमास पत्र क्रमांक 20 दिनांक 05/10/2017 व 32 दिनांक 07/10/2017 अन्वये सुचित करुन सुध्दा पंचायत समिती देऊळगाव राजा, मोताळा, शेगाव, नांदुरा यांनी लाभार्थी अर्ज व स्टॉकबुक लेखापरिक्षणास सादर केलेले नाही. त्याचप्रमाणे अर्धसमासपत्र क्रमांक 19 दिनांक 05/10/2017 व 27 दिनांक 06/10/2017 नुसार योजनेची प्रचार प्रसिध्दी, ग्रामसभेसमोर यादी प्रसिध्दी केल्याचे पुरावे, ग्रामसभेचे ठराव, अपात्र लाभार्थींच्या कागदपत्राची पूर्तता करुन घेतल्याचे पुरावे, तसेच महीला 30 टक्के व अपंग 3 टक्के प्रमाणे लाभ दिल्याचे पुरावे, विद्युत पंप सुरु असल्याबाबतचे स्थळभेट देण्याचे अहवाल लेखापरिक्षणास सादर केलेले नाही.

9) उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही. तसेच साहित्य पुरवठा झाल्यानंतरचा चाचणी अहवाल दप्तरी आढळून आला नाही.

पंचायत समिती स्तरावरील स्टॉकबुक तपासणी केली असता पंचायत समिती, बुलडाणा 11 नग, जळगाव जा.13 नग, चिखली 8 नग, खामगाव 13 नग, मेहकर 2 नग, मलकापूर 8 नग असे एकूण 55 नग साहित्य लेखापरिक्षण दिनांका पावेतो शिल्लक असल्याचे दिसुन येते. लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया योग्य न झाल्याने तथा अनावश्यक खरेदी केल्याने साहित्य पडुन असल्याचे लेखापरिक्षणाचे अभिप्राय आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक परास /1096/ प्रं.क्र.178/ 05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहीत्य खरेदी केले, त्याच वित्त्तीय वर्षात लाभार्थीस लाभ देणे तथा साहित्याचे वाटप होणे आवश्यक असतांना साठा पुस्तके पडताळली असता पुढील वर्षात लाभ देल्याचे आढळून आले आहे खुलासा करावा.

**3.697 50 टक्के अनुदानावर जिल्हा परिषद सेस फंड 2015-2016 अंतर्गत रोटावेटर खरेदी व पुरविणे योजनेमधील खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** 50 टक्के अनुदानावर जिल्हा परिषद सेस फंड 2015-2016 अंतर्गत रोटावेटर खरेदी व पुरविणे योजनेकरिता रक्कम रूपये 15,00,000/- ची तरतुद करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 23/11/2015 च्या शासन निर्णयामधील बाब क्रमांक 17 नुसार शेतकऱ्यांकडुन विशिष्ट अवजारे खरेदीची मागणी असल्याखेरीज कोणत्याही अवजाराची मागणी अधिकाऱ्यांनी स्वत:हुन पुरवठादार संस्थेकडे नोंदवु नये, असे असतांना मागणीबाबत कोणतेही अर्ज प्राप्त नसतांना कसे काय खरेदी करण्यात आली, याबाबत खात्री पटली नाही.

2) दिनांक 23/09/2014 च्या शासन निर्णयातील बाब क्रमांक 01 नुसार लाभार्थीचा मुख्य व्यवसाय हा शेती असावा व त्याच्या स्वत:च्या नावे शेतीचा 7/12 व 8अ हे दाखले असावे, असे असतांना नस्तीमधे लाभार्थी अर्ज नाहीत. तसेच शेतीचा 7/12 व 8अ दाखल्याची प्रत सुध्दा नाहीत. त्यामुळे लाभर्थी हा खरोखर शेतकरी होता किंवा कसे, याबाबत खात्री पटली नाही.

3) दिनांक 23/09/2014 च्या शासन निर्णयातील बाब क्रमांक 04 नुसार लाभार्थी यादया अंतिम करतांना अनुसुचित जाती/ जमाती/ आदिवासी शेतकरी/ महिला शेतकरी यांचा प्राधान्याने विचार करावा, असे असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक / प रा स/1084/ सी आर /1622/प्र.क्र. 197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. सदर योजनेच्या बाबतीत लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसुल न करताच योजना कशी काय राबविण्यात आली आहे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) नस्तीमधे प्रचार प्रसिध्दी दिल्याबाबत कोणतीही नोंद नसल्यामुळे सदर योजनेची माहिती तळागळातल्या शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे तसेच लाभार्थी अर्जसुध्दा ऊपलब्ध नसल्यामुळे सदर योजनेपासुन गरजु शेतकरी वंचित राहिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी योजनेचा उदेद्श सफल झाल्याबाबतची खात्री पटत नाही.

6) सदर रोटाव्हेटर 13 पंचायत समितींना वाटप केल्याची नोंद नमुना नंबर-33 मधील पान क्रमांक 46 वर घेतलेली आहे. परंतू, त्यामधे वाटप करणारयांची व प्राप्त करणाऱ्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेतलेली नाही. त्यामुळे रोटव्हेटरचा वाटप कोणाला करण्यात आला आणि केव्हा करण्यात आला, याची पडताळणी करता आली नाही.

7) शासन निर्णय क्रमांक सुकृऔ2015/प्र.क्र.218/11/अे, दिनांक 23/11/2015 च्या प्रपत्र-2 मधील मार्गदर्शक सुचनेमधील बाब क्रमांक 08 नुसार अवजाराची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या कालावधीत अवजाराचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा संस्थेची राहील व 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या अवजारांच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली म्हणुन पुरवठा संस्थेच्या देयकातुन एकरकमी वसुल करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश असतांना अनियमितता करण्यात आली. त्या अन्वये रक्कम रूपये 46,777/- दंड वसूल करणे आवश्यक आहे.

8) वरीलपैकी पंचायत समिती, लोणार व पंचायत समिती, खामगावला झालेल्या पुरवठादाराकडुन मिळालेल्या पोचपावतीवरील तारीखमध्ये खोडाखोड करुन दिनांक व महिन्यांमधे बदल करण्यात आले. खाडाखोड करण्याचे प्रयोजन काय, याचा खुलासा करणे आवश्यक आहे,

**3.698 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण उपकरणे नॅपसॅक स्प्रेअर आऊट साईड चेंबर पुरवठा करणे बाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 31,99,728/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 30/11/2016 ला दिलेला असतांना पुरवठा आदेशातील शर्ती अटीनुसार तसेच संचालनालय मार्गदर्शक सुचने नुसार 45 दिवसात दिनांक 14/01/2017 पर्यंत पोहोच करावयाचे असतांना दिनांक

02/02/2017 ला साहित्याची पोहोच केलेली आहे. 19 दिवस उशीरा पुरवठा केल्याने कृषी संचालनालयाच्या मार्गदर्शक सुचना तसेच पुरवठा आदेशातील शर्ती अटीनुसार औजाराचे किंमतीचे रूपये 44,00,160/- 3 टक्के रक्कम रूपये 1,32,004/- पुरवठादाराकडून वसुल करावी.

2) योजना सुधारित तांत्रिक मंजुरी आदेशात अट क्रमांक 1 नुसार सदर योजनांतर्गत लाभ प्राधान्याने अनुसूचितजाती / जमाती दारिद्र रेषेखालील विमुक्त जाती अत्यल्प भुधारक, विधवा स्त्री, अपंग महिला शेतक-यांना व इतर शेतक-यांना देण्यात यावा तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1996 अन्वये साहित्य खरेदी पुर्वी लाभार्थी निवड करणे बाबत निर्देश असतांना लाभार्थीची निवड सभेत केल्याबाबत सभेच्या लाभार्थीचे नांव निहाय मंजूर याद्या व ठराव नस्तीबध्द नाही.

3) उपरोक्त पुरवठा आदेशाच्या अटी व शर्तीनुसार सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी संपुर्ण लाभार्थी कडून लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष साहित्य पुरवठादाराचे नावाने जिल्हा परिषदे मार्फत पाठविण्याबाबत निर्देश असतांना सुध्दा नागपूर जिल्हयातील 13 पंचायत समिती मार्फत लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष जिल्हा परिषदे मार्फत पुरवठादारास प्रदान केल्याबाबतच्या पोचपावत्या / दस्ताऐवज नस्तीबध्द नसल्याने प्रत्यक्षात लाभार्थी हिस्सा वसुल झाला अथवा नाही तसेच पुरवठादारास लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रदान झाली अथवा नाही याचा बोध होत नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र.14/38, दिनांक 07/01/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करून साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना लेखापरीक्षण वेळेपर्यंत लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबत दस्ताऐवज नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले असुन केवळ जिल्हा परिषद सेस निधी खर्च करणे हेतुनेच खरेदी केल्याचे दिसुन येते.

4) लेखापरीक्षणास पंचायत समिती निहाय प्राप्त व निवड केलेल्या लाभार्थी अर्जाची नस्ती व लाभार्थी निवडीची मंजूर यादी मागणी करूनही सादर न केल्याने लाभार्थी अर्ज व निवड योग्य असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करून फलश्रृती अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देश असतांना फलश्रृती अहवाल नस्तीबध्द नाही.

**3.699 50 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 49,98,903/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तांत्रिक मान्यता रूपये 50 लाखावरील योजनेस संदर्भ क्रमांक 1 नुसार तांत्रिक मंजुरी शासनाच्या प्रशासकीय विभाग किंवा त्याचे अधिपत्याखालील आयुक्त यांची घ्यावयाची होती. तसेच सदर योजना खर्च 1 कोटी करण्यात आल्यामुळे तांत्रिक मान्यता ही पुरवठा आदेशातील संपुर्ण रक्कमेस घ्यावयाची असतांना जिल्हा परिषद हिस्सा रक्कम रूपये 50 लाखास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांची घेतली आहे.

2) जिल्हा स्तरीय खरेदी समिती सभा इतिवृत्त दिनांक 28/07/2016 चे सभेत DGS & D च्या दरकरारातील मे स्मार्ट फॅबीक जे.एन. मुखर्जी रोड घुगली हावडा पश्चिम बंगाल यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना दिनांक 25/07/2016 च्या पत्रात त्यांचेकडे ISI मानांकित नसल्याने ISI मानांकित वेंडर कडून ताडपत्री निर्मीती करून ताडपत्री निश्चित दरापेक्षा 7.5 टक्के ते 8 टक्के कमी दराने पुरवठा करण्यांस तयार असतांना मे आदिनाथ पॉलिफॅब प्रा.लिमीटेड व लॅबीफॅब ॲन्ड पेपर यांचेकडून जादा दराने खरेदी करण्यात आले आहे. मे स्मार्ट फॅबीक जे.एन. रोड घुगली ISI मार्क ताडपत्री पुरविण्यास तयार असतांना त्यांचेकडून खरेदी केली असती तर रूपये 7,99,824/- बचत झाली असती.

3) साहित्याचा उशिरा पुरवठा 5 दिवस केलेला असुन तरी महाराष्ट्र (परचेस मॅन्युअल) भांडार खरेदी नियम पुस्तीका नियम 11 नुसार 0.50 प्रमाणे प्रतिआठवडा नुसार (746562 x 0.50) = रुपये 3,732/- प्रतिआठवडा प्रमाणे 5 दिवसाचे रुपये 2,666/- दंड वसुल न केल्याने शासन निधीचे नुकसान झाले आहे.

4) दैनिक नवभारत नागपूर दिनांक 05/10/2016 रोजी प्रसिध्द केलेल्या वृत्ताचे अनुषंगाने पंचायत समिती हिंगणा व पंचायत समिती कामठी येथे 300 GSM च्या ताडपत्रीचा पुरवठा करण्यात आल्याचे बातमी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे पत्र क्रमांक 1967, दिनांक 05/10/2016 चे पत्रानुसार दुस-या जिल्हयातील 300 GSM च्या ताडपत्रया कंपनी वाहतूक दाराचे नजर चुकीने प्राप्त झाले असे नमुद असून पंचायत समिती हिंगणा 312 नग व पंचायत समिती कळमेश्वर 201 येथील ताडपत्र्या परत नेवून 340 GSM च्या पुरवठा केल्याबाबत कोणतेच दस्ताऐवज नसल्याने 300 GSM चे पुरवठा केल्याचे दिसते 300 GSM चे दरकरारातील दर रूपये 2467.95 प्रमाणे असतांना 340 GSM चे 2785.68 प्रदान केलेले आहे. प्रती ताडपत्री 317.73 x 513 नग ताडपत्रीचा एकुण रुपये 1,62,995/- जादा प्रदान करण्यात आलेले आहे.

5) लाभार्थी हिस्सा वसुल करून साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना लेखापरीक्षण वेळेपर्यंत लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबत दस्ताऐवज नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले असुन केवळ जिल्हा परिषद सेस निधी खर्च करणे हेतुनेच खरेदी केल्याचे दिसुन येते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1996 अन्वये साहित्य खरेदी पुर्वी लाभार्थी निवड करणे बाबत निर्देश असतांना लाभार्थींची निवड सभेत केल्याबाबत सभेच्या लाभार्थींच्या नावनिहाय मंजूर याद्या व ठराव नस्तीबध्द नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन संकिर्ण 2007/प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वनिधीतून वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात त्या योजनेच्या एकुण पात्र लाभार्थापैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडणेबाबत निर्देश असतांना 3 टक्के अपंग लाभार्थी निवड बाबत दस्ताऐवज तसेच निवड यादी उपलब्ध नसल्याने वरील शासन निर्णयानुसार अपंग लाभार्थींची निवड केल्याची खात्री पटत नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करून फलश्रृती अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देश असतांना फलश्रृती अहवाल नस्तीबध्द नाही.

9) एका लाभार्थीला एका योजनेचा दुबार लाभ मिळू नये म्हणून गांव निहाय व योजने निहाय लाभार्थींची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी मास्टर नोंदवही लेखापरीक्षणांस सादर करण्यात आली नाही.

**3.700 50 टक्के अनुदानावर पेट्रोकेरोसीन ऑईल इंजिन पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** प्रमाणक क्रमांक 2473, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 11,46,769/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी संचालनालय पुणे मार्गदर्शक सुचना दिनांक 23/11/2015 नुसार अ.क्र. 17 नुसार शेतक-याकडून विशिष्ट औजाराची खरेदी मागणी (परचेस ऑर्डर) असल्याखेरीज कोणत्याही औजाराची मागणी स्वत:हुन अधिका-यांनी पुरवठादार संस्थेकडे नोंदवू नये. मागणी अभावी विक्रीविना पडून असलेल्या औजाराची मागणी परत नोंदविल्यास अशी औजारे हंगामा नंतरही विना वाटप पडून राहील्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी अधिकारी यांची राहील व त्याची होणारी लोकवाटा अनुदान रक्कम संबंधीताकडून एक रकमी वसुल करुन पुरवठादार संस्थेला अदा करण्यात येईल. परंतु पंचायत समिती स्तरावर साहित्य शिल्लक असून वाटप करण्यात आले नाही. उदा. पंचायत समिती कामठी 5 नग तसेच पंचायत समिती नागपूर अंतर्गत एकुण 10 नग अशी शिल्लक आहेत. अशी स्थिती सर्व पंचायत समिती स्तरावर असतांना मागणी नसतांना खरेदी करण्यात आली असून शिल्लक साहित्याची जबाबदारी निश्चित करावी.

2) एका लाभार्थीला एका योजनेचा दुबार लाभ मिळू नये म्हणून गांव निहाय व योजने निहाय लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी मास्टर नोंदवही लेखापरीक्षणांस सादर करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1996 अन्वये साहित्य खरेदी पुर्वी लाभार्थी निवड करणे बाबत निर्देश असतांना लाभार्थीची निवड सभेत केल्याबाबत सभेच्या लाभार्थीच्या नाव निहाय मंजूर यादया व ठराव नस्तीबध्द नाही.

4) लेखापरीक्षणास पंचायत समिती निहाय प्राप्त व निवड केलेल्या लाभार्थी अर्जाची नस्ती व लाभार्थी निवडीची मंजूर यादी मागणी करूनही सादर न केल्याने लाभार्थी अर्ज व निवड योग्य असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

5) उपरोक्त पुरवठा आदेशाच्या अटी व शर्तीनुसार सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी संपुर्ण लाभार्थी कडून लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष साहित्य पुरवठादाराचे नावाने जिल्हा परिषद मार्फत पाठविण्याबाबत निर्देश असतांना सुध्दा नागपूर जिल्हयातील 13 पंचायत समिती मार्फत लाभार्थी हिस्सा वसुल करून त्याचे धनादेश / धनाकर्ष जिल्हा परिषद मार्फत पुरवठादारास प्रदान केल्याबाबतच्या पोचपावत्या / दस्ताऐवज नस्तीबध्द नसल्याने प्रत्यक्षात लाभार्थी हिस्सा वसुल झाला अथवा नाही तसेच पुरवठादारास लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रदान झाली अथवा नाही याचा बोध होत नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र.14/38, दिनांक 07/01/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करून साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना लेखापरीक्षण वेळेपर्यंत लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबत दस्ताऐवज नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले असुन केवळ जिल्हा परिषद सेस निधी खर्च करणे हेतुनेच खरेदी केल्याचे दिसुन येते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करून फलश्रृती अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देश असतांना फलश्रृती अहवाल नस्तीबध्द नाही.

**3.701 बायोगॅस सयंत्र बांधकामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 65,74,450/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक बिजीएस2016/प्र क्र 80/पं रा 6, दिनांक 11/08/2016 मधील मुद्दा क्रमांक 07 नुसार शासन स्तरावरून बाबनिहाय उपलब्ध करून देण्यात आलेले अनुदान खर्च करून आर्थिक वर्षाअखेर ताळमेळ पूर्ण करावयाचे आहे. परंतु, बाबनिहाय अखर्चित राहीलेले अनुदान शासनास त्वरीत परत करावयाचे असतांना तशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. शौचालय जोडणीसाठीचे प्राप्त अनुदान रूपये 6,36,000/- एवढी रक्कम शासन खाती जमा करणे आवश्यक असताना जिल्हा परिषद सेस फंड मध्ये जमा करण्यात आली.

2) लाभार्थ्यांना बायोगॅस योजनेचा लाभ दिल्याबाबतचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही. तसेच लाभार्थी ब्युटेन गॅस वापरत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, आखंस/1093/प्र.क्र1239/34 दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास सादर केली नाही.

4) करारनाम्यातील योजनेचा मुळ उद्देश यामध्ये नमूद असल्याप्रमाणे ग्रामीण शेतकरी कुटुंबाजवळ जनावारांचे शेण / मलापासून शेतीपयोगी कंपोस्ट खताची निर्मीती करणे व त्याचा शेतात वापर करून शेती पिकांचे उत्पादनात वाढ करणे असतांना] ज्या शेतकऱ्यांकडे बायोगॅस संयत्र आहे] त्यांनी तयार झालेले कंपोस्ट खताचा वापर स्वत:च्या शेतात करून उत्पादनात वाढ केली किंवा नाही, याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास आढळून आलेला नाही.

**3.702 50 टक्के अनुदानावर सर्वसाधारण लाभार्थ्याना पीव्ही.सी.पाईपचा वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदर बाबत रक्कम रूपये 7,98,765/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणाऱ्या विवीध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्याचे निदर्शनास येते

2) विहीत कालावधीत पंचायत समितीकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेली असून त्यानुसार पंचायत समिती स्तरावर अनूदान शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. सबब शिल्लक अनूदान रुपये 6,37,155/- वित्त विभागाकडे परत केल्याबाबत ताळमेळ घेऊन पुर्तता दाखवावी.

3) सदर योजना राबविण्याकरीता मंजूर लाभार्थी 289 असून योजनेचा लाभ फक्त 63 लाभार्थ्यांनी घेतल्याचे दिसून आले पर्यायाने 226 लाभार्थी लाभ घेण्यापासून वंचित राहिल्याचे दिसते. योजनेचा निधि पुरेसा असतांना योजना 100 टक्के राबविलेली नसल्याने निधी शिल्लक असल्याचे दिसून येते याचाच अर्थ योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. याबाबत समर्पक खुलाशासह पुर्तता दर्शवावी

**3.703 सन 2015-2016 ओटीएसपी योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर शेतीसाहीत्याचा पुरवठा करण्याबाबत**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** 3 प्रमाणकाच्या आधारे विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ, नागपूर यांना साहीत्य खरेदीबाबत रक्कम रुपये 9,65,215/- रक्कमेचे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी मागणी / लाभार्थी अर्ज / लाभार्थी निवड पंचायत समितीकडून प्राप्त लाभार्थी यादी व जिल्हा परिषद सदस्यांनी शिफारस केलेल्या यादीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याचे नमुद केलेले आहे परंतु लेखापरिक्षणाचे वेळी पंचायत समितीकडून प्राप्त अर्ज लाभार्थीचे अर्ज व निवड केलेल्या लाभार्थीची यादी सादर न केल्याने मार्गदर्शिका सुचना क्रमांक विप्र-7/आउयो/अंतरीम/मासु/15-16/209/2015, दिनांक 11/07/2015 अन्वये तांत्रिक अटीशर्ती प्रमाणे लाभार्थ्यांची निवड केल्याबाबत तपासणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1082/645/34, दिनांक 29/07/1989 अन्वये पंचायत समितीचे उपयोगीता प्रमाणपत्र व मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आला नाही.

3) सदर योजनेमध्ये केलेल्या साहित्य खरेदीबाबत वसुल केलेले अभिकरण शुल्क रुपये 45,594/- इतकी रक्कम अभिकरण शुल्क म्हणून भरणा केल्याबाबत अभिलेख नस्तीसोबत जोडण्यात आला नाही. तरी सदर रक्कम शासन खाती भरणा केल्याबाबत लेखापरिक्षणाची खात्री पटवावी.

**3.704 50 टक्के अनुदानावर पीक संरक्षण औषधीचे वाटप करणे.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** प्रमाणक क्रमांक 2149, दिनांक 19/06/2017 रक्कम रुपये 11,99,972/-

सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जिल्हा परीषद गोंदीया येथील कृषी विभागाचे लेखापरीक्षण करतांना पुरवठा आदेश क्रमांक जीपगो/कृषी/जीनीओ/ता3/1511/2016, दिनांक 25/07/2016 अन्वये विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र कडून इन्व्हाइस क्रमांक 16/08/2016 अन्वये औषधी खरेदी करण्यात आली असून प्रमाणक क्रमांक 2149, दिनांक 19/06/2017 रक्कम रुपये 11,99,972/- रकमेचे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद कृषी विकास समीती दिनांक 07/04/2016 ठराव क्रमांक 3.2 नुसार पंचायत समीतीकडून प्राप्त लाभार्थी यादी नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

2) सन 2016-2017 मध्ये पीक सरंक्षण योजना औषधांची प्रदान करायची रक्कम ही लाभार्थी हिस्सा व शासन हिस्सा अशी एकत्र रक्कम पुरवठाधारकास प्रदान करावयाचे आहे मात्र लाभार्थी हिस्सा रक्कम वसुल न करता

शासन हिस्स्याची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. मंजुर लाभार्थी संख्या 128 लाभार्थ्याकडून लाभार्थी हिस्सा वसुल केल्याबाबतची माहीती नास्तीमध्ये नमुद नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्रक्र4871/वित्त-3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वनिधीतुन वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात त्या योजनेच्या एकुण पात्र लाभार्थ्यांपैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडणेबाबत निर्देष असतांना 3 टक्के लाभार्थी निवड बाबत दस्ताऐवज तसेच निवड यादी उपलब्ध नसल्याने वरील शासन निर्णयानुसार अपंग लाभार्थ्याची निवड केल्याची खात्री पटली नाही.

4) पंचायतसमीती स्तरावर औषधी वाटप झाल्यानंतर प्राप्त औषधी कोणत्या दिनांकास शेतक-यांना वाटप झाली याची माहीती नास्तीमध्ये नमुद नाही. शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी/2008/प्र.क्र.446, दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रक नेमुन दिले आहे. परंतु यानुसार कारवाई योजना राबवतांना केल्याचे दिसुन येत नाही.

5) शासन निर्णय क्रमांक परास-1089646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रृती अहवाल शासनास सादर करणेबाबत निर्देष असतांना फलश्रृती अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आले नाही

**3.705 शेतकरी लाभार्थ्यांना 5 एच.पी. डिझेल इंजिन 80 टक्के अनुदानावर उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 28 दिनांक 29/03/2017 अन्वये रक्कम रूपये 23,60,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक 1515/प्रक./115/4ऐ, दिनांक 23/03/2015 अन्वये मुद्दा क्रमांक 09 अन्वये ज्या शेतकऱ्यांकडे विहीर उपलब्ध आहे, त्यांना या घटकाचा लाभ देण्यात यावा. तथापि, जे शेतकरी ओढा, नदी, नाला, सार्वजनिक स्त्रोत असलेल्या पाण्याचा वापर करु इच्छित आहेत, त्यांच्याकडे संबंधित उपकार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांच्याकडून पाणी उपसा करण्यासाठी परवाना उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे, असे नमूद आहे. परंतु, ज्या 118 लाभार्थ्यांना याचा फायदा दिला, त्यांच्याकडून असे प्रमाणपत्र घेतले किंवा नाही, याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.

2) सदर योजनेखालील डिझेल इंजिनचे वाटप पंचायत समिती स्तरावरुन करण्यात आले असून लाभार्थ्यांना योग्य प्रकारे डिझेल इंजिन वाटप केल्याचे उपयोगीता प्रमाणपत्र कोणत्याही पंचायत समितीकडून सादर करण्यात आले नाही. एकूण 118 डिझेल इंजिनचे वाटप 09 पंचायत समिती स्तरावरुन करण्यात आले.

3) लाभार्थी निवडीचे निकष कोणते लावण्यात आले? याची माहिती सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

**3.706 पिक संरक्षक अंतर्गत शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर ताडपत्रीचे वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** प्रमाणक क्रमांक 79, दिनांक 14/12/2016 अन्वये रक्कम रूपये 7,23,900/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2011/प्र.क्र.31-अ, दिनांक 22/11/2011 चे अनुक्रमांक 11 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार वाटप केलेली ताडपत्री ही विहित गुणवत्तेनुसार असल्याचे क्षेत्रिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसुन आले नाही.

2) लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल करतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना 10 मधील पावत्या पंचायत समितीने लाभार्थ्यांना देऊन तशी नोंद रजिस्टरला घेणे आवशयक आहे व त्यानुसार रजिस्टरची छायांकीत प्रत जिल्हा परिषदेला सादर करणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) राबविलेली योजना ही प्रशासकीय मान्यतेपासुन तर खरेदीपर्यंतची पुर्णत प्रक्रिया ही, कृषि विभागाने केलेली आहे. लाभार्थ्यांचे प्रस्ताव अर्ज सुध्दा पंचायत समिती स्तरावरुन मागवुन प्रस्तावानुसार अर्जाची छाननी करुन निवड प्रक्रिया पुर्ण केलेली आहे. नाममात्र सदर साहित्य पंचायत समिती स्तरावर पाठवुन पंचायत समितीने फक्त वाटप दर्शविले आहे. असे असतांना एवढी मोठी योजना प्रत्येक वर्षी जिल्हा परिषद राबवित असतांना कृषि विभागाने दिलेल्या लाभाची लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे सुध्दा गरजेचे आहे. मात्र तशी नोंदवही विभागाकडे मागीतली असता पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावरुन असे दिसते की, योजना स्वत: राबविणे व मास्टर नोंदवही पंचायत समितीने ठेवणे संयुक्तीक ठरत नाही. प्रत्येक वर्षी लाभार्थ्यांची निवड करतांना पंचायत समिती स्तरावरुन प्रस्ताव मागणे व त्या प्रस्तावाचे आधारे लाभार्थ्यांना लाभ प्रदान करणे. परंतु, विभागाने आपले स्तरावर मास्टर नोंदवही न ठेवणे ही, बाब योग्य वाटत नाही. मास्टर नोंदवही विभागाकडे नसल्याने चालु लेखापरीक्षणांत मागील वर्षात दिलेल्या लाभाची लाभार्थ्यांची पडताळणी करता येत नसल्याने दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/सीआर/-1074/57, दिनांक 27/07/1983 नुसार ताडपत्रीचा पुरवठा शेतकऱ्यांना वितरीत केल्यानंतर उद्दिष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे नस्तीसोबत दिसुन आले नाही.

**3.707 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पिक संरक्षण उपकरण नॅपसॅक स्प्रेअर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** प्रमाणक क्रमांक 119, दिनांक 09/03/2017 अन्वये रक्कम रूपये 30,97,884/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांची निवड ही, साहित्य खरेदीपुर्वी करण्यात आल्याचे दिसत नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2011/प्र.क्र.31-अ, दिनांक 22/11/2011 चे अनुक्रमांक 11 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार वाटप केलेली अवजारे ही, विहित गुणवत्तेची असल्याचे क्षेत्रिय अधिका-याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये नस्तीसोबत दिसुन आले नाही.

3) उपरोक्त मार्गदर्शक सुचनेनुसार कृषि अवजारांची खरेदी करतांना बाजारभावाप्रमाणे किंमती पाहिल्याचे दिसुन येत नाही.

4) सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडुन नॅपसॅक स्प्रेअर साहित्याची 25 टक्के रक्कमप एकुण 1224+754 नग साहित्यासची रक्कम रुपये 10,32,220/- लेखापरीक्षण दिनांक 06/09/2017 पर्यंत वसुल करण्यात आलेली नव्हती. तरी संबंधीत लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल करून सदरची रक्कम पुरवठादारास प्रदान करणे आवश्यक आहे.

5) लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल करतांना महाराष्ट्र जिल्हात परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना 10 मधील पावत्या पंचायत समितीने लाभार्थ्यांना देऊन तशी नोंद रजिस्टरला घेणे आवश्यक आहे व त्यानुसार रजीस्टरची छायांकीत प्रत जिल्हा परिषदेला सादर करणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

6) योजना प्रत्येक वर्षी जिल्हर परिषद राबवित असतांना कृषि विभागाने दिलेल्या लाभाची लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणेसुध्दा गरजेचे आहे. मात्र् तशी नोंदवही विभागाकडे मागीतली असता पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावरुन असे दिसते की, योजना स्वत: राबविणे व मास्टर नोंदवही पंचायत समितीने ठेवणे संयुक्तीक ठरत नाही. प्रत्येक वर्षी लाभार्थ्यांची निवड करतांना पंचायत समिती स्तरावरुन प्रस्ताव मागणे व त्या प्रस्तावाचे आधारे लाभार्थ्यांना लाभ प्रदान करणे. परंतु, विभागाने आपले स्तरावर मास्टर नोंदवही न ठेवणे ही बाब योग्य वाटत नाही. मास्टर नोंदवही विभागाकडे नसल्याने चालु लेखापरीक्षणांत मागील वर्षात दिलेल्या लाभाची लाभार्थ्यांची पडताळणी करता येत नसल्याने दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/ सीआर /-1074/57, दिनांक 27/07/1983 नुसार साहित्याचा पुरवठा शेतक-यांना वितरीत केल्यानंतर उद्दिष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे नस्तीसोबत दिसुन आले नाही.

**3.708 शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर सेंद्रिय खताचे वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18)** - प्रमाणक क्रमांक 100, दिनांक 18/02/2017 अन्वये रक्कम रूपये 30,99,780/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2011/प्र.क्र.31-अ, दिनांक 22/11/2011 चे अनुक्रमांक 11 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार वाटप केलेले सेंद्रिय खत हे विहित गुणवत्तेचे असल्याचे क्षेत्रिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसुन आले नाही.

2) पुरवठा आदेश क्रमांक 2021 दिनांक 05/12/2016 नुसार पंचायत समिती स्तरावर सेंद्रिय खत पुरवठा केलेला आहे. खताचे नमुने (Sample) पंचायत समिती स्तरावरुन घेवुन क्षेत्रिय कार्यालयात पाठविणेबाबतची कार्यवाही करावयाची आहे. मात्र सदर योजनेच्या प्रकरणात विहित नमुन्यातील Form K-1 मध्ये नमुन्याची तपासणी दिनांक 12/01/2017 नोंदविल्याने खताच्या पुरवठयापुर्वीच खताचे नमुने कशाचे आधारे प्राप्त करुन क्षेत्रिय स्तरावरील कार्यालयात पाठविण्यात आलेले आहे? यावरुन खताच्या नमुन्याची तपासणीकरीता औपचारीकरित्या नमुने विभागाने पुरवठादाराकडुन प्राप्त करुन चांगल्या प्रतीचे नमुने प्रयोगशाळेत पाठविणेबाबतची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर केलेल्या खताची तपासणी करण्यात आल्याचे दिसत नाही. याबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/ सीआर /-1074/57, दिनांक 27/07/1983 नुसार साहित्याचा पुरवठा शेतकऱ्यांना वितरीत केल्यानंतर उद्दिष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे नस्तीसोबत दिसुन आले नाही.

**3.709 रोखपुस्तकातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोलीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणाचे वेळी रोख पुस्तकाची दिनांक 07/10/2017 रोजी तपासणी केली असता रक्कम रुपये 2,14,291/- शिल्लक असल्याचे आढळून आले.

दिनांक 02/07/2014 रोजी रोख पुस्तकात रक्कम रूपये 4,12,823/- शिल्लक आहे. परंतू, तत्कालीन (माजी) रोखपाल श्री. ए.बी. किन्नाके, कनिष्ठ सहाय्यक लेखाकडून श्री. पि.जे. नंदनवार कनिष्ठ सहाय्यक रोखपाल यांना दिनांक 10/07/2014 रोजी कार्यभार देतेवेळी रक्कम रूपये 805/- प्राप्त झाले व आठ दिवस नंतर रक्कम रूपये 2,13,486/- चे डी.डी. प्राप्त झाल्याचे श्री. नंदनवार, कनिष्ठ सहाय्यक यांचे पत्र दिनांक 19/09/2014 नुसार आढळून येते व सदर रक्कम दिनांक 14/07/2014 रोखपुस्तकात जमा बाजूला घेतलेली आहे तरी रक्कम रूपये 1,98,527/- ची तफावत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 13 व नियम 49 नुसार परिषदेच्या वतीने घेतलेल्या पैशाचा विहित नोंदवहीत हिशोब ठेवावा व अशा रकमेचा चालन तयार करुन विनाविलंब जास्तीत जास्त चोविस तासाचे आंत बँकेत किंवा कोषागारात भरणा करावा, अशी तरतूद आहे. परंतू, त्याचे पालन होत असल्याचे आढळून आले नाही. रक्कम रुपये 2,13,486/- व इतर कपातीच्या रकमा बऱ्याचा कालावधीपासून D.D. स्वरुपात प्रलंबीत आहे. D.D. सुद्धा कालबाह्य झालेला आहे. ही गंभीर अनियमितता आहे. सदर रकमा कशाच्या आहे? याचा तपशील विभागाकडे नाही. तरी प्रलंबीत रक्कम संबंधीतांना पाठवून उर्वरीत रक्कमा तात्काळ शासन खाती जमा करुन विलंबाच्या कारणासह अनुपालन सादर करावे.

2) प्रलंबीत रक्कम लक्षात घेता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50, 56 व 57 नुसार कार्यवाही करुन रोखपुस्तक दैनिक शिल्लकेसह दररोज बंद करुन त्यावर सहाय्यक लेखाधिकारी

यांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतू, तसे होत नसल्याचे दिसून आले. यावरुन तत्कालीन सहाय्यक लेखा अधिकारी यांचे पर्यवेक्षकीय नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते. तसेच लेखा संहिता 1968 चे नियम 50(2) नुसार तिन महिन्याचे वर प्रलंबीत रकमेबाबत वेळीच कार्यवाही न केल्यामुळे अफरातफर करण्यास वाव मिळाला.

3) लेखा संहिता 1968 चे नियम 42 नुसार रोख पुस्तकातील शिल्लक रकमेची मासिक तपासणी, त्रैमासिक अचानक तपासणी झाल्याचे आढळून आले नाही.

4) श्री. ए.बी. किन्नाके तत्कालीन कनिष्ठा सहाय्यक लेखा (रोखपाल) कृषी विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी दिनांक 10/07/2014 रोजी कार्यभार देते वेळी रोखपुस्तकातील शिल्लक रूपये 4,12,018/- + 805/- = 4,12,823/- पैकी रक्कम रूपये 2,13,486/- डीडी स्वरुपात दिले व रक्कम रूपये 805/- रोख स्वरुपात अशी एकूण रक्कम रूपये 2,14,291/- दिलेले आहे. रक्कम रूपये 1,98,532/- कमी दिलेले आहे. यावरुन त्यांनी रक्कम रूपये 1,98,532/- ची अफरातफर झालेचे दिसते. त्यामुळे मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी अवि/स्थाप/580/2017, दिनांक 22/03/2017 चे ज्ञापनाव्दारे त्याचे विरुद्ध कार्यवाही प्रस्तावीत केल्याचे दिसून येते. परंतू, अंतिम निर्णय होणे बाकी आहे. तरी रक्कम वसुलीबाबत तत्काळ कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

कृषी विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोलीला महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 210(अ) नुसार रक्कम रूपये 1,000/- कायम अग्रिम मंजूर आहे. परंतू, लेखापरिक्षणाचे तारीख 07/10/2017 रोजी रक्कम रूपये 805/- आढळून आले. रक्कम रुपये 195/- कमी आहे. लेखा संहिता 1968 चे कलम 211 नुसार वेळोवेळी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रक्कम रूपये 195/- संबंधीतांकडून वसुल करुन रोख पुस्तकात जमा करण्यात यावे.

**3.710 डेल कंपनीचे संगणक संच खरेदी करून पंचायत समितींना पुरविण्यातील अनियमितता .**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1446, दिनांक 05/12/2016, अन्वये रक्कम रूपये 1,95,000/- मे.सिलीकॉन सिस्टम, गडचिरोली यांचे पावती क्रमांक 554, दिनांक 05/11/2016 नुसार डेल कंपनीचे 6 नग संगणक संच प्रती रूपये 32,500/- प्रमाणे खरेदी केली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्रं.82/भाग-III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील अट क्रमांक 8 व 9 चे परिच्छेद क्रमांक 3.2 व 3.2.3 नुसार एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातुन करण्यांत आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रूपये 3.00 लक्ष पेक्षा जास्त नसावे. तसेच अट क्रमांक 10 चे परिच्छेद क्रमांक 4.1 मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रूपये 3.00 लक्ष पेक्षा अधिक असेल, तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यांत आले आहे. सदर विभागाने एका आर्थिक वर्षात (जिल्हा निधीतुन प्रमाणक दिनांक 07/03/2017, रूपये 1,95,000/- तसेच दिनांक 05/11/2016 नुसार रक्कम रूपये 1,95,000/- असे एकूण रक्कम रूपये 3,90,000/- संगणक या एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यामातुन स्थानिक पुरवठाधारकाकडून रक्कम रूपये 3.00 लक्षपेक्षा अधिक रक्कमेची खरेदी ई-निविदा प्रणालीचा वापर न करता नियमबाहय खरेदी करण्यांत आलेली आहे.

2) विकास आयुक्त्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून संगणकाबाबत शासन दर करार नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त न करताच स्थानिक पुरवठाधारकाकडून दरपत्रक मागवुन संगणक खरेदी करण्यांत आले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.कं-514/वित्त्त-9, दिनांक 20/11/2009 मधील तरतुदीनुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी पुरवठाधारकाकडून किंवा अधिकृत विक्रेत्याकडून रूपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा न केल्यामुळे शासन महसुलाची हानी झालेली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम-83(3) नुसार खरेदी केलेले डेल कंपनीचे 6 नग संगणक योग्य दर्जाची व सुस्थितीत पाप्त झाल्याबाबत कृषी विकास अधिकारी, कृषी विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी साठा-पंजी माल पुस्तकांत प्रमाणित केलेले नाही.

5) माल साठा-पंजी नोंदवही तपासले असता, खरेदी केलेले 6 नग संगणक संच, पंचायत समिती-धानोरा, कोरची, गडचिरोली, कुरखेडा, अहेरी व भामरागड यांना प्रती एक(1) नग दिनांक 27/12/2016 व 29/12/2016 ला वाटप केल्याचे साठा-नोंदवहीचे पान क्रमांक 38 वर नमुद आहे. परंतु, संबंधित पंचायत समितीकडून उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना ते प्रमाणपत्र प्राप्त करण्यांत आले नाही.

6) खरेदी केलेल्या साहित्याची नोंद जंगम मालमत्ता रजिस्टरवर घेण्यांत आलेली नाही.

**3.711 आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना खर्चातील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत 6 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 40,49,085/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बैलगाडी, ऑईलइंजिन, डिझेलपंप या कृषी अवजारावरील लाभार्थी हिस्सा रक्कम अनुक्रमे प्रति लाभार्थी रूपये 1,800/-, रूपये 6,400/- व रूपये 4,000/- याप्रमाणे रूपये 77,400/- 46 नग (बैलजोडी) रूपये 64,000/- 85 नग (ऑइलइंजिन 5 एच.पी.) व रूपये 32,000/- 8 नग (डिझेलपंप 5 एच.पी.) एकुण रक्कम रूपये 1,73,400/- प्राप्त केल्याबाबत दस्तऐवज नस्तीला आढळुन आली नाही.

2) पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोचपावती (Invoice) वर संबंधीत कृषी अधिकारी यांची स्वाक्षरी असुन साठा नोंद पान क्रमांक नमुद केलेले आहे. परंतु, सदर साठापुस्तक साहित्यांची नोंद व लाभार्थ्यांना साहित्य वितरण केल्याबाबतची नोंदवही / सत्यप्रत तपासणीस उपलब्ध झाली नाही.

3) शासन निर्णय क्रमांक आउयो/2415/प्रक्र243/4ए, दिनांक 16/07/2016 मार्गदर्शक सुचनामध्ये नमुद केल्यानुसार लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय व लाभार्थीनिहाय नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. या नोंदवहीची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी साक्षांकीत करणे आवश्यक आहे. परंतु, सदरची नोंदवही ठेवण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

4) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने विहीतनमुन्यात (प्रपत्र 2) कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी प्रत्येक पंचायत समितीमधील 05 टक्के, जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के व कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती स्तर यांनी 100 टक्के लाभार्थी तपासणी करणे आवश्यक आहे. सदरचा तपासणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

**3.712 50 टक्के अनुदानावर शेतक-याचा पिव्हीसी / एचडीपीई पाईप पुरवठामधील अनियमितता**.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 884, दिनांक 20/10/2016 अन्वये रक्कम रुपये 9,97,944/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एचडीपीई पाईप खरेदी 50 टक्के अनुदान 9,97,944/- व 50 टक्के लाभार्थी हिस्सा 10,01,812/- असे एकुण 19,99,756/- ची योजना आहे. परंतु, प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी 10,00,000/- घेतलेली आहे. शासन निर्णय दिनांक 31/01/2013 नुसार सदर योजनेस अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु, तसे केल्याचे दिसुन येत नाही.

2) सन 2016-2017 मधील लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 10,01,812/- जमा केल्याबाबतचा तपशिल व पंचायत समिती निवड केलेली लाभार्थीची यादी नस्तीला आढळुन आली नाही.

3) नग 3,868 पाईपचा पुरवठा पंचायत समितीस्तरावर करण्यात आल्याचे दिसुन येते. पाईप कधी पाठवले, याच्या तारखा नमुद नाही. पंचायत समितीस्तरावर त्याची नोंद साठा पुस्तकात घेतलेली आहे. परंतु, त्याचे वाटप लाभार्थ्यांना झाले काय? याचा वाटप अहवाल, शिल्लक साठाबाबत अहवाल अप्राप्त आहे.

4) उपयोगिता प्रमाणपत्र अनुक्रमांक, योजनेचे नाव, लाभार्थ्यांचे नाव, गाव, ( जात / BPL / अल्पभुधारक ) योजनेच्या निकषानुसार कोणत्या प्रवर्गाचा आहे? अनुदान, लाभार्थी हिस्सा इत्यादी तपशीलसह अप्राप्त आहे. फलश्रृती अहवाल अप्राप्त आहे.

5) लेखा संहीता 1968 चे कलम 20 व 21 नुसार पुरवठादाराची रक्कम रूपये 9,97,944/- ची (पावती क्रमांक 722) प्राप्त आहे. परंतू, त्यावर स्टँप लावलेला नाही. लाभार्थी हिस्सा रक्कम मुद्रांक पावत्या अप्राप्त आहे.

7) सदर योजनेअंतर्गत कृषी विषय समिती दिनांक 29/06/2016 नुसार लाभार्थी निवडीसाठी जे निकष ठरविले होते. त्यानुसार लाभार्थी निवड पंचायत समितीस्तरावर झाल्याबाबत मंजुरी पत्र उपलब्ध झाले नाही.

8) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील अनुच्छेद 63 अन्वये प्रत्येक कार्यकंत्राट (Work Contract) चे वेळी 10 लक्ष पर्यंत रूपये 100/- व 10 लाखामधील प्रत्येक लाख किंवा त्याचे भागास रूपये 100/- प्रमाणे मुद्रांक लावणे जरूरी आहे. परंतू, खरेदीच्या वेळी करारनामा केलेला नाही. त्यामुळे शासन महसुल रक्कम रूपये 1,100/- चे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम संबंधीत कडून वसुल करुन शासन खाती जमा करुन अनुपालन सादर करावे.

**3.713 शेतक-यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य मधील अनियमितता**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सन 2016-2017 मध्ये जनजाती उपयोजना अंतर्गत सन 2015-2016 मधील अखर्चीत रक्कम रूपये 1,12,41,000/- कृषी विभागामार्फत शेतक-यांना कृषी विकासासाठी आर्थिक सहाय्य करुन कृषी उत्पादन वाढवुन त्याचा विकास घडवुन त्यांना दारीद्रय रेषेवर आणण्याकरीता मदत करणेस्तव कृषी साहित्य बैलगाडी, एच.डी.पी.ई. पाईप, डिझेल पंप, विद्युत पंप, स्प्रे पंप (नॅप सॅक), स्प्रेपंप, पॉवर स्प्रेअर कम डस्टर इत्यादी पुरविणे योजना राबविण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी हिस्सा (लोकवाटा) रक्कम रूपये 3,05,600/-/- जमा केल्याबाबत तपशील नस्तीला आढळुन आला नाही.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो 1515/प्र.क्र.115/4अे, दिनांक 12/06/2015 परीशिष्ट-एक नुसार कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देणेस्तव बाब व बाबनिहाय अनुदानाची टक्केवारी व अनुदान मर्यादा ठरवुन दिलेली आहे. परिशिष्ट चार (तीन) नुसार लाभार्थी निवडीचा कालावधी योजनेचा अंमलबजावणीसाठी निवड झालेले वर्ष व त्यापुढील वर्ष असा दोन वर्षाचा आहे. त्यामुळे सन 2015-2016 मध्ये निवड झालेले लाभार्थीपैकी दिनांक 31/03/2016 अखेर किती लाभार्थ्यांना लाभ दिला? दिनांक 01/04/2016 ला किती लाभार्थी शिल्लक आहेत? याचा आढावा घेऊन सन 2016-2017 चे लाभार्थी निवड करणे अपेक्षित आहे. तसेच प्रथम सन 2015-2016 मधील लाभार्थीचा लाभ देणे अपेक्षित आहे. परंतु, तसे केल्याचे दस्ताऐवजावरुन आढळुन आले नाही.

2) लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवर अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय, लाभार्थीनिहाय, देण्यात आलेल्या लाभाची अनुदानाची नोंदवही कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे व या नोंदवहीची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी (विद्यओ) यांनी सांक्षाकींत करणे आवश्यक आहे. परंतु, अशी नोंदवही ठेवल्याचे आढळुन आले नाही.

3) लेखा संहीता 1968 चे कलम 20 व 21 नुसार पुरवठादाराकडुन मुद्रांक पावत्या प्राप्त केल्या नाहीत.

4) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे मार्गदर्शक सुचना जा.क्रं. विप्र-7 /विघयो/15-16/210/15, दिनांक 11/04/2014 अनुक्रमांक 14 नुसार कृषी विकास अधिकारी यांनी 5 टक्के तपासणी करुन तपासणीचा अहवाल शासनास पाठविणे आवश्यक आहे. परंतु, अहवाल पाठविल्याचे आढळुन आले नाही.

5) मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थी निवड प्रक्रिया जून अखेर पूर्ण करणे अपेक्षीत आहे. तसेच नवीन विहिरी व्यतिरिक्त इतर बाबींचा लाभ जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत देणे अपेक्षीत आहे. परंतू, त्याचे वेळापत्रक पाळल्याचे दिसून आले नाही. सन 2015-2016 मधील बाबींचा लाभ सन 2016-2017 मध्ये दिल्याचे आढळून आले.

6) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील अनुच्छेद 63 अन्वये प्रत्येक कार्यकंत्राट (Work Contract) चे वेळी 10 लक्ष पर्यंत रूपये 100/- व 10 लाखामधील प्रत्येक लाख किंवा त्याचे भागास रूपये 100/- प्रमाणे मुद्रांक लावणे जरूरी आहे. परंतू, खरेदीच्या वेळी करारनामा केलेला नाही. त्यामुळे शासन महसुल रक्कम रूपये 5,000/- चे नुकसान झालेले आहे.

**3.714 अनुसुचीत जाती उपयोजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर आधारित शेतक-यांना विविध शेतीची औजारे पुरवठा करणे बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** अनुसुचीत जाती उपयोजना अंतर्गत 100% अनुदानावर आधारित शेतक-यांना विविध शेतीची औजारे पुरवठा करणेकरिता रक्कम रूपये 1,49,57,479/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-093/प्र.क्र.239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने राबविलेल्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहीची तपासणी करीता विविध प्रकारची औजारे / साहित्य लेखापरिक्षण कालावधीपर्यंत वाटप झाले नव्हते.

2) महाराष्ट्र शासन निर्णय कृषी व पदुम विभाग क्रमांक विघयो/1515/प्र.क्र.115/4अे, दिनांक 12/06/2015 नुसार योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करावे असे आदेश असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय पुणे यांचे अंतरिम मार्गदर्शक सुचना विप्र7/विघयो/ अंतरिम मासु/15-16/210/15, दिनांक 11/04/2015 अनुक्रमांक 14 मधील अनुक्रमांक 1 व 2 नुसार विविध योजनांची तपासणी कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी त्या प्रमाणात केल्याबाबत अहवाल दिसून येत नाही.

4) तालुका स्तरावर लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहित्याची नोंदी समोर दिनांक नमूद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामूळे साहित्य केव्हा वाटप करण्यात आले याची खात्री करता आली नाही. लेखापरिक्षण कालावधीपर्यंत साहित्य / औजारे वाटप झाली नाही. त्यामूळे योजनेचा उददेश सफल झाला नाही. तसेच ठराविक वेळेत योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळाला नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक 1069/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही सोयगांव, औरंगाबाद, पैठण, फुलंब्री इत्यादी तालूकास्तरावर ठेवण्यात आली नाही. त्यामूळे एकाच व्यक्तीला अथवा कुटुंबातील दोन व्यक्तीला दुबार लाभाबाबत खात्री करता आली नाही.

6) अनुक्रमांक 6 व 7 प्रमाणकांच्या अंतिम प्रदान आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

7) सदरील योजनांच्या प्रशासकीय व तांत्रिक मजूरी आदेशामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे अल्पभुधारक व महिला शेतक-यांना प्राधान्याने तसेच कुटुंबातील एका व्यक्तीला लाभ द्यावा अशा सुचना आहेत. तथापि नोंदवहया न ठेवल्याने अशी पडताळणी करता आली नाही.

8) सदरील योजनांच्या लाभार्थ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आली नाही.

**3.715 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना निंबोळी पल्बरायझर पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना निंबोळी पल्बरायझर पुरविणेकरिता रक्कम रूपये 4,94,760/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा पुर्व तांत्रिक तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

2) पुरवठा झाल्यानंतर चाचणी अहवाल/ गुणवत्ता चाचणी व तपासणी कृषी विद्यापीठ/ शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांचा तपासणी अहवाल संचिकेत जोडण्यात यावा.

खुल्या बाजारीतील दराशी तुलना करण्यात आली नाही.

3) लाभार्थी हिस्सा जमा झाला किंवा नाही, याबाबत अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे पडताळणी करता आलेली नाही

4) मास्टर रजिस्टर जिल्हा स्तरावर ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे दुबार लाभाच्या बाबतीत पडताळणी करता आलेली नाही.

5) मागणी व मंजुर अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

**3.716 विशेष घटक योजने सन 2014-15 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना 100% अनुदानावर सुधारित शेती औजारे/साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** विशेष घटक योजनेतंर्गत 100% अनुदानावर शेतकऱ्यांना 3HP/5HP ओपनवेल सबमार्सिबल पंपसंच, ताडपत्री, नौपसौक स्प्रेअर (16 लिटर), न्युमौटिक पावर स्प्रेअर, 3HP (ओपनवेल सबमार्सिबल) व पेट्रोल स्टार्ट डीझेल रण पंपसंच (इंजिन), सिड कम फर्टी ड्रील, बैलगाडी, ॲडजेष्टबलब्लेड हॅरो, एच.डी.पी.ई.पाईप्स व डवरा संच पुरवठा करणे बाबत रक्कम रूपये 1,45,79,543/- खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विशेष घटक योजने सन 2014-15 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना 100% अनुदानावर सुधारित शेती औजारे/साहित्य पुरवठा करणे बाबत सन 2014-15 मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असतांना तसेच शेती औजरांसाठी महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ यांचेशी शासनाने दरकरार केलेला असतांना विभागाने सन 2014-15 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना लाभ न देता सन 2015-16 चे अनुदानातून लाभ देण्यात येऊन त्या बाबत द्यावायचा लाभाचे शेती औजारे/साहित्य वाटप करिता खरेदी करावयाचे साहित्याचे पुरवठा आदेश सन 2015-16 च्या अखेरीस (दिनांक 28/03/2016 ते 31/03/2016 या दरम्यान) दिलेले असून प्रत्यक्ष साहित्य पंचायत समिती स्तरावर माहे नोव्हेंबर 2016 मध्ये व त्यानंतर प्राप्त झाले आहे. सदरील साहित्य त्यानंतर पंचायत समिती स्तरावरून शेतकऱ्यांना वाटप केले आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना योजनेचा वेळीच लाभ देण्यात आलेला नाही. तसेच अनुदान व्यपगत होऊ नये या कारणास्तव वर्ष अखेरीस पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक मागास1093 / प्र.क्र.1239 / 34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक7 नुसार जिल्हा परिषदेने ज्या योजना राबविलेल्या आहेत त्या योजनेचे साहीत्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. तथापि सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झलेले नाही.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय आदेशामध्ये व तांत्रीक मंजुरी आदेशामध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे अल्प भुधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एका कुंटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्तींना लाभ देण्यात येवू नये अशा सुचना आहेत. तथापि कृषी विभागाने पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर तशा लाभार्थ्यांच्या नोंदवहया न ठेवल्या मुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही

4) तालुका स्तरावरुन लाभर्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहीत्याच्या नोंदी समोर दिनांक नमूद करणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे साहीत्य केंव्हा वाटप करण्यात आले या बाबत अचुक खात्री करता आली नाही.

5) नौपसौक स्प्रेअर (16 लिटर) व न्युमौटिक पावर स्प्रेअर अनुक्रमे 51 नग व 162 नग पुरवठा करणे बाबत शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, बीड यांना पुरवठा आदेश क्रमांक 158, दिनांक 10/03/2016 व क्रमांक 157 दिनांक 10/03/2016 दिलेला असताना महामंडळामार्फत पुरवठा करण्यास उत्पादकांनी असमर्थतता दर्शविल्याने शासन निर्णय क्र.सुक्रुऔ/2013/प्र.क्र.77/11 अ, दिनांक 30/03/2016 अन्वये शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अ, दिनांक 23/11/2015 च्या शासन निर्णयातील समाविष्ठ उत्पादाकडून थेट खरेदी करण्यास दिनांक 31/03/2016 पर्यंत काढण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशाकरीताच अनुज्ञेय राहील या अटीवर मान्यता दिलेली आहे. पुरवठा आदेश हे दिनांक 30/03/2016 रोजीचेच असून प्रत्यक्षात शासन निर्णयाचे दिनांकास असे साहित्य पुरवठा आदेश देणे शक्य नसून विलंबाने मागील दिनांकास पुरवठा आदेश दिल्याचे सिद्ध होते तसेच

तत्परतेने दिलेल्या पुरवठा आदेशाचे साहित्य हे पंचायत समिती स्थरावरील साठा नोंदवहीत प्राप्त साठा व वाटपाची तपासणी केली असता नोंदवहीतील नोंदीनुसार उदाहरणार्थ पंचायत समिती परळी, साठा नोंदवही नमुना नंबर 32 चे पृष्ठ क्रमांक 17 वर ताडपत्री पुरवठ्याचा क्रमांक 229, 222 अन्वये वाहन क्रमांक एम.एच.20 डीई-6253 द्वारे 29 नग दिनांक 28/11/2016 रोजी प्राप्त झाले असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. याप्रमाणेच इतर साहित्याच्या नोंदीपृष्ठ क्रमांक 02, 27, 22, 07 दिनांक 28/11/2016 व त्या नंतर प्राप्त झालेला आहे. तसेच या प्रमाणेच वरील विवरणातील इतर सुधारित कृषी औजारांचा पुरवठाही दिनांक 28/11/2016 नंतर प्राप्त आहे. त्यामुळे पुवठा आदेशातील अटीनुसार व शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 अ, दिनांक 23/11/2015 सोबतचे मार्गदर्शक सूचना मधील अनुक्रमांक 8 नुसार 45 दिवसाच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करणे आवश्यक आहे व 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किमतीच्या 3% रक्कम पुरवठादार संस्थेच्या देयकातून एक रकमी वसूल करण्यात येईल अशी तरतूद असताना अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. तरी पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3% रक्कम परिगणित करून वसूल करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) 3HP (ओपनवेल सबमार्सिबल)व पेट्रोल स्टार्ट डीझेलरण पंपसंच (इंजिन) 3600 RPM 21 नग पुरवठा करण्याचे शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, बीड यांना आदेश क्रमांक जीपबी / कृषी / विघ / 285 / 15, दिनांक 27/03/2015 अन्वये दिलेले आहे. सदरील औजारे पंचायत समिती अंबेजोगाई, बीड, माजलगाव, परळी वै.वडवणी व शिरूर कासार यांचे पोहोच चालन वरील साठा नोंदवही चे प्रमाणपत्रानुसार औजारांचा साठा दिनांक 06/06/2016 ते दिनांक 07/06/2016 रोजी प्राप्त झालेला आहे. यावरून विहित कालावधीत पुरवठा झाला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पुवठा आदेशातील अटीनुसार व शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015 / प्र.क्र. 218 / 11 अ, दिनांक 23/11/2015 सोबतचे मार्गदर्शक सूचना मधील अनुक्रमांक 8 नुसार 45 दिवसाच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करणे आवश्यक आहे व 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किमतीच्या 3% रक्कम पुरवाठादार संस्थेच्या देयकातून एक रकमी वसूल करण्यात येईल अशी तरतूद असताना अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. तरी पुरवठा केलेल्या औजारांच्या किमतीच्या 3% रक्कम परीगणित करून वसूल करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधिल उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3.1.1.2 नुसार वित्त विभागास खरेदीच्या देयकांच्या रकमा 15 मार्च नंतर मंजूर न करण्याचे निर्देश असतांना वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिनांकास देयकांच्या रकमा मंजूर करण्यात आल्या आहेत.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार देयकासोबत संलग्न उपप्रमाणकावर रक्कम अदा करतांना ती पुन्हा उपयोगात येणार नाहीत या पध्दतीने विरूपित (paid and cancel) केलेले नाहीत.

**3.717 विशेष घटक योजने सन 2015-16 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना 100% अनुदानावर सुधारित शेती औजारे/साहित्य पुरवठा करणे योजनेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** विशेष घटक योजनेतंर्गत 100% अनुदानावर शेतकऱ्यांना 3HP (ओपनवेल सबमार्सिबल)व पेट्रोल स्टार्ट डीझेल रण पंपसंच (इंजिन), 3-HP-ओपनवेल सबमार्सिबल पंपसंच, ताडपत्री, नौपसौक स्प्रेअर (16लिटर), न्युमौटिक पावर स्प्रेअर, ॲडजेष्ट बलब्लेड हॅरो, डवरा संच व एच.डी.पी.ई.पाईप्स पुरवठा करणे बाबत रक्कम रूपये 1,12,66,880/- खर्च नोंदविलेला असुन यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) विशेष घटक योजने सन 2015-16 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना 100% अनुदानावर सुधारित शेती औजारे/साहित्य पुरवठा करणे बाबत सन 2015-16 मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असतांना तसेच शेती औजरांसाठी महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ यांचेशी शासनाने दरकरार केलेला असतांना विभागाने सन 2015-16 अंतर्गत निवडलेल्या इतर बाबींच्या लाभधारकांना लाभ न देता सन 2015-16 व

सन 2016-17 चे अनुदानातून लाभ देण्यात येऊन त्या बाबत द्यावायचा लाभाचे शेती औजारे/साहित्य वाटप करिता खरेदी करावयाचे साहित्याचे पुरवठा आदेश सन 2015-16 च्या अखेरीस (दिनांक 31/03/2016 व 17/10/2016 या दरम्यान) दिलेले असून प्रत्यक्ष साहित्य पंचायत समिती स्तरावर माहे नोव्हेंबर 2016 मध्ये व त्यानंतर प्राप्त झाले आहे तसेच सन 2014-15 चे निवडलेल्या लाभार्थी साठी खरेदी केलेली कृषी औजारेचे साहित्य एकाच वेळी पंचायत समिती स्तरावर प्राप्त झालेले आहे. सदरील साहित्य त्यानंतर पंचायत समिती स्तरावरून शेतकऱ्यांना सन 2014-15 व सन 2015-16 चे लाभार्थीना वाटप केले आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना योजनेचा वेळीच लाभ देण्यात आलेला नाही. तसेच अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून घाई घाईत पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक मागास 1093 / प्र.क्र.1239 / 34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने ज्या योजना राबविलेल्या आहेत त्या योजनेचे साहीत्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झलेले नाही.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय आदेशामध्ये व तांत्रीक मंजुरी आदेशामध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे अल्प भुधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच एका कुटुंबातील एका पेक्षा जास्त व्यक्तीना लाभ देण्यात येवू नये अशा सुचना आहेत. तथापि कृषी विभागाने पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर तशा लाभार्थ्यांच्या नोंदवहया न ठेवल्या मुळे दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4( तालुका स्तरावरुन लाभर्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहीत्याच्या नोंदी समोर दिनांक नमूद करणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे साहीत्य केव्हा वाटप करण्यात आले या बाबत अचुक खात्री करता आली नाही.

5) वरील विवरणातील कृषी औजारे खरेदीचे आदेश हे दिनांक 31/03/2016 व 17/10/2016 या दरम्यान दिलेले असून पुरवठा आदेशाचे साहित्य हे पंचायत समिती स्थरावरील साठा नोंदवही प्राप्त साठा व वाटपाची तपासणी केली असता नोंदवहीतील नोंदीनुसार उदाहरणार्थ पंचायत समिती परळी, साठा नोंदवही नमुना नंबर 32 चे पृष्ठ क्रमांक17 वर ताडपत्री पुरवठा क्रमांक 229, 222 अन्वये वाहन क्रमांक एम.एच.20 डीई-6253 द्वारे 29 नग दिनांक 28/11/2016 रोजी प्राप्त झाले असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. याप्रमाणेच इतर साहित्याच्या नोंदी पृष्ठ क्रमांक 02, 27, 22, 07, दिनांक 28/11/2016 व त्या नंतर प्राप्त झालेला आहे. तसेच या प्रमाणेच वरील विवरणातील इतर सुधारित कृषी औजारांचा पुरवठा दिनांक 28/11/2016 नंतर प्राप्त झालेला आहे त्यामुळे पुवठा आदेशातील अटीनुसार व शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015 / प्र.क्र.218/11 अ, दिनांक 23/11/2015 सोबतचे मार्गदर्शक सूचना मधील अनुक्रमांक 8 नुसार 45 दिवसाच्या कालावधीत औजारांचा पुरवठा करणे आवश्यक आहे व 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3% रक्कम पुरवठादार संस्थेच्या देयकातून एक रकमी वसूल करण्यात येईल अशी तरतूद असताना अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. तरी पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3% रक्कम परीगणित करून वसूल करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) विशेष घटक योजना अंतर्गत लाभ द्यावयाचे लाभार्थीचे प्रस्ताव ची तपासणी केली असता संचालक,(विस्तार व प्रशिक्षण),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना जाक्रं./विप्र-7/विघयो/अंतरिम/मासु/15-16/210/15 दिनांक 11 एप्रिल 2015 मधील सूचना क्रमांक7 नुसार लाभार्थीची मागणी कोणत्या बाबींची आहे हे त्यांचेकडून लेखी घेऊन त्यांचे मागणी नुसार लाभ देणे आवश्यक आहेपरंतु कोणत्याही लाभार्थीचे अर्जात मागणी केलेल्या कृषी औजारांचे उल्लेख नाही त्यामुळे खरेदी केलेले सुधारित शेती औजारे/साहित्य मागणीचे प्रमाणात केले असल्याची खात्री लेख परीक्षणात झालेली नाही.आवश्यकता नसलेले सुधारित शेती औजारे/साहित्याची खरेदी केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही,तसेच पंचायत समितीचे साठा नोंदवही व वाटपाची तपासणी केली असता बरेच औजारे लेखापारीषण दिनांकापर्यंत वाटप झालेली नाही.उधा.अ)पं.स.परळी यांचेकडील शिल्लक साठा:- 1)डवरा संच-7नग, 2)बैलगाडी - 4 नग ,3)HDPE पाईप्स-76 नग 4)ताडपत्री- 3 नग ब)पं.स.धारूर यांचेकडील शिल्लक साठा:- 1) HDPE पाईप्स-38 नग ,क)पं.स.माजलगाव यांचेकडील शिल्लक साठा:- 1) HDPE पाईप्स वाटप संख्या व शिल्लक साठा संख्या नमूद केलेल्या नाही तसेच साठा प्राप्त व वाटप दिनांक

नमूद केलेला नाही त्यामुळे शिल्लक साठा तपासता आलेला नाही,याप्रमाणेच इतर प्रकारचे औजारांचे साठा प्राप्त व वाटप दिनांक नमूद केलेला नाही,हि अत्यंत गंभीर बाब आहे.2)डीझेल इंजिन - 4 नग, अशीच परिस्थिती इतर पंचायत समितीची आहे.तथापि वेळीच निवड केलेल्या लाभार्थीला लाभाचे वाटप करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

7) संचालक,कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य् पुणे जा.क्रं./विप्र-7/विघयो/अंतरिम/ मासु/15-16/210/15 दिनांक 11 एप्रिल 2015 मधील मार्गदर्शक सुचणे नुसार लाभार्थींना योजनेचा लाभ वेळेवर देण्याचे द्रष्टीनेमाहे जुन मध्ये 2015अखेर लाभार्थींची निवडीची प्रथम प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.करीं पंचायत समितीकडून वेळीच लाभार्थींचे प्रस्ताव विभागास प्राप्त होणे आवश्यक आहे,परंतु काही प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता पंचायत समितींचे प्रस्तावांचे पत्र हे दिनांक 09.08.16,दिनांक05.08.16,

दिनांक30.07.16 या प्रमाणे आहेत,म्हणजेच मागणी/लाभार्थी निवड वर्ष संपल्यानंतरचे आहेत हि गंभीर बाब असून याबात विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक3.1.1.2 नुसार वित्त विभागास खरेदीच्या देयकांच्या रकमा 15 मार्च नंतर मंजूर न करण्याचे निर्देश असतांना वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिनांकास देयकांच्या रकमा मंजूर करण्यात आल्या आहेत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार देयकासोबत संलग्न पप्रमाणकावर रक्कम अदा करतांना ती पुन्हा उपयोगात येणार नाहीत या पध्दतीने विरूपित (paid and cancel) केलेले नाहीत.

**3.718 विशेष घटक योजना अंतर्गत तीन एच पी ओपनवेल पंपसेट, पाच एच पी इलेक्ट्रीक मोटार पंप व एचडीपीई पाईप खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4,10 व 16) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद परभणीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात विशेष घटक योजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर रूपये 17,325/- दराने 256 नग तीन एच पी ओपनवेल पंपसेट खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक16 दिनांक 30/01/2017 नुसार रक्कम रूपये 44,35,200/, रूपये 21,000/- दराने 238 नग पाच एच पी इलेक्ट्रीक मोटार पंप खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 10, दिनांक 16/12/2016 अन्वये रक्कम रूपये 47,60,000/- व रूपये 517/- दराने 9,120 नग एचडीपीई पाईप खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 04 दिनांक 08/02/2017 नुसार रक्कम रूपये 47,15,040/- असे एकूण रक्कम रूपये 1,39,10,240/- आहरण करुन महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नांदेड यांना 90 टक्के रक्कम रूपये 1,25,19,216/- व 10 टक्के रक्कम रूपये 13,91,024/- ब ठेवी लेखाशिर्षांतर्गत राखीव ठेवून प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4-ए, दिनांक 23/09/2014 मधील 1) प्रमाणे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व योजनांतर्गत लाभ देण्यात येणा-या लाभार्थ्यांची यादी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला लवकरात लवकर तयार करावी, असे नमुद आहे व (i,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे, तथा संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना6.6 प्रमाणे एकुण मंजुर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसुचीत जाती व नवबौध्द प्रवर्गातील अपंग शेतक-यांसाठी राखुन ठेवणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात सादर संचीकेची तपासणी केली असता संचालक (विप्र-7) यांचे पत्र जाक्र/विप्र-7/ आउयो/विघयो/ लानि/509/2016, दिनांक 21/09/2016 अन्वये लाभार्थी निवडीची प्रक्रिया सप्टेंबर 2016 अखेर पुर्ण करणे आवश्यक असताना संचीकेतील तपशीलाप्रमाणे लाभार्थ्यांची दिनांक 19/10/2016 रोजी निवड करण्याबाबत व त्यात विहित अपंग शेतक-यांना लाभ दिल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-संकिर्ण-2015/प्र.क्र.28/2015/विनियम, दिनांक 25/06/2015 नुसार प्राप्त दरांची बाजारभावाशी तुलना करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांकभांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार खरेदी समिती गठीत करुन खरेदी प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. तथापि, उक्त खरेदीचे संदर्भात खरेदी समितीचे पत्रावर सदस्य तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी अथवा त्यांचे प्रतिनिधी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी आढळून आली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) लेखापरीक्षणात सादर संचीकेतील पुरवठा आदेशाची तपासणी केली असता त्यातील अट क्रमांक 04 प्रमाणे लाभार्थ्यांना साहित्य वाटप करतानाचे फोटो सादर करणे आवश्यक असताना सादर संचीकेत असे फोटो आढळून आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, तसेच संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना 6.7 तथा 11 प्रमाणे कृषी विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभधारकांची नोंद लाभार्थी मास्टरनोंदवहीत घेऊन त्यांनी सदर नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

6) योजनेच्या अंमलबजावणीनंतर लाभार्थी शेतकऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणीनंतर संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार र्निगमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना 6.2 प्रमाणे योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11 ए, दिनांक 23/11/2015 नुसार केलेल्या दरकरारा सोबतचे प्रपत्र-2 मधील मार्गदर्शक सुचना 11 नुसार क्षेत्रीय स्तरावर पुरवठा करण्यात आलेल्या नमुन्याची गुणवत्ता तपासणी कृषी विद्यापीठ / शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालये यांचेकडुन करुन तपासणी अहवाल प्राप्त करुन त्यानंतरच 10 टक्के रक्कम संबंधीत पुरवठा संस्थेस अदा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याबाबत संचीकेत आढळून आले नाही.

8) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येत असताना प्रस्तुत प्रकरणात देय 100 टक्के रकमेच्या 10 टक्के रक्कम आहरण करुन ब ठेवी लेखाशिर्षांतर्गत ठेवणेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.719 जिल्हा परिषद उपकर अंतर्गत स्प्रिंकलर सेट खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, परभणीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद उपकर योजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर (अनुदान रूपये 9,499/- व लाभार्थी हिस्सा रूपये 9,500/-) रूपये 18,999/- दराने 210 नग स्प्रिंकलर सेट खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 288 दिनांक 31/03/2017 नुसार रक्कम रूपये 19,94,790/- आहरण करुन मे.साई ॲग्रोटेक, यवतमाळ यांना 90 टक्के रक्कम रूपये 15,95,832/- व 10 टक्के रक्कम रूपये 3,98,958/- ब ठेवी लेखाशिर्षांतर्गत राखीव ठेवून प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4-ए, दिनांक 23/09/2014 मधील 1) प्रमाणे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व योजनांतर्गत लाभ देण्यात येणा-या लाभार्थ्यांची यादी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला लवकरात लवकर तयार करावी, असे नमुद आहे व (i,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे, तथा संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना 6.6 प्रमाणे एकुण मंजुर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसुचीत जाती व नवबौध्द प्रवर्गातील अपंग शेतकऱ्यांसाठी राखुन ठेवणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात सादर

संचिकेची तपासणी केली असता संचालक (विप्र-7) यांचे पत्र जाक्र/विप्र-7/आउयो/विघयो/लानि/509/2016, दिनांक 21/09/2016 अन्वये लाभार्थी निवडीची प्रक्रिया सप्टेंबर 2016 अखेर पुर्ण करणे आवश्यक असताना संचिकेतील तपशीलाप्रमाणे लाभार्थ्यांची दिनांक 19/10/2016 रोजी निवड करण्याबाबत व त्यात विहित अपंग शेतक-यांना लाभ दिल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षणात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील खरेदीसाठी ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन मे.साई अॅग्रोटेक, यवतमाळ यांचे दर स्विकृत केले आहेत. तथापि, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 34 व महसुल व वन विभागाचे अशासकीय पत्र क्रमांक मुद्रांक-2009/2707/प्र.क्र.326/म-1, दिनांक 09/10/2009 प्रमाणे कार्यकराराच्या किमतीच्या दहा लाख रुपयापर्यंतच्या करारासाठी रूपये 100/- चे व दहा लाख रुपयांच्यावरील प्रत्येक एक लाखासाठी रूपये 100/- याप्रमाणे करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असताना उक्त खरेदी करारासाठी रूपये 1,100/- चे मुद्रांक वापरणे आवश्यक असताना केवळ रूपये 100/- चे मुद्रांक वापरल्यामुळे एकुण रूपये 1,000/- चे मुद्रांक महसुलाचे नुकसान झाले आहे ते संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षणात सादर संचीकेतील तालुक्यांची मागणी व प्रत्यक्ष पुरवठा आदेशाची तपासणी केली असता गटविकास अधिकारी, पुर्णा यांनी पुर्णा तालुक्यासाठी 24 नग स्प्रिंकलर सेटची मागणी केली असताना पुरवठा आदेशाप्रमाणे पुर्णा तालुक्यासाठी 38 नग पुरवठा करण्याचा आदेश दिला आहे. या विसंगतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार खरेदी समिती गठीत करुन खरेदी प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. तथापि, उक्त खरेदीचे संदर्भात खरेदी समितीचे पत्रावर सदस्य तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी अथवा त्यांचे प्रतिनिधी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी आढळून आली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) लेखापरीक्षणात सादर संचीकेतील पुरवठा आदेशाची तपासणी केली असता त्यातील अट क्रमांक 04 प्रमाणे लाभार्थ्यांना साहित्य वाटप करतानाचे फोटो सादर करणे आवश्यक असताना सादर संचिकेत असे फोटो आढळून आले नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, तसेच संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना 6.7 तथा 11 प्रमाणे कृषी विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभधारकांची नोंद लाभार्थी मास्टर नोंदवहीत घेऊन त्यांनी सदर नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, कृषी विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

7) योजनेच्या अंमलबजावणीनंतर लाभार्थी शेतकऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणीनंतर संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र./विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 नुसार नुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना 6.2 प्रमाणे योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येत असताना प्रस्तुत प्रकरणात देय 100 टक्के रकमेच्या 10 टक्के रक्कम आहरण करुन ब ठेवी लेखाशिर्षांतर्गत ठेवणेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.720 विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 75 एम.एम.एच.डी.पी.ई. पाईप वाटप योजनेतील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 75 एम.एम. एच.डी.पी.ई. पाईप वाटप योजनेकरिता रक्कम रूपये 30,07,294/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.वि.प्र.7/आ.उयो/अंतरिम मासू/14-15/460, दिनांक 02/06/2014 मधील अनुक्रमांक 14 मार्गदर्शक सुचनानुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने अधिकारी / कर्मचारी यांनी करावयाच्या तपासणीची टक्केवारी नमूद केली आहे. त्याप्रमाणे अपेक्षित अधिकारी / कर्मचारी यांनी तपासणी करणे आवश्यक असताना अशी तपासणी करुन तपासणी अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्यात आलेला नाही. सदरबाबत खात्री पटवावी.

2) शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परिच्छेद क्रमांक 15 नुसार औजारांचा पुरवठा पूर्व गुणवत्तातपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना औजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसांत औजारांच्या देयकाची 90% रक्कम पुरवठा संस्थेस अदा करणे आवश्यक आहे. तथापि विभागाने अशी कार्यवाही न करता रूपये 28,56,929/- इतकी रक्कम राखुन ठेवून रूपये 1,50,365/- इतकी रक्कम पुरवठा संस्थेस अदा केली आहे. सदर बाबत खुलासा करावा.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरी आदेशात दिलेल्या सुचनांनुसार 1) अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे, 2) एकाच कुटूंबातील एकापेक्षा जादा व्यक्तींना लाभ देण्यात येवू नये, 3) वैयक्तीक लाभाच्या योजनेत महिलांना प्राधान्य द्यावे. अशा सुचना असताना कृषि विभाग व पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची नोंदवही न ठेवल्याने दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याच्या दर्शनी भागावर ओळख खुन सुस्पष्ट आकाराचे पक्के इम्बॉसिंग केलेले लेबल असावे असे स्पष्ट नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(अ) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुखाने त्यांच्या योग्य व गुणेवत्तेनुसार असल्याची खात्री करुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

6) विभागाने ठेवलेल्या संचिकेत तालुकानिहाय मागणी केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा विभागाने मागणी कशाचे आधारे केली याचा खुलासा करावा.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/ 2239/ 67, दिनांक 01/09/1993 परिच्छेद 4 प्रमाणे योजनेच्या योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्यांच्या स्थितीत झालेल्या सुधारणे बाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश्य सफल झाल्याबाबत खात्री करता आली नाही. याबाबत अनुपालन दर्शवावे.

8) शासन निर्णय क्र. सुकृऔ 2015/ प्र.क्र.218/ 11अे, दिनांक 23/04/2015 मधील मार्गदर्शक सुचनानुसार साहित्याची केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांमधील मुद्दा क्रमांक 11.1.3(जे) परिशिष्ठ क्रमांक 11(सी) व (व्ही) मध्ये नमूद तपासणी संस्था व शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये साहित्याची तपासणी करणे करणे बंधनकारक केले आहे. अशी तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

9) पुरवठादाराबरोबर करारनामा करणे आवश्यक असताना करारनामा केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

**3.721 एस.सी.पी. (आदिवासी उपयोजना) योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ओपन वेल सबमर्सिबल पंप वाटप योजनेतील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** एस.सी.पी. (आदिवासी उपयोजना) योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ओपन वेल सबमर्सिबल पंप वाटप योजनेकरिता रक्कम रूपये 28,40,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र. वि.प्र.7/आ.उयो/अंतरिम मासू/14-15/460, दिनांक 02/06/2014 मधील अनुक्रमांक 14 मार्गदर्शक सुचनानुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने अधिकारी/कर्मचारी यांनी करावयाच्या तपासणीची टक्केवारी नमूद केली आहे. त्याप्रमाणे अपेक्षित अधिकारी/कर्मचारी यांनी तपासणी करणे आवश्यक असताना अशी तपासणी करुन तपासणी अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्यात आलेला नाही. सदरबाबत खात्री पटवावी.

2) शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परिच्छेद क्रमांक 15 नुसार औजारांचा पुरवठा पूर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना औजारांचे प्रत्यक्ष वाटप केल्यानंतर 30 दिवसांत औजारांच्या देयकाची 90% रक्कम पुरवठा संस्थेस अदा करणे आवश्यक आहे. तथापि विभागाने अशी कार्यवाही न करता रूपये 26,98,000/- इतकी रक्कम राखुन ठेवून रूपये 1,42,000/- इतकी रक्कम पुरवठा संस्थेस अदा केली आहे. सदर बाबत खुलासा करावा.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरी आदेशात दिलेल्या सुचनांनुसार 1) अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे, 2) एकाच कुटूंबातील एकापेक्षा जादा व्यक्तींना लाभ देण्यात येवू नये, 3) वैयक्तीक लाभाच्या योजनेत महिलांना प्राधान्य द्यावे. अशा सुचना असताना कृषि विभाग व पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची नोंदवही न ठेवल्याने दुबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याच्या दर्शनी भागावर ओळख खुन सुस्पष्ट आकाराचे पक्के इम्बॉसिंग केलेले लेबल असावे असे स्पष्ट नमूद केले असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(अ) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुखाने त्यांच्या योग्य व गुणेवत्तेनुसार असल्याची खात्री करुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

6) विभागाने ठेवलेल्या संचिकेत तालुकानिहाय मागणी केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा विभागाने मागणी कशाचे आधारे केली याचा खुलासा करावा.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मागास 1094/ सीआर/ 2239/ 67 दिनांक 01/09/1993 परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे योजनेच्या योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्यांच्या स्थितीत झालेल्या सुधारणे बाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश्य सफल झाल्याबाबत खात्री करता आली नाही. याबाबत अनुपालन दर्शवावे.

8) शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/04/2015 मधील मार्गदर्शक सुचनानुसार साहित्याची केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांमधील मुद्दा क्रमांक 11.1.3(जे) परिशिष्ठ क्रमांक 11(सी) व (व्ही) मध्ये नमूद तपासणी संस्था व शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये साहित्याची तपासणी करणे करणे बंधनकारक केले आहे. अशी तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

9) पुरवठादाराबरोबर करारनामा करणे आवश्यक असताना करारनामा केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

10) लेखापरीक्षण तारखेपर्यंत 28 पंप शिल्लक असल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून आले. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1093/ प्र.क्र.1239/34 दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार जिल्हा परिषदेने ज्या योजना राबविल्या आहेत. त्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप होणे आवश्यक आहे. परंतु सदर साहित्य हे वर्षाअखेर वाटप न करता पडून आहे. त्यामुळे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे भौतीक मर्यादेपेक्षा जास्त व प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक साहित्याची मागणी नोंदवू नये त्यामुळे मागणी केलेले साहित्य पडून राहणार नाही आणि साहित्य पडून राहील्यास साहित्याच्या किंमतीऐवढी रक्कमेची वसूली मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याकडून वसूल करण्यात यावी.

**3.722 विशेष घटक योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** विशेष घटक योजनेतुन रक्कम रूपये 3,33,81,843/- ची शेती अवजारे खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्रमांक वि.प्र./07/वि.घ.यो./अत्रीम/मासु/2012-13/380/2012, दिनांक 02/05/2012 अन्वये योजनेची माहिती सर्वांना व्हावी, या दृष्टीने नमुद केल्यानुसार लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या लाभाच्या यादीसपंचायत समितीनिहाय ग्रामसभेत प्रसिद्धी देण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेड.पी.ए.-2008 / प्र.क्र.446 / वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परीशिष्ट - इ मधील नेमुन दिलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

3) सदर खरेदी केलेल्या साहित्याची डिलेवरी चालनची तपासणी केली असता यामध्ये प्राप्त साहित्याचे उत्पादन वर्ष नमुद नव्हते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1083 / प्र.क्र.1239 / 34, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटुंब निहाय / लाभार्थी निहाय व प्रवर्ग निहाय तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर नोंदवही ठेवुन लाभधारकाला लाभ दिल्यानंतर जो लाभ दिला, त्या लाभाची नोंदवहीमध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) दिनांक 25/08/2016 कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनेतील अनुक्रमांक 6.2 नुसार या योजनेचे मुल्यमापान त्रयस्थ यंत्रणेमार्फ़त करुन घ्यावयाचे असल्याने योजनेतील लाभार्थी व त्यांना दिलेले लाभ याबाबत सन 1982-1983 पासुनची लाभार्थी यादी संकेतस्थळावर अपलोड करावी. तसेच सन 2016-2017 या वर्षातील लाभार्थ्यांची माहिती आर्थिक वर्ष अखेर कृषी आयुक्तालयास कळविणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) मार्गदर्शक सुचना अनुक्रमांक 6.3 नुसार यापुर्वी आपल्या जिल्हात राबविण्यात आलेल्या सदर योजनेतील लाभार्थ्यांच्या यशोगाथा रंगीत फ़ोटोसह तयार कराव्यात. लोकप्रतिनिधींना सदरची कामे दाखवुन त्यांचे अभिप्राय घ्यावेत. यशोगाथा व लोकप्रतिनिधींचे अभिप्राय कृषी आयुक्तालयास कळविण्यात यावे. असे असताना यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.723 उर्जा विकास अभिकरण नाविण्यपुर्ण बाब अंतर्गत ग्रामपंचायतीचे हदीत नविन सौरदिवे पथदिवे पुरवठा व आस्थापित करणेतील अनियमिताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषि विभाग जिल्हा परिषद उस्मानाबादने सन 2016-2017 मध्ये जिलहा नियोजन समिती उस्मानाबाद यांचेकडुन सन 2015-16 साठी महाराष्ट्र उर्जा विकास कार्यक्रम अतर्गत 01 किलो वॅट सोलार पावर पॅक आस्थापित करणेसाठी बालाजी इंटरप्रायजेस औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात येवुन त्यांना रक्कम रुपये 10988000/- प्रदान करण्यात आली असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

01) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण -1000 /प्र.क्र.14/कोषा-2 दिनांक 11/2/2000 अन्वये 15 फेब्रुवारी नंतर वर्षा अखेर खरेदी करू नये असे स्पष्ट आदेश असताना नियमबाह्य पणे पुर्नप्रत्ययी आदेश देवुन 21नग माहे मार्च महिन्यात खरेदी करण्यात आली आहे केवळ अनुदान खर्च करण्याचे उदेशाने नियोजन न करता खरेदी केलेली आहे या बाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन प्राप्त करून अनुपालन दर्शवावे.

02) जिल्हा वार्षिक योजना 16-17 अपारंपारिक उर्जा विकास कार्यक्रम योजनेतर्गत 1 KW क्षमतेचे सौर विदयुत संच खरेदी करण्यासाठी दिनांक 9/2/2016 ते 5/3/2016 पर्यत ई निविदा प्रसिध्द करण्यात आली. ई निविदेतील टेंडर डाक्युमेंट पान क्र. 26 वर परिशिष्ट 6(i)वर बॅटरीचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) तांत्रिक मान्यतेनुसार खालीलप्रमाणे आहे.

बॅटरी (Lead Acid, Tubular) -24 V/ 600 AH.

सौर विदयुत संच ई निविदादारे खरेदीबाबत प्रीबीड मिटींग अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात येवुन सदर टेंडरबाबत पुरवठादाराच्या काही अडचणी आहेत काय याबाबत अध्यक्षांनी विचारणा केली असता त्यावर सहभागी बीडर मे. बालाजी इटंरप्रायजेस लातुर यांनी टेंडर डाक्युमेंट पान क्र. 26 वर तांत्रिक मान्यता परिशिष्ट 6(i) बॅटरीबाबत 24 V /600 AH ऐवजी 12 V / 600 AH असे वाचावे अशी विनंती केली.यावर महा उर्जा पुणे यांचेशी संपर्क साधुन त्यांचे अभिप्रायासह शुध्दीपत्रक प्रसिध्द करावे असे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेशित केले.त्यावर कृषि विकास अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.691 दिनांक 26/2/2016 नुसार वरील मुदयाबाबत तांत्रिक अभिप्राय मागविण्यात आले.यावर महाउर्जा पुणे यांनी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पवन उर्जा संस्थान यांच्या दिनांक 12/8/2015 रोजीच्या पत्रामध्ये नमुद केल्यानुसार तांत्रिक मोजमापामधील बॅटरीच्या क्षमतेमध्ये 24 Volt /250 AH व बॅटरी voltage 2 volt ऐवजी 12 volt अशी सुधारणा करण्यात येत आहे,त्यानुसार निविदेतील तांत्रिक मोजमापामध्ये योग्य तो बदल करणेबाबत तांत्रिक मान्यता दिली आहे.त्यानुसार टेंडर डाक्युमेंट पान क्र. 26 वर तांत्रिक मान्यता परिशिष्ट 6(i) वर बॅटरीबाबत 24 Volt /250 AH व बॅटरी voltage 2 volt ऐवजी 12 volt अशी सुधारणा करण्यात आली.तथापि वरीलप्रमाणे केवळ बीडरने बॅटरीबाबत उपस्थित केलेल्या तांत्रिक मुदयावरून बॅटरीच्या क्षमतेमध्ये व voltage मध्ये तांत्रिक बदल करण्यात आला आहे.परंतु त्यामुळे सौर उर्जा कार्यक्षमतेवर होणारा परिणाम व सदर बदलाची आवश्यकता याबाबत खरेदी समितीने कुठलाही चर्चा न करता केवळ बीडरच्या म्हणण्यानुसार तांत्रिक बदल करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. वरीलप्रमाणे महाउर्जा पुणे यांनी त्यांचे पत्रात केंद्र शासनाच्या राष्टींय पवन उर्जा संस्थान यांच्या दिनांक 12/8/2015 रोजीच्या पत्रामध्ये नमुद केल्यानुसार तांत्रिक मोजमापामधील बॅटरीच्या क्षमतेमध्ये 24 Volt /250 AH व बॅटरी voltage 2 volt ऐवजी 12 volt अशी सुधारणा करण्यात येत असल्याचे उदधृत केले आहे .तथापि अशी सुधारणा प्रत्यक्षात केव्हापासुन करण्यात आली याबाबत प्राधिकार दर्शवुन केलेला तांत्रिक बदल योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

3) तांत्रिक मोजमापामधील बॅटरीच्या क्षमतेमध्ये 24 Volt /250 AH व बॅटरी voltage 2 volt ऐवजी 12 volt अशी सुधारणा करण्यात आलेली असतांना प्रकल्प कार्यकारी अधिकारी महाउर्जा विभागीय कार्यालय औरंगाबाद यांच्या दिनांक 17/2/2017 रोजीच्या तपासणी अहवालामध्ये आस्थापित 57 नग संचाची तांत्रिक विनिर्देश 24 Volt /300 AH व 04 नग संचाची तांत्रिक विनिर्देश 12 Volt /150 AH नमुद करण्यात आले आहे.यावरुन निविदेतील सुधारित विनिर्देशानुसार साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला नाही.

4) सोलार पावर संचाचा हमी कालावधी 5 वर्षाचा राहिल व सोलार पावर संचावर कंपनीचे नांव,आस्थापनेचा दिनांक,सोलारची क्षमता इ. कोरण्यात (Embossing) याव्यात. सदर हमी कालावधीत आस्थापित संचाची तीन महिन्यातुन एकदा तपासणी करुन सव्हिसींग करणे व त्यासंबधीचा अहवाल (Performance report) संबधित शाळेच्या मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही झालेली नाही त्यामुळे संचाच्या सदय स्थितीबाबत लेखापरीक्षणास खात्री होवु शकली नाही.

5) प्रकल्प कार्यकारी अधिकारी महाउर्जा विभागीय कार्यालय औरंगाबाद यांच्या दिनांक 17/2/2017 व 24/03/2017 रोजीच्या तपासणी अहवालामध्ये आस्थापित 61 व 21 नग संचाची पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार 100 % तपासणी करण्यात आली आहे. तथापि उस्मानाबाद जिल्हयातर्गत विविध ठिकाणी 61 नग आस्थापित संचाची एका दिवसात तांत्रिक तपासणी तांत्रिकदृष्टया व व्यवहार्यद्ष्टया शक्य नसल्याने याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.डिलीव्हरी चालान क्र. 29 दिनांक 13/12/2016 प्राशा बलसा ता उमरगा यानी सदर संचाचा पुरवठा 3/2/2017 रोजी केल्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 27 वर घेतली आहे तर डिलीव्हरी चालान क्र. 50 दिनांक 13/12/2016 प्राशा सोनारी यानी सदर संचाचा पुरवठा 22/2/2017 रोजी केल्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 24 वर घेतली आहे .यावरुन 100 % संचाचा पुरवठा 17/2/2017 पर्यत झालेला नसतांना 100 % तपासणी कोणत्या आधारे करण्यात आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) पुरवठा आदेश क्र. 669 दिनांक 3/12/2016 मधील अट क्र. 1 नुसार आदेश प्राप्त झाल्यापासुन 30 दिवसाचे आत सौर पथदिवे आस्थापित करणे आवश्यक आहे.विहीत मुदतीत कामे न केल्यास एकुण रक्क्मेच्या प्रति

0.5 % व जास्तीत जास्त 5% दंड आकारण्यात येईल.तथापि खालील शाळांना सौर पथदिवे संचाचा व साहित्याचा पुरवठा विलंबाने झाल्याने सौर पथदिवे विहीत मुदतीत आस्थापित झालेले नाहीत.

1.प्रा.शा. कामठा- 28/01/17

2.शिराढोण- 30/1/2017

3.बलसुर- 3/2/17

4.सोनारी 22/2/2017

5.अणदुर 27/03/2017

6.हिंगणगांव बु- 27/03/2017

वरीलप्रमाणे विलंबाने संचाचा पुरवठा होवुनही वत्यानंतर विलंबाने संचाची आस्थापना होवुनही दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.724 जिल्हा परिषद सेस योजनेतून 50 % अनुदानावर 5 H.P. कडबाकुट्टी खरेदी व पुरवठा करणेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** कृषी विभाग जिल्हा परिषद लातूर सन 2016-2017 मध्ये महारष्ट्र कृषी उद्योग महामंडळ, उस्मानाबाद यांचेकडून दरकरारावर 50% अनुदानावर जिल्हा परिषद सेस योजनेतून 5H.P. कडबाकुट्टी खरेदी सबंधित पुरवठा दारास साहित्य पुरवठा आदेश देण्यात आले यासाठी रक्क्म रुपये 41,91,000/- एवढी रक्क्म प्रदान करण्यात आली असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी कडून 50% लोकवाटा वसूल करून पुरवठादार संस्थेस रक्कम अदा केल्याचे लेखा परीक्षणाची खात्री पटविणे आवशयक आहे. तरी अशी कार्यवाही केली नाही.

2) ग्राम विकास व जलसंधारण विभाग/शासन परिपत्रक क्रमांक/1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05 ऑक्टोंबर 1989 व शासन निर्णय क्रमांक मगास 1093 प्र.क्र.1239/34, दिनांक 01 सप्टेंबर 1993 अन्वये योजनेसाठी विहित नमुन्यात गट स्तरावर नोंदवही ठेवून एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला त्यावर्षी पुन्हा या योजनेचा लाभ मिळणार नाही असे असताना विहित केलेली नोंदवही गट स्तरावर ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरच्या योजनेचा शेतकऱ्यास दुबार लाभ झाला अगर कसे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) 5H.P. कडबाकुट्टी केंद्र पुरस्कृत गळीत धान्य, केंद्र पुरस्कृत कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत खरेदी केले जात असताना जिल्हा परिषदने परत स्वतःच्या निधीतुंन 5H.P. कडबाकुट्टी खरेदीची योजना घेतलेली आहे. जर अन्य कोणतीही जी शासनाने योजना राबविली नाही अशी योजना घेतली असती तर त्याचा लाभ शेतकऱ्यांना झाला असता.

4) सदर योजनेच्या उद्दिष्टा नुसार पिक संरक्षण औजारे शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने पुरविल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याची खात्री पटवावी.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प.रा.स.-1089/846/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार सदर योजनेचा फलश्रुती अहवाल उपलब्ध करण्यात आला नाही याबाबत खुलासा होणे आवशयक आहे.

6) लेखापरीक्षण कालावधी पर्यंत पंचायत समिती औसा अंतर्गत सदर साहित्याचे 03 नगाचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरच्या खरेदीची रक्कम रुपये 57,294/- जिल्हा परिषद सेसच्या गुंतून पडलेल्या रकमेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून वाटप न केल्याबाबत खुलासा करावा.

7) तालुका स्तरावरील लाभार्थ्यांची निवड यादी संचिकेत आढळून आली नाही. गट स्तरावरील प्रस्ताव लेखा परीक्षणात न दर्शविल्याने योग्य लाभार्थ्यास लाभ मिळाल्याची खात्री पटली नाही.